ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | आदेश |
| लेखक | : | चं. सं. आंग्रे |
| प्रकाशक | : | संस्थान श्रीमंत सरदार सी. एस. आंग्रे, संभाजी विलास, ग्वाल्हेर |
| प्रकाशन वर्ष | : | १९३६ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०२१

श्री

# आदेश

864
Ang
6061

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00961

प्र. के. अत्रे

प्रो. दत्तो वामन पोतदार

सप्रेम भेट

# आदेश

दत्तो वामन पोतदार
शनिवार पेठ
पुणे.

चं. सं. आंग्रे

संभाजी विलास
ग्वाल्हेर १९३६

म/२७१०

Printed by M. N. Kulkarni, at the Karnatak Printing Press, Chira Bazar, Bombay 2,
and Published by Samsthan Shrimant Sardar C. S. Angre,
Sambhaji Vilas, Gwalior.

# प्रस्तावना

मुलांचें शिक्षण गुरुगृहीं व्हावें कीं मातापित्यांच्या प्रत्यक्ष दृष्टीसमोर व्हावें या प्रश्नाचा समाधानकारक निर्णय करणें अवघड आहे. दोन्ही पद्धतींत विशिष्ट लाभ आहेत. पित्याच्या प्रेमातिरेकामुळें पुष्कळ वेळां असें होतें कीं त्याला आपल्या पुत्राच्या ठिकाणचे दोष दिसत नाहींत, किंवा असेंही होतें कीं ज्ञानग्रहणाच्या कामीं पुत्र हवी तितकी गति प्रगट करीत नाहीं असें आढळून येतांच पित्याचा तोल सुटतो. हे दोष गुरूच्या हातून सहसा घडत नाहींत. निरपेक्ष अशा शास्त्रशुद्ध दृष्टीनें शिष्याच्या मनोभूमिकेचें परीक्षण करून तो ज्ञानबीजांची पेरणी करूं लागतो. परंतु या पद्धतींत साध्य होत नाहीं ती गोष्ट ही कीं पित्याला जी परंपरा आपल्या पुत्रानें अभ्यासावी असें वाटत असतें तीच त्याच्यासमोर मांडली जाईल अशी निश्चिती धरतां येत नाहीं. सध्यांच्या काळीं तर या दोन्ही पद्धतींत मिळणाऱ्या लाभांना कलाटणी मिळालेली आहे. कारण पितृगृहीं तर शिक्षण पूर्ण होऊं शकत नाहींच, पण त्याला जोड देणारें जें गुरुगृह तेंही हरवलें आहे. त्याऐवजीं ठराविक मिनिटें ठराविक विषयावर व्याख्यानें मिळणें एवढेंच बाकी राहिलें. सहवासांत अनुकरणानें मिळणारें शीलविकासाचें शिक्षण दुष्प्राप्य झालें आहे.

आमच्या पुढें हाच प्रश्न पडला. वर्षांतून दहा महिने मुलें दूर मुंबई किंवा मसूरी अशा ठिकाणीं रहावयाचीं. एकत्र येण्याचे विश्रांतीचे दोन महिने आम्हांला व्यवसायामुळें त्यांच्याजवळ रहावयाला मिळेलच अशीही शाश्वती नाहीं. अशा स्थितींत एकच मार्ग राहिला. गुरुश्रेष्ठ श्रीमन्माधव महाराजांच्या पायापाशीं बसून आणि परंपरनें परमपूज्य वडिलांच्याकडून प्राप्त झालेले आपले म्हणून जे विचार मुलांच्या कानावर जावे असें वाटतें ते मधून मधून नित्याच्या पत्रव्यवहारांत त्यांच्यापुढें मांडणें. पुढें दिलेलीं

पत्रें हीं त्याच विचारांचें मूर्तस्वरूप आहे. ता. ५ सप्टेंबर १९३५ ते ता. ५ सप्टेंबर १९३६ या एका वर्षाच्या अवधींत हीं पत्रें लिहिलीं गेलीं आहेत.

या पत्रांत नाविन्याची अपेक्षा अर्थातच कोणी करूं नये. तें क्षेत्र संशोधकांचें आहे. ज्या गोष्टींच्या चांगलेपणासंबंधीं आपला पूर्ण विश्वास असेल त्याच शिक्षणांत येऊं शकतात. विवाद्य विचारांचा त्यांत अंतर्भाव होत नाहीं. ते विचार ज्याचे त्यानें स्वतः करावयाचे असतात. विशेषतः प्रौढ वाचकांना या पत्रांतील विचार पुष्कळच परिचयाचे वाटतील. कारण आम्हीं तरी ते कोठून तरी शिकूनच घेतले आहेत.

स्वतःच्या मुलांसाठीं लिहिलेलीं हीं पत्रें वाचण्याचे परिश्रम लोकांना कां द्यावे हा प्रश्न—लोक ते घेतील असें गृहीत धरून—अवश्य विचारतां येण्याजोगा आहे. नित्याचा परिपाठ असा आहे, कीं अशा स्वरूपाच्या प्रसिद्धीकरणाला स्नेही मंडळींचा आग्रह कारणीभूत असतो. या बाबतींत तसें कांहींएक झालें नाहीं हें आधींच सांगून टाकतों. कारण हीं पत्रें अजून कोणालाच वाचावयास दिलीं गेलीं नाहींत. प्रसिद्ध करण्यांत हेतू असा आहे. आमचे विचार आमच्या चिरंजीवांनींही 'बाबावाक्यं प्रमाणम्' म्हणून स्वीकारावे अशी अशक्य अपेक्षा आम्ही करीत नाहीं. त्यावरील विद्वानांचे अनुकूल प्रतिकूल अभिप्रायही त्यांच्या कानीं जावे आणि अखेरचा निर्णय त्यांनीं आपला आपण ठरवावा. आणि विद्वानांच्या समोर पत्रें येण्याला अत्यंत सोपी युक्ति हीच कीं तीं छापावीं आणि एकेक प्रत त्यांच्याकडे पाठवून द्यावी.

संभाजी विलास,<br>ग्वाल्हेर,<br>ता. २ नोव्हेंबर १९३६.

**चं. सं. आंग्रे.**

श्री

# कै० श्रीमंत सरदार संभाजीराव आंग्रे,

वजारत माब, सवाई सरखेल, बहादूर.



तात – चरणीं.

१

॥ श्री ॥

संभाजी विलास,
ग्वाल्हेर,
५ सप्टेंबर १९३५.

प्रिय **शंभू** यांस अनेकोत्तम प्रेमाशिर्वाद :–

आपलें ता. २९।८ चें पत्र पोहोंचलें. या वेळपावेतों माझें ता. ३१ चें पत्र आपल्यास मिळालें असेलच. ओव्हर कोट व पळण्याचे जोडे पाठविण्याची व्यवस्था केली आहे. ते आपल्याला लवकरच मिळतील.

आपल्या मातु:श्री पुण्याहून येथें ता. ३० ला सुखरूप येऊन पोहोंचल्या. त्यांची प्रकृति चांगली आहे. आपण मागल्या वेळीं पुणें येथें ... ........स भेटलां होतां तेव्हांपासून आपण त्यांना पत्र पाठविलें नाहीं. तें कां? आपल्या व ........च्या मागील भेटीच्या प्रसंगीं आपल्या हातून ........च्या मानास न शोभण्याजोगें वर्तन झालें असें त्या आपल्या मातु:श्रीजवळ म्हणत होत्या. ... ........नीं माझ्यासंबंधीं कांहीं आपल्याला न आवडणाऱ्या गोष्टी सांगितल्या. त्यावेळीं आपण

आपल्याला न शोभेल अशा प्रकारची चर्या आणि हावभाव केले. चांगल्या चालीरीती रक्तांत भिनवून घेण्याचें आपलें हें वय आहे. या वयांत ज्या गोष्टी करण्याची संवय आपण लावून घ्याल त्या पुढें आपल्या हातून आपोआप घडतील. कोणाशींही वागतांना आपलें बोलणें चालणें इतकें सरळ आणि गोड असावें कीं कोणाचेंही मन आपल्या वर्तनानें दुखविलें जाऊं नये. कांहीं माणसांना वागण्याची संवयच अशी लागलेली असते कीं आपल्या वर्तनानें दुसऱ्याच्या मनाला वाईट वाटेल हें त्यांच्या ध्यानांतही येत नाहीं. ही स्थिति फारच वाईट आहे हें मी आपल्याला सांगावयास नको. अशा माणसांना इतरांचें प्रेम संपादन करणें फारच अवघड जातें. कारण स्वतःच्या ठिकाणीं काय कमी आहे हेंच त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. या दृष्टीनें पहातां अजाणतेपणीं एकाद्याच्या हातून अयोग्य वर्तन घडण्यापेक्षां तेंच जाणूनबुजून झालेलें पुरवलें. कारण जाणूनबुजून तसें करणाराला तें वाटेल तेव्हां सुधारतां येईल.

आपल्या हातून जें वर्तन झालें तें अजाणतेपणीं झालें नसावें असें वाटतें. निदान तें आपल्या ध्यानांत तरी असेल. आपण मनावर घ्याल तर आपल्याला अशी गोष्ट पुन्हां होणार नाहीं अशी व्यवस्था सहज करतां येईल असा मला भरंवसा आहे.

कोणाही माणसाशीं वागतांना या गोष्टी ध्यानांत ठेवावयाच्या असतात. त्यांत ....... या तर अनेक दृष्टींनीं पूज्य आहेत. . . . . . . . . . .

. . . . . . ....... . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ., . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . ., . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . परंतु त्या माझ्यासंबंधीं कांहीं बोलल्या तरी आपलें वर्तन त्यांच्याशीं अत्यंत नम्रपणाचेंच असलें पाहिजे. कारण, एक तर त्या आपल्या मातु:श्रींच्या नातेवाईक या नात्यानें आपल्याला मातु:श्रींच्याच जागीं आहेत. शिवाय . . . . या नात्यानेंही सर्वांनीं त्यांच्याशीं अत्यंत नम्रपणें आणि विनयानें वागलें पाहिजे. . . . . . . . . . .

. . . . . . आपणही आपल्या थोर चालीरीतींना आणि संस्कृतीला न शोभणारें वर्तन करून कसें चालेल ? उद्यां आपल्या मातु:श्रींच्या ठिकाणीं आपल्याला कांहीं दोष दिसला तरी आपलें त्यांच्यासंबंधींचें प्रेम व आदर हीं तिळमात्र तरी कमी होतील का ? मातृप्रेम आणि

मातृभक्ति हीं या जगांत ईश्वराखेरीज दुसऱ्या कोणत्याही गोष्टीपेक्षां श्रेष्ठ आहेत. इतकेंच नव्हे तर ईश्वरापेक्षांही मातृभक्ति श्रेष्ठ आहे असें आपल्या आचार्यांचें मत आहे. मातृसेवा करीत असतां प्रत्यक्ष भगवान् येऊन उभे राहिले तरी त्यांना तसेंच उभें ठेवणाऱ्या पुंडलिकाची भगवंतांनींच प्रशंसा केली या कथेचें तात्पर्य तरी हेंच आहे. आपण आपल्या मातुःश्रीपाशीं जसें कोणत्याही परिस्थितींत अत्यंत प्रेमळ, आदरयुक्त आणि विनयशील वर्तन ठेवाल तसेंच तें ... ... ....यांचेपाशीं ठेवणें हें आपलें कर्तव्य आहे. आपण समजूतदार आहां म्हणून माझ्या मनांतील गोष्ट मी स्पष्टपणें आपल्याला सांगितली. त्याचा आपल्या मनाप्रमाणें पूर्ण उपयोग केल्यास माझ्या मनाला मोठेंच समाधान होईल.

माझ्या मनांतील गोष्टी कोणत्या क्रमानें आपणाला सांगाव्या याचा मी विचार करीत आहें असें मी आपल्याला मागल्याच पत्रांत कळविलें होतें. आपल्या मातुःश्री येथें आल्याबरोबर त्यांनीं सांगितलेल्या वार्तेमुळें याच विषयासंबंधीचे माझे विचार प्रथम आपणांस कळविणें आवश्यक झालें.

थोरपणा हा केवळ थोर कुळांत जन्मल्यानें येत नाहीं. थोरपणाचे विचार ग्रहण करण्याची योग्यता आणि संधी हीं मात्र त्यामुळें मिळतात. थोर रक्तपरंपरा आपल्याला मिळाली आहेच. त्याचबरोबर माझ्या अनुभवांतल्या आणि परंपरेनें चालत आलेल्या अशा चांगल्या गोष्टी मला माहीत झाल्या त्या आपल्याला सांगून थोर विचारपरंपरे-

चाही भाग आपणाला मिळावा अशी व्यवस्था करणें हें माझें कर्तव्य आहे. शिक्षणाच्या सोयीसाठीं आपल्याला माझ्यापासून फार दूर रहावें लागतें. फार तर दोन महिने आपलें एकत्र रहाणें होणार आणि तेंहि पुढें कमी होण्याचा संभव आहे. उर्वरित सर्व काळ आपला परधर्मीयांच्या आणि आपल्याहून अगदीं भिन्न संस्कृतीच्या लोकांच्या सहवासांत जातो. म्हणून या सर्व गोष्टी पत्ररूपानेंच प्रत्येक आठवड्याला आपणाला सांगण्याचा माझा हेतु आहे.

हें पत्र लिहीत असतांच आपलें ता. ३१चें पत्र पोहोंचलें. माझें पत्रही ता. ३१लाच चालू झालें.

आपणांला देत असलेलीं इंजेक्शन्स बहुधा सर्दीविरुद्ध असतील. तीं घेण्यास हरकत नाहीं. आपल्या प्रकृतीसंबंधीं तिथल्या डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणेंच वागलें पाहिजे. मात्र वारंवार सर्व वर्तमान इकडे कळवीत असावें. म्हणजे आपल्या येथील कौटुंबिक डॉक्टरांच्या सर्व गोष्टी ध्यानांत येतील.

ईश्वरकृपें व वाडवडिलांच्या आशिर्वादें इकडे सर्व कुशल आहे, हे उत्तम आशिर्वाद.

तुमचा प्रिय तात

**बाबा**

# २

॥ श्री ॥

संभाजी विलास,
ग्वाल्हेर,
१९ सप्टेंबर १९३५.

अनेकोत्तम प्रेमाशिर्वादः—

आपलें ता. १६ चें पत्र पावलें. आपली प्रकृति आतां कशी काय आहे तें कळवावें.

आमची प्रकृति बरी आहे. तुमच्या मातुःश्रींना मात्र थोडी सर्दी झाल्यानें त्यांची प्रकृति बरी नाहीं. पण काळजी करण्याचें कारण नाहीं.

आम्ही आपल्याला ता. ५ ला थोडें मोठें पत्र लिहिलें त्या-संबंधीं आपण कांहींच लिहिलें नाहीं. आमच्या विशिष्ट परिस्थितींत आम्हांला जे कांहीं अनुभव आले ते आपल्याला समजून सांगावे या हेतूनें आम्हीं हीं पत्रें लिहिण्यास आरंभ केला आहे. त्या-संबंधीं आपल्याला काय वाटतें, आपल्या मनांत कोणत्या शंका येतात, त्यांतल्या कोणत्या गोष्टी आपल्याला पटतात व कोणत्या

पटत नाहींत, हें सर्व आपण मोकळ्या मनानें आम्हांला सांगितलें पाहिजे. एरवीं हीं पत्रें लिहिण्यास आम्हांला उत्साह येणार नाहीं. तरी येत्या पत्रांत आपल्या मनांत जें कांहीं येईल तें मोकळेपणानें सविस्तर लिहावें.

आजच्या पत्रांत तत्त्वनिष्ठा असें ज्याला म्हणतात असें वर्तन कोणतें आणि त्याच्यासंबंधीं आमचे विचार काय आहेत तें सांगणार आहों.

आतांपर्यंत आपण इंग्रजी भाषेंतून किंवा मराठींतून पुष्कळांचे उपदेश वाचले असतील आणि ऐकलेही असतील. प्रत्येक माणसानें नेहमीं चांगलें असावें हीच गोष्ट सर्वजण सांगत असतात. पण असें असूनसुद्धां सर्व लोक चांगले तर होत नाहींतच, पण एकंदरींत चांगल्या लोकांपेक्षां वाईट लोकांचीच संख्या जास्त आहे असें बहुधा आढळून येतें. वाईट होण्यासाठीं कोणालाच उपदेश करावा लागत नाहीं. चांगलें होण्यासाठीं मात्र सारखा उपदेश करावा लागतो आणि इतकें करूनही अधिक अनुयायी वाइटाला मिळतात. असें कां व्हावें, हा प्रश्न आपल्या मनांत पुष्कळ वेळां येऊन गेला असेल.

वाइटाच्या अंगीं अशी कोणती आकर्षणशक्ति आहे? माणसांची आपोआप वाइटाकडे जाण्याची प्रवृत्ति कां होते?

आपल्या हातून जर केव्हां एखादी वाईट गोष्ट घडलेली असेल तर तिची आठवण करून पहा. ती गोष्ट आपण जेव्हां करतों, तेव्हां त्या-वेळेपुरतीच कां होईना, ती आपल्याला सुखदायक वाटत असते.

एकादा मुलगा खोटें बोलतो, तेव्हां त्याला खोटें बोलण्यांत विशेष

मौज वाटत असते असें नाहीं. इतकेंच नव्हे तर अगदींच निर्ढावलेलीं कांहीं मुलें सोडून दिल्यास खोटें बोलणें ज्याला मनापासून आवडतें असा मुलगा सांपडणें कठिण आहे; तरी पण आपण पहातों कीं बरींच मुलें खोटें बोलतात. त्याचें कारण इतकेंच कीं आपण केलेली एखादी चूक लपविली नाहीं तर शिक्षा होईल अशी त्यांना भीती वाटत असते. त्या शिक्षेचें दुःख चुकविण्यासाठीं तीं खोटें बोलतात. म्हणजे एका अर्थीं खोटें बोलण्यापासून असा कांहींतरी लाभ होईल असें त्यांच्या मनांत असतें.

आतां कोणी असें विचारील कीं खोटें बोलण्यापासून जर एखाद्याचा फायदा होत असला तर तो त्यानें कां करून घेऊं नये? या प्रश्नाचें उत्तर तुम्हीं देऊं शकाल काय?

तुम्ही म्हणाल फायदा होत असला तरी त्याला पाप लागेल म्हणून त्यानें खोटें बोलूं नये. मान्य. पण यावर तो म्हणेल कीं पाप धुऊन काढण्यासाठीं मी प्रायश्चित्त घेईन, सत्यनारायण करीन, गंगास्नान करीन, याला तुम्हीं काय उत्तर द्याल? आणि खरोखरच असे कांहीं लोक असतात. लांड्यालबाड्या करून व्यापारधंद्यांत लक्षावधी रुपये मिळवितात. त्यांतल्या कांहीं हजारांचा दानधर्म करतात आणि बाकीचा राहिला तो नफा! हा एक प्रकारचा देवापाशीं केलेला व्यापार आहे. कित्येक वकील लोक नित्य खऱ्याचें खोटें व खोट्याचें खरें करून हजारों रुपये मिळवितात आणि त्याची वजावाट करण्यासाठीं मग तासचे तास स्नानसंध्या, जपजाप्य करीत बसतात.

फायदा होत असला तरी सुद्धां खोटें कां बोलूं नये किंवा वाईट आचरण कां करूं नये याचें खरें कारण निराळेंच आहे. समजा, फायदा होत असेल तर खोटें बोलायला हरकत नाहीं असें मान्य केलें. त्याचा परिणाम काय होईल? सर्वच लोक जर खोटें बोलूं लागले तर कोणाच्याच बोलण्यावर कोणाचा विश्वास बसणार नाहीं. मनुष्य प्राण्यानें जी एवढी भाषा निर्माण केली आहे तिचा उपयोग काय? एकाच्या मनांतले विचार दुसऱ्याला सहज समजावे आणि वस्तुस्थिति कळावी हाच. पण तेच विचार जर दुसरा लपवितो आहे असें प्रत्येकाला वाटूं लागलें—आणि फायदा होत असेल तर खोटें बोलायला प्रत्यवाय नाहीं असें म्हटलें तर असें वाटणारच—तर भाषेचा उपयोग काय? सर्व व्यवहार मुक्यानें करावे लागतील. इतकेंच नव्हें तर माणसांमाणसांमधील सर्व व्यवहार बंद होतील.

मुंबईत किंवा कोणत्याही मोठ्या शहरांत पुष्कळ लोक लहान लहान जागा घेऊन त्यांत राहतात. केव्हां बाहेर जावयाची पाळी आली तर आपल्या खोलीला कुलुप ठोकून निघून जातात. आतां या कुलुपावर ते एवढा विश्वास कां ठेवतात? कोठेंही थोडक्या पैशांत एक किल्ल्यांचा जुडगा विकत घेतां येतो आणि त्याच्या मदतीनें कोणीही तें कुलुप उघडूं शकेल. परंतु असें जर माणसें करूं लागलीं तर कोणालाही घर सोडून बाहेर पडण्याचीच सोय उरणार नाहीं. प्रत्येकाला आपल्या दारावर पहारा करीत बसावें लागेल किंवा पहारेकरी ठेवावा लागेल. असें करावें लागूं नये म्हणून माणसांनीं

एकमेकांत असें ठरवून टाकलें कीं कुलूप लावलें कीं तें उघडून आंत शिरण्याचा कोणी प्रयत्न करावयाचा नाहीं आणि कोणी प्रयत्न करूं लागला तर त्याला पकडून तुरुंगांत टाकावयाचें.

अशा रीतीनें माणसांचे व्यवहार सुरळीत चालावयाला हवे असतील तर खरें बोलणें, चोरी न करणें, इत्यादि गोष्टी सर्वांनीं पाळल्या पाहिजेत. मग त्यामुळें त्या वेळेपुरता तोटा झाला तरी प्रत्यवाय नाहीं. अशा प्रकारच्या सर्व प्रसंगीं आचरणांत आणण्या-साठीं म्हणून ज्या गोष्टी ठरविल्या गेल्या आहेत त्यांना तत्त्वें म्हणतात. आणि अशीं तत्त्वें निश्चयानें आचरणांत आणणाऱ्या माणसाला तत्त्वनिष्ठ असें म्हणतात. कोणत्याही समाजांत जों जों तत्त्वनिष्ठ माणसांची संख्या अधिक तों तों समाज अधिक सुखी असें समजावें. तत्त्वें म्हणून ज्या मानल्या जातात आणि तत्त्वनिष्ठ माणसांच्या आचरणांत ज्या दृष्टीस पडतात अशा गोष्टी पुढील आहेतः—सत्याचरण, दुसऱ्याच्या द्रव्याचा अपहार न करणें, स्वाभिमान, कुलाभिमान, देशाभिमान, दया, क्षमा इत्यादि. यांपैकीं प्रत्येक गुणाबद्दल आम्ही पुढें थोडें थोडें सांगणार आहोंच. आज मात्र या सर्वांचें मिळून जें एक आचरणाचें तत्त्व होतें त्यासंबंधीं लिहिलें आहे. याप्रमाणें तत्त्वनिष्ठ राहण्याचा तुम्ही नित्य प्रयत्न कराल असा मला विश्वास आहे.

तत्त्वनिष्ठेसाठीं आजन्म संकटें किंबहुना मरणसुद्धां ज्यांनीं पतकरलें अशा कित्येक थोर पुरुषांचीं चरित्रें आपल्या इतिहासांत आणि पुराणांत आपल्याला पहावयास आढळतात. धर्माभिमानासाठीं औरंग-

जेब्राच्या हातून यातनामय मरण पतकरणारे आपले धर्मसूर्य श्री. संभाजी महाराज आणि शीखांचे गुरु तेजबहादुर, राणा प्रताप, बाजी प्रभू, मुलाचें लग्न बाजूला ठेवून स्वामी श्रीशिवाजीची आज्ञा पुरी करण्यासाठीं धांव घेऊन देह ठेवणारा तानाजी मालुसरे, लोकांनीं केलेला अनन्वित छळ सोसूनसुद्धां एकदां मनाशीं धरलेलें तत्त्व न सोडणारे तुकाराम, ज्ञानेश्वर इत्यादि संत, किंवा पुराणकाळांतील पित्याची आज्ञा पुरी करण्यासाठीं वनवास पतकरणारा राम हीं सर्व तत्त्वनिष्ठेचीं उज्वल उदाहरणें आहेत.

येथपर्यंत तत्त्वनिष्ठेसंबंधीं कोणीही कोणालाही जें सांगूं शकेल तें सांगितलें. परंतु त्याच गोष्टीसंबंधीं आतां जें सांगणार आहोंत तें मात्र बापच केवळ आपल्या मुलाला सांगूं शकेल. सध्यांच्या परिस्थितींत गुरुसुद्धां शिष्याला सांगूं शकणार नाहीं. कारण पिता आणि पुत्र यांच्यामध्यें जितका आपलेपणा, स्वभावाचा सारखेपणा आणि दृढपरिचय असतो तितका आजकालच्या गुरु आणि शिष्य यांचेमध्यें पालटलेल्या परिस्थितीमुळें असूं शकत नाहीं. म्हणून पुढील विषय लक्षपूर्वक वाचून त्याचा तुम्ही आपल्या आयुष्यांत उपयोग करून घेतला पाहिजे.

तुमच्याकडे पुढें एका जहागिरीची मालकी येणार आहे आणि त्यामुळें कित्येकांचीं सुखदुःखें, उन्नति किंवा अवनति हीं तुमच्या कर्तृत्वावर अवलंबून राहणार आहेत. सामान्य माणसांना आपला उद्योग व आपलें कुटुंब यांच्यामुळें येणारे संबंध नीट सांभाळले

म्हणजे भागतें. पण तुमच्याकडे मात्र अनेक डोळे मोठ्या आशेनें, भक्तीनें आणि प्रेमानें पहात रहाणार ही गोष्ट तुम्ही केव्हांही विसरून चालणार नाहीं. जगामध्यें जे दुसरे कित्येक पुढारी होतात त्यांनीं जन्मभर कष्ट केल्यानंतर त्यांना इतक्या लोकांना आधारभूत होण्याचें भाग्य लाभतें. परंतु आपल्याला मात्र ईश्वराच्या कृपेनें व वाडवडिलांच्या शौर्यानें जन्मतःच हजारों लोकांचें पुढारीपण प्राप्त झालेलें आहे. या पुढारीपणाचा योग्य उपयोग करून इतक्या लोकांचा धन्यवाद मिळविण्यांत श्रेष्ठ प्रतीचा आनंद आहे. उलट आळस, मूर्खपणा किंवा दुराचरण यामुळें या पुढारीपणाचा उपयोग करून घेतां आला नाहीं किंवा दुरुपयोग करून घेतला तर आपल्या स्थितींतल्या माणसांची इतकी वाईट स्थिती होते कीं तिचें वर्णन करतांच येणार नाहीं. शेजारच्या दोन घरांपलीकडे ज्याचें नांव कोणाला माहीत नाहीं असा मनुष्य स्वस्थपणें आपल्या घरांतल्या खाटेवर पडून आपल्या दुराचरणाचे परिणाम इतरांस उपसर्ग न होतां स्वतः भोगूं शकतो. परंतु आपल्यासारख्या परिस्थितींतल्या माणसांचीं सत्कृत्यें जशीं फुगून दिसतात आणि त्यासाठीं हजारों लोकांचे धन्यवाद मिळतात, त्याचप्रमाणें आपलीं दुष्कृत्येंही फुगून दिसतात आणि हजारों माणसांचे शिव्याशाप आपल्याला सहन करावे लागतात.

अर्थात् त्यामुळें आपल्याला आचरणाचे नियमही सर्वसाधारण माणसांपेक्षां थोडे निराळे केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. कोणता फरक

करावा लागेल तें येथें ठोकळ मानानेंच सांगतां येईल. मात्र हें विसरतां कामा नये कीं तत्त्वनिष्ठेला अपवाद म्हणून हे जे आम्ही सांगणार ते वस्तुतः अपवाद नाहींत. तर केवळ तत्त्वसिद्धीसाठींच त्यांचा उपयोग आपल्या विवक्षित परिस्थितीमुळें करणें आपणांस क्रमप्राप्त आहे.

सामान्य परिस्थितींतल्या माणसाचे जे गुण किंवा अवगुण असतील किंवा त्यांचीं जीं प्रामाणिक मतें असतील तीं त्यानें सडेतोड वृत्तीनें उच्चारलीं म्हणून त्यांचें कांहीं जात नाहीं, किंबहुना अशा माणसांची नेहमीं कीर्तीच होते. इतकेंच नव्हे तर अशीं सडेतोडवृत्तीचीं माणसें समाजांत जितकीं अधिक असतील तितका तो समाज अधिक कार्यक्षम आणि सुखी होतो. क्वचित् प्रसंगीं अशा सडेतोड उत्तरामुळें किंवा आचरणामुळें सामान्य माणसाचें तात्पुरतें नुकसान होणार असलें तरी तत्त्वनिष्ठेसाठीं त्यानें सदाचरणाचा आणि सत्याचा मार्ग सोडतां कामा नये. हें कां तें वर सांगितलेंच आहे. परंतु आपली गोष्ट मात्र तशी नाहीं. आपल्या ठिकाणीं जी कार्य करण्याची शक्ति मोठ्या प्रमाणावर असते तिला कारण आपल्या हातीं असणारीं साधनें होत. आपली जहागिर किंवा आपलें राजदरबारांतील स्थान हीं या साधनांतील अत्यंत महत्त्वाचीं अंगें होत. आपल्या हातून कांहीं कार्य व्हावयाला हवें असेल तर आपलीं साधनें अधिक उपयुक्त व सबल करावयास हवींत. त्याकरितां कोणतीहि गोष्ट करावी लागली तरी ती करण्यास मागेंपुढें पहातां कामा नये. मात्र साधनांची सिद्धता करण्याकरितां म्हणून आपल्या राजाचें व राज्याचें कोणत्याही प्रकारें

व कोणत्याही प्रमाणांत अहित होतां कामा नये. तसें झालें तर साधन साधण्याकरितां आपलें मुख्य साध्य गमावल्यासारखें होईल. अर्थात् ग्वाल्हेर राज्याचें आणि महाराजांचें हित हें साध्य करण्यासाठीं सर्वस्वावर पाणी सोडावें लागलें तरी चिंता नाहीं. कारण स्वामीचें अहित करून स्वतःचें हित साधलें तरी तें मातीमोल आहे.

परंतु हा अपवाद सोडला तर आपली जहागिर आणि आपलें दरबारांतील स्थान हें कायम ठेवण्यासाठीं आणि या सारखीच आपली राजसेवा करण्याची शक्ति ज्यांनीं वाढेल अशीं जीं साधनें आपल्या हातीं येतील तीं सुरक्षित ठेवण्यासाठीं सामान्य मनुष्य ज्याला तत्त्वनिष्ठा म्हणेल ती केवळ तत्त्वाखातरच क्षणभर बाजूस सारावी लागली तरी त्यांत कोणतीहि अनीति होत नाहीं.

उदाहरणार्थः—

माझ्या मागल्या पत्रांत आपण ... .......यांचेशीं जें वर्तन केलें त्याबद्दल मी आपल्याला दोष दिला. एका दृष्टीनें—आपल्या कुलाभिमानाच्या दृष्टीनें आपण केलें तें योग्य होतें असें तात्त्विकदृष्ट्या म्हणावें लागेल. आणि कुलाभिमान हा तत्त्वनिष्ठेचाच एक भाग आहे. तरी पण मी आपल्याला दोष दिला त्याचें कारण... ....... या .... असल्यामुळें त्यांच्याशीं वागतांना कुलाभिमान थोडा बाजूस ठेवला पाहिजे. या म्हणण्याचा खरा अर्थ आणि त्याचें महत्त्व आपण व्यवहारांत वावरूं लागलांत म्हणजे अनुभवानें अधिक पटेल. परंतु आतांपासून राजकारणांत आणि व्यवहारांत कसें वागावें लागतें त्याची

शिकवण आपण आपल्या मनाला लावून घेतली पाहिजे. एरवीं सीधा, सडेतोड, स्पष्टवक्ता आणि नाकासमोर चालणारा असा मनुष्य तेजस्वी असला तरी त्याचा आपल्यासारख्या परिस्थितींत निभाव लागत नाहीं, असें मला स्वानुभवावरून आज कबूल करावें लागत आहे. पण एकदां स्वभाव बनून गेला म्हणजे तो बदलतां येत नाहीं.

मला लहानपणीं या गोष्टी कोणी सांगितल्या नाहींत आणि त्यामुळें लहान वयांत स्वभावाला वळण लावण्याची संधी मिळाली नाहीं. माझ्या अनुभवाचा फायदा आपल्याला मिळावा म्हणून आपल्याला सर्व गोष्टी मी मोकळ्या मनानें सांगत आहें.

ग्वाल्हेर राज्याची व महाराजांची सेवा करण्याचीं साधनें सुरक्षित ठेवण्यासाठीं तत्त्वनिष्ठा क्षणभर—मात्र क्षणभरच—बाजूला ठेवावी लागली तरी चिंता नाहीं असें मी आपल्याला सांगितलें. परंतु त्याचबरोबर मला तुम्हांला हें सांगितलें पाहिजे कीं या बाबतींत मला स्वतःला तत्त्वनिष्ठा सोडतां आली नाहीं. वास्तविक मी तसें करावयास पाहिजे होतें. परंतु रक्तपरंपरेनें आपल्यामध्यें असलेल्या तत्त्वनिष्ठेला राजकारणी वर्तनाचें वळण लावण्याचे प्रयत्न मी लहानपणीं केलेले नसल्यामुळें मला तें आतां शक्य होत नाहीं. एका वाक्यांत सांगावयाचें म्हणजे राजहिताचा किंवा लोकहिताचा जेथें प्रश्न असेल तेथें गाढवाला घोडा म्हटल्याशिवाय तें जर वजन उचलणार नसेल तर त्याला जरूर घोडा म्हणावें, पण त्याच्याकडून वजन उचलून घ्यावें. एवंच राजहित व राज्यहित कसेंही करून साधावें.

राजहित आणि राज्यहित यांचा विचार उदाहरणासाठीं सांगितला. व्यवहारांत असे दुसरे अनेक प्रसंग येतील कीं त्यावेळीं तत्त्वनिष्ठा क्वचित बाजूला ठेवावी लागेल. अशा प्रसंगीं तत्त्वापासून किती दूर जावयाचें तें त्या त्या परिस्थितीप्रमाणें ठरवावें लागेल.

आपण हें पत्र काळजीपूर्वक वाचावें आणि त्यासंबंधीं आपल्याला जें कांहीं विचारावेंसें वाटेल तें मोकळ्या मनानें विचारावें. आमच्या आणि तुमच्यामध्यें कोणताही आडपडदा असूं नये अशी आमची इच्छा आहे. आणि कोणताही प्रश्न आम्हाला विचारतांना आपल्याला संकोच वाटण्याचें कारण नाहीं. हे उत्तम आशिर्वाद.

तुमचा प्रिय तात

**'बाबा'**

## ३

॥ श्री ॥

संभाजी विलास,
ग्वाल्हेर,
२८ सप्टेंबर १९३५.

प्रिय **शंभू** यांस अनेकोत्तम प्रेमाशिर्वादः—

आपलें ता. २३ चें पत्र पावलें. आमची प्रकृति बरी आहे. आपल्या मातुःश्रींची प्रकृति अद्याप बरी नाहीं. अशक्तपणा फार आहे. तथापि काळजी नसावी; ईश्वराचे कृपें व पूर्वजांचे आशिर्वादें सर्व ठीक होईल.

आपल्या शाळेकडून आपल्या अभ्यासांतील प्रगतिसंबंधीचें पत्र आलें आहे. धार्मिक विषय आणि प्राणिशास्त्र हे दोन विषय सोडून बाकी सर्व विषयांत आपण पास झालां हें वाचून बरें वाटलें.

वुडस्टॉक हँडबुकची प्रत श्रीमंत दादामहाराजांस पाठविण्यास प्रत्यवाय नाहीं. अवश्य पाठवावी.

आमचीं पत्रें वाचून आपण जे प्रश्न विचारले आहेत त्यांचीं उत्तरें आम्हीं देणार आहोंत. आपणही मोकळ्या मनानें प्रश्न विचारण्यास

संकोच करूं नये. पत्रांतील विषयांसंबंधींच नव्हे तर आयुष्यांतील कोणत्याही गोष्टीसंबंधीं कोणताही प्रश्न विचारण्याचें आपल्या मनांत आल्यास तो प्रश्न लगेच विचारावा. आपण स्नेह्याशीं जितक्या मोकळेपणानें वागाल तितक्याच मोकळेपणानें आपण आम्हांला कोणत्याही गोष्टी विचाराव्या. पिता आणि माता यांच्यासारखे स्नेही कोणतेही नाहींत. आम्हांला प्रश्न न विचारतां आपण दुसऱ्या कोणाला विचारले तर त्यांत दोन प्रकारें तोटा होण्याचा संभव. एक तर कदाचित् त्याला त्या प्रश्नाचें उत्तर माहीत नसेल, आणि अशा वेळीं स्वतःचें अज्ञान झांकण्यासाठीं तो वाटेल तें सांगून देईल. दुसरें इतरांचा बुद्धिभेद करून आपला फायदा करूं इच्छिणारी मंडळी आपणांस चकविण्याचा प्रयत्न करतील. आपल्या आईबापांना विश्वासांत न घेतल्यामुळें किंवा स्वतः आईबापांनीं मुलांना आपल्या विश्वासांत न घेतल्यामुळें या लोकांची दिशाभूल होऊन आणि अशीं माणसें क्षुद्र अथवा नीच माणसांच्या कचाट्यांत सांपडून स्वतःचें आणि त्यांच्याशीं संबंध येणाऱ्या सर्वांचें अगणित नुकसान करून घेतात असें आपण व्यवहारांत नेहमीं पाहतों. याला उत्तम उपाय म्हणजे आई व बाप यांशीं मुलांनीं मोकळेपणानें वागणें हाच होय. आई व बाप यांना मुलांनीं विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर माहीत नसल्यास ते आपल्या अनुभवाप्रमाणें त्या प्रश्नाचें समर्पक उत्तर देणाराचा परिचय तरी करून देतील. अर्थात् मुलांची दिशाभूल होणें शक्य नाहीं. यावर भाग्य !

प्रायश्चित्तासंबंधीं आपण जें लिहिलें आहे तें अगदीं बरोबर आहे. धर्मशास्त्राचें खरें मत अगदीं तसेंच आहे. परंतु धार्मिक व्रतांचें अनुष्ठान हा ज्या ब्राह्मणांचा चरितार्थाचा उद्योग होऊन राहिला त्यांनीं याविषयीं भलत्याच मतांचा प्रसार स्वतःच्या लाभासाठीं करून ठेविला आहे. त्यामुळें आम्ही लिहिल्याप्रमाणें व्यापारी दृष्टीनें व्रतांचें आचरण करणारे मूढ लोकही पुष्कळ आढळतात.

वाइटालाच जास्त अनुयायी कां मिळतात या प्रश्नाचें उत्तर समजण्यास कठिण आहे हें खरें आहे. आमच्या तारीख १९ च्या पत्रांत याचें उत्तर थोडक्यांत दिलें आहे. प्रत्येकाचें आचरण कोणता तरी लाभ व्हावा या हेतूनें चाललेलें असतें. माणसें तेव्हांच वाईट आचरण करतात कीं जेव्हां तसें करण्यापासून आपला कांहीं लाभ होईल असें त्यांना वाटतें. पुष्कळ वेळां हा भ्रम ठरतो. परंतु लाभ होणार असें ठरलें तरी सुद्धां वाईट आचरण कां करूं नये त्याचें उत्तर त्याच पत्रांत दिलें आहे. बुद्धिमंद लोकांना तें समजणें कठिण असतें. अशांपैकीं अगदींच मूढ असतील अशांना तुरुंगवासासारख्या शारीरिक शिक्षा वाइटापासून परावृत्त करण्यासाठीं ठेवाव्या लागतात. त्यांच्याहून थोडे कमी मूढ असतात अशांसाठीं पारलौकिक हिताहिताची चिंता इत्यादि अशा तऱ्हेच्या पायऱ्या नीतिशास्त्रांत लावलेल्या असतात.

स्वामिनिष्ठा आणि देशाभिमान यांसंबंधीं आपण विचारलेला प्रश्न फारच महत्त्वाचा आहे. त्याचें उत्तर सांगण्यापूर्वी आम्हांला दुसऱ्या ज्या गोष्टी सांगावयाच्या आहेत त्या आपण समजून घेणें आव-

श्यक आहे. त्यानंतर या विषयांसंबंधीं सांगणें व समजणें सुलभ होईल.

आपण जो आणखी एक प्रश्न विचारला आहे त्याचा विचार प्रथम करतों. आपल्या देशाचा, राजाचा अथवा एकाद्या सज्जनाचा फायदा होत असला तर खोटें कां बोलूं नये हा तो प्रश्न होय. हाच आजच्या पत्राचा हेतु आहे आणि आजचें पत्र वाचल्यावर आपल्या शंकेचें समाधान होईल अशी आशा आहे.

मागल्या पत्रांत आम्ही तत्त्वनिष्ठेबद्दल सांगितलें. आपल्या हातून कांहीं कार्य व्हावें अशी ज्याची इच्छा असेल त्यानें आचरणाचीं कांहीं तत्त्वें निश्चित करून ठेविलेलीं असलीं पाहिजेत. आणि पुढें कोणत्याहि अडचणी आल्या तरी त्या तत्त्वांना धरून त्या माणसाचें आचरण झालें पाहिजे. असाच मनुष्य दृढनिश्चयी, शीलवान् किंवा ज्याला पक्क्या दिलाचा असें म्हणतात असा होऊं शकेल. अशाच माणसावर त्याच्या मित्रांचा, त्याच्या वरिष्ठांचा आणि त्याच्या अनुयायांचा दृढ विश्वास बसूं शकेल. अमुक एक प्रसंग आला असतां हा माणूस आपल्या निश्चयापासून कदापि ढळणार नाहीं असा भरंवसा ते बाळगूं शकतील; इतकेंच नव्हे तर विशिष्ट प्रसंगीं तो कसा वागेल यासंबंधीं त्यांना विश्वास असल्यामुळें ते त्याला सहाय्य करण्यासाठीं कचरणार नाहींत. परंतु कोणत्या प्रसंगीं कसें वागावयाचें याचीं तत्त्वें ज्या माणसाचीं ठरलेलीं नाहींत त्याला आपण स्वतः केव्हां कसें वागूं याचाच भरंवसा सांगतां येत नाहीं. मग इतरांना त्याच्याबद्दल काय

अटकळ करतां येणार? व्यवहारांत वापरण्यासाठीं सोन्याचीं किंवा चांदीचीं नाणीं लागतात. परंतु त्या नाण्यांच्या ऐवजीं कोणी सोन्याचे आणि चांदीचे तुकडेच खिशांत घेऊन बाजारांत गेला तर काय होईल? प्रत्येकाशीं व्यवहार करतांना अमुक एक सोन्याचा तुकडा कोणत्या कसाचा आहे, कोणत्या वजनाचा आहे, याची चिकित्सा प्रत्येक ठिकाणीं त्याला करावी लागेल आणि एका तासांत होणारें काम एका दिवसांत सुद्धां होणार नाहीं. पण त्याच सोन्याच्या किंवा चांदीच्या तुकड्याच्या ठिकाणीं राजाचा ठसा असणारें नाणें पुढें केलें तर कोणाही माणसाला त्याची किंमत निश्चित माहित असल्यामुळें व्यवहाराचें काम सहजासहजीं होईल.

एकाद्याचा स्वभाव अगदीं सोन्यासारखा उज्ज्वल आणि मौल्यवान असेल; पण त्यावर व्यवहार चोख करून जनमताचे ठसे मारून घेतल्याशिवाय आयुष्यांत स्वतःला आणि दुसऱ्यांना त्याचा उपयोग होणें फार कठिण आहे.

उलट, राजाचा ठसा असलेला कागद—नोट—हा त्याला स्वतःची कांहीं किंमत नसून सुद्धां वाटेल तितक्या सोन्याच्या बरोबरीनें चालूं शकतो. परंतु राज्य बदललें कीं त्या ठशाबरोबर त्या कागदाची किंमत नाहींशी होते.

तुमचा स्वभाव नोटेच्या कागदाइतका मौल्यहीन असला तरी चालेल, पण त्यावर ठसा उठवून त्याची किंमत चढवून घेतली पाहिजे, असें आमचें म्हणणें नाहीं. सोन्याच्या किंमतीचा टिकाऊपणा काग-

दाला कधींच मिळणार नाहीं. पण सोन्याचीं सुद्धां राजमान्य व जनमान्य नाणीं पाडल्याशिवाय त्याचा बाजारांत वस्तू विकत घ्यावयाला उपयोग होत नाहीं, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

हे ठसे म्हणजेच आजपर्यंतच्या मोठमोठ्या लोकांच्या अनुभवावरून उत्तम म्हणून ठरलेलीं तत्त्वें होत. तत्त्वनिष्ठ माणसानें आचरणांत कोण-कोणतीं तत्त्वें सांभाळावीं त्यासंबंधीं आतां क्रमाक्रमानें सांगणार आहों. आज "सत्याचरणा"संबंधीं सांगतों.

सत्याचें महत्त्व आपल्याला समजून देण्याची कांहीं आवश्यकता आहे असें वाटत नाहीं. आपल्या कुलांत परंपरेनेंच त्याला फार महत्त्व दिलें गेलें आहे, आणि त्याचें महत्त्व तुमच्या मनावर ठसविण्याचे प्रयत्न आम्ही व तुमच्या मातुःश्रींनीं तुमच्या बालपणापासून कसे केले आहेत तें तुमच्या स्मरणांत असेलच. एकदां तुम्ही खेळत असतां तुमचा पतंग वाड्याच्या खेळाच्या मैदानांतील बेलाच्या झाडावर अडकला. चोरांना येतां येऊं नये म्हणून जवळच अवाराच्या भिंतींवर विजेची अनवेष्टित जिवंत तार लावलेली होती. त्यावेळीं तुमच्याबरोबर खेळा-वयाला आलेला एक मुलगा पतंग काढण्यासाठीं त्या झाडावर चढला. त्या वेळचे तुमचे शिक्षक होते त्यांनीं मुलाला झाडावर चढावयाला हरकत केली नाहीं; परंतु मी पहात आहें असें दिसतांच ते म्हणूं लागले, "तरी मी सांगत नव्हतों त्या झाडावर चढूं नका म्हणून?" हें त्यांचें म्हणणें असत्य होतें, आणि त्यासाठीं त्यांना सेवानिवृत्त करावें लागलें. दुसरी गोष्ट तुमची स्वतःची तुमच्या ध्यानांत

असेल. ती मोटारींतील पंख्याबद्दलची. तिसरी भाऊची दोनप्रहरच्या झोपेची.

आमच्या वडिलांची तर सत्याविषयीं आमच्याहूनही कडक कदर होती. अगदीं बारिक सारिक यःकश्चित् गोष्टींतसुद्धां त्यांना थोडें सुद्धां असत्य खपत नसे. "कोठें होतां?" असें त्यांनीं विचारलें तर त्याला "इथेंच बाहेर होतों" असें उत्तर देऊन कधींच भागत नसे. कोठें तो मनुष्य असेल त्या जागेचें नांव सांगावें लागत असे. यासाठीं पुढें तर आम्हांला एक वहीच ठेवावी लागली. म्हणजे गांवांतून फिरून आलों तर कोठकोठून आलों तीं तीं ठिकाणें वहींत लिहून ठेवण्यास बरें; नाहींतर सांगतांना चुकून एकादें ठिकाण विसरावयाचें!

खोटें बोलण्याच्या संवयीपेक्षां अधिक त्याज्य, तिरस्करणीय आणि गुन्हेगारीची दुसरी कोणतीही गोष्ट नाहीं. कारण इतर तिरस्करणीय गोष्टी एकएकट्या तरी येऊं शकतील. एकाद्याला दारू पिण्याचें व्यसन असेल, पण इतर बाबतींत तरी तो मनुष्य चांगला असूं शकेल. परंतु असत्याच्या संवयीचें तसें नाहीं. असत्याच्या बुडाशीं आणखी कित्येक घाणेरड्या गोष्टी लपून बसलेल्या असतात. साधारणपणें मत्सर, अप्पलपोटेपणा, भ्याडपणा किंवा पोकळ डामडौलाची हौस, यांमुळेंच माणसांना असत्याचरणाचा मोह उत्पन्न होतो. परंतु ज्या हेतूनें मनुष्य असत्याचरण करतो तो हेतु मात्र अखेरीस पूर्णपणें फसतो. कारण असत्य हें केव्हांना केव्हांतरी उघडकीस येतेंच. एकाद्या माणसाचें नुकसान करण्यासाठीं किंवा त्याच्या शीलावर शिंतोडे उडविण्यासाठीं

आपण एकाद्या खोट्या गोष्टीची जाणून सवरून मत्सरानें प्रसिद्धी केली तर त्या माणसाचें कांहीं काळपर्यंत आपण नुकसान करूं शकूं. परंतु परिणामीं मात्र सर्वांत जास्त नुकसान आपलेंच होईल. कारण एकदां कां आपला कावा उघडकीस आला कीं आपली जन्माची नाचक्की झाली. आणि मग त्या माणसाचें खरोखरीचेंच एखादें दुष्कृत्य आपण सांगूं लागलों आणि तें कितीहि खरें असलें तरी आपल्यावर कोणी विश्वास ठेवणार नाहीं. आपल्या हातून घडलेली एखादी लज्जास्पद गोष्ट लपविण्यासाठीं किंवा एकादें संकट येईल अशा भीतीनें आपण खोटें सांगितलें, किंवा सारवासारव केली तर ती लज्जा किंवा तें संकट हीं टळत तर नाहींतच उलट अधिक तीव्र होतात आणि त्याबरोबरच आपण अत्यंत नीच आणि हलक्या मनोवृत्तीचे आहों असें जाहिर होतें. दुर्दैवानें आपल्या हातून चूक झाली तर मोकळ्या मनानें ती कबूल करण्यांतच मनाची विशालता आणि थोरपणा आहे. आपली सुधारणा करण्याचा तो एकच मार्ग आहे. चुकीवर सारवण घालण्याचा प्रयत्न करणें केव्हांही त्याज्य आहे आणि आपण जर इतका मनाचा मोकळेपणा दाखविला तर ज्याच्याविरुद्ध ती चूक झाली असेल तोहि आनंदानें क्षमा करतो. परंतु ती चुकी नाकबूल करणें किंवा छपवाछपवी करण्याचा प्रयत्न करणें यामुळें आपण इतके भ्याड आणि नालायक ठरतों, कीं पुन्हां आपल्याशीं संबंध ठेवतांना त्या दुसऱ्या माणसाला विचारच पडतो.

भ्याडपणामुळें खोटें बोलणाऱ्या माणसापेक्षांही तिरस्करणीय

असा खोटें बोलणारांचा आणखी एक प्रकार आहे. तो म्हणजे पोकळ डौलासाठीं खोटें बोलणारांचा. या प्रकारचें आचरण करणाऱ्या लोकांची संख्या फार मोठी असते. कारण त्यांचा असा समज असतो कीं त्यांत ते कोणाचेंच नुकसान करीत नाहींत. हा समज पुष्कळ अंशीं खराही असेल. पण या प्रकारांतही ते आपलें स्वतःचें किती नुकसान करून घेतात त्याचा विचार करीत नाहींत. त्यावेळीं भोवतालीं बसलेल्या चार मंडळींना खूष करण्यासाठीं किंवा आपण कोणीतरी मोठे आहोंत असा त्यांचा समज करून देण्यासाठीं हे लोक काय वाटेल तें सांगतात. हे लोक आपण होऊन एखाद्या मोठ्या माणसाकडे गेलेले असतात, आणि तेथें वाजवीपेक्षां जास्त वेळ निर्लज्जपणें बसलेले असतात. पण कोणी विचारलें तर “ काय करावें ? त्यांनीं आग्रह केला, उठतां येईना ” असें खुशाल ठोकून देतात. अशा प्रकारचीं माणसें आपणांस दरबारांत प्रतिदिनीं पहावयास सांपडतात. दरबारांत अत्यंत उच्च शिखरावर पोहोंचून आणि आपल्या आयुष्याच्या उत्तर टोकाला टेकले असूनही यांचा हा लोकांना ठकविण्याचा प्रयत्न चालूच असतो याचें नवल वाटतें. इतकें करूनही या मंडळींच्या लबाड्या मालकांच्या व इतरांच्या नजरेस येतातच. खरी गोष्ट अर्थातच फार वेळ लपून राहत नाहीं. पण लोक असा विचार करतात कीं अगदीं क्षुल्लक बाबतींत कांहीं कारण नसतांना जर हा गृहस्थ सहज खोटें बोलूं शकतो तर याच्या स्वार्थाचा प्रश्न उत्पन्न झाला तर हा काय करील ? फुशारकी मारण्याच्या या संवयीनें कित्येक लोक दुसऱ्याचा विश्वास कायमचा गमावून बसतात.

सत्याचें आचरण करण्याचा निश्चय असलेल्या माणसापुढें पुष्कळ वेळां पेच पडतात. अशा प्रसंगीं बावरून जावूं नये म्हणून सत्याचरणाचा खरा अर्थ काय आहे हें आपण निश्चित ठरविलें पाहिजे. उदाहरणासाठीं कल्पना करा कीं एक गाय कसायाच्या हातून सुटून पळून चालली आहे. तुम्ही तिला चौकांतून पूर्वेकडच्या रस्त्यानें जातांना पाहिलें. मागून कसाई आला आणि "गाय पाहिलीत काय? कोठें गेली?" असें तुम्हाला विचारूं लागला. अशा वेळीं तुम्ही काय कराल? अशा वेळीं सत्याचा अर्थ काय असा प्रश्न उत्पन्न होतो. सत्याचा अर्थ वस्तुस्थिति दुसऱ्याला सांगणें. अर्थात वस्तुस्थिति दुसऱ्याला सांगणें हें योग्य कीं अयोग्य हें त्या त्या प्रसंगावर अवलंबून राहील. शत्रूला वस्तुस्थिति केव्हांच समजूं देणें योग्य नसतें. वरच्याच उदाहरणांत कित्येक लोक असें म्हणतील कीं, अशा वेळीं आपण कांहींच बोलूं नये. परंतु आपण कांहीं बोललों नाहीं तर कदाचित् कसाई पूर्वेकडच्याच रस्त्यानें जाईल. या उदाहरणांत गाईला वाचविणें हें आपलें ध्येय आहे आणि तें साध्य करण्यासाठीं अनुकूल अशी परिस्थिति निर्माण करणें हेंच सत्याचरण नसलें तरी सदाचरण किंवा चांगलें आचरण आहे. म्हणून अशा वेळीं आपण कसायाला सांगितलें पाहिजे कीं "होय, मी गाय पाहिली. ही आत्तांच पश्चिमेकडे निघून गेली."

कांहीं झालें तरी सत्याचरण हा सदाचरणाचा एक भाग आहे हें विसरतां कामा नये. आणि एका भागाचा सबंध वस्तूशीं विरोध येईल

तेव्हां ती सबंध वस्तू राखून ठेवण्यासाठीं त्या भागाचा त्याग करणें हेंच शहाणपणाचें आहे. आपण सत्यप्रिय आहों अशी आपली कीर्ति शत्रु आणि हलकट लोक यांच्यामध्यें होण्यांत कांहींच महत्त्व नाहीं. धर्मराजाच्या सत्यप्रियतेचा अशा रीतीनें फायदा घेण्याचा प्रयत्न कौरव करीत असतां स्वतः भगवान् श्रीकृष्णानें त्याला खोटें बोलावयास सांगितलें ही गोष्ट तुम्हांला माहीत आहेच. आणि त्या वेळीं मात्र धर्मराज सत्यवक्ता आहे अशी कौरवांची जी खात्री होती तिचा पांडवांना उपयोग झाला. कारण यामुळेंच धर्मराजानें खोटी गोष्ट सांगितली असूनही तिच्यावर कौरवांचा विश्वास बसला. औरंगजेबाच्या कैदेंतून निघतांना शिवाजी आणि संभाजी हे ज्या पेटाऱ्यांत बसले होते त्यांत मेवामिठाई आहे असें सांगायला शिवाजीनें आपल्या नोकरांना सांगितलें होतें. परंतु या त्याच्या असत्याचरणाबद्दल त्याला कोणीही दोष देऊं शकत नाहीं.

मात्र असत्याचा उपयोग फक्त शत्रूंशीं वागण्यापुरताच करावयाचा असतो.

असें असलें तरी सत्य बोलणें तें सुद्धां कोणाशीं बोलावें, कशाविषयीं बोलावें आणि कसें बोलावें हे प्रश्नही व्यवहारांत ज्याला उपयोगी आणि यशस्वी व्हावयाचें असेल त्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाचे आहेत.

या संबंधीं " सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् न ब्रूयात् सत्यमप्रियम्। " म्हणजे " खरें बोलावें आणि दुसऱ्यांना प्रिय असेल तें बोलावें; पण

अप्रिय अशा गोष्टी सत्य असल्या तरी बोलूं नयेत, हें संस्कृत सुभाषित ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

पुष्कळ लोकांना आपण सत्यवक्ते आहोंत असा मोठा अभिमान असतो. आणि ते दुसऱ्या लोकांचे दोष त्यांच्या तोंडावर सांगून आपला सत्यवक्तेपणा प्रगट करतात. वास्तविक दुसऱ्याचे दोष सांगण्याचें काम फक्त एकाच माणसाचें आहे आणि तें म्हणजे पालकाचें. मग त्या पालकाचें नातें आई, बाप, स्वामी, गुरु यांपैकीं कोणतेंही असो. पण आपण दुसऱ्याचे पालक नसतांना दुसऱ्याचे दोष दाखविण्याचा आपल्याला कांहींही अधिकार नाहीं. ही खूणगांठ बांधून ठेवा कीं जगांत असा मनुष्य क्वचित्च सांपडेल कीं ज्याला दुसऱ्यानें आपले दोष दाखविले असतां बरें वाटेल. मग तो कितीही निकटचा मित्र असो. पुष्कळ वेळां असें होतें कीं एकादा मनुष्य आपल्याला सांगतो "तुम्ही माझे दोष मला सांगत चला, म्हणजे मी ते सुधारूं शकेन." अशा वेळीं भोळेपणानें तुम्ही त्याला खरोखरच त्याचे दोष दाखवूं लागाल तर सपसेल फसाल. त्याची अशी अपेक्षा असते कीं आपण दोष दाखवा असें सांगितलें असतांही आपल्यांत दोष नाहींत असें दुसऱ्यानें सांगावें. आणि अशी त्याची अपेक्षा असते याची पुष्कळ वेळां त्याला स्वतःला कल्पनाही नसते. पण तुम्ही त्याला दोष दाखवूं लागलांत म्हणजे मात्र तो दोषच कसा नाहीं किंवा तुमचा गैरसमज कसा झाला आहे हें तो तुम्हांला पटवून द्यावयाला लागेल आणि तरीही तुम्हीं आपलें म्हणणें कायम धरून बसलांत तर तुम्ही दोषैक-

दृष्टि आहांत असा तो शेरा मारील आणि उपकार करूं पहात असतां तुम्हीं एक मित्र गमावून बसाल. आमचा स्वतःचा अनुभव तरी असा आहे. तेव्हां सत्य बोलावयाचें तें दुसऱ्याच्या दोषांविषयीं कधीं बोलूं नये. त्याच्या स्वभावासंबंधीं बोलावेंच लागलें तर गुण माहीत असतील त्यासंबंधीं बोलावें, किंवा गप्प बसावें. दोषांची यादी आपण आपल्या मनांत करून ठेवावी; आणि त्याच्याशीं वागतांना तिचा सावधपणें उपयोग करावा.

त्याच प्रमाणें सत्य कसें बोलावें याकडेही लक्ष दिलें पाहिजे. पुष्कळांना सत्य, स्पष्टोक्ति, आणि उर्मटपणा यांतला फरकच कळत नाहीं. "क्ष" चा बाप मेला" आणि "क्ष" चे वडील वारले" अशा दोन प्रकारांनीं एकच सत्य सांगतां येतें. कोणता प्रकार कोठें उपयोगांत आणावयाचा तें ध्यानांत ठेवलें पाहिजे. अशा प्रकारें बोलूं नये कीं त्यामुळें कोणाचें मन दुखावेल. यासंबंधीं एक गमतीची गोष्ट सांगून हें पत्र पुरें करतों. एका राजाकडे एक ज्योतिषी गेला. राजाची पत्रिका पाहून ज्योतिषानें फार आंबट तोंड केलें आणि सांगितलें, "महाराजांवर दुर्दैव ओढावणार असें ही पत्रिका सांगते. महाराजांच्या कुटुंबांतील सर्व माणसें महाराजांच्या आधीं मरणार." राजानें त्या ज्योतिष्याला फांशी देण्याचा हुकूम दिला. कांहीं दिवसांनीं दुसरा ज्योतिषी आला. पत्रिका तीच होती. पण त्यानें सांगितलें, "पत्रिका मोठी भाग्याची आहे. महाराजांना दीर्घायुष्य आहे. कुटुंबांतल्या सर्व माणसांपेक्षां महाराजांना आयुष्य जास्त आहे." अर्थात त्या ज्योतिष्याला मोठें इनाम

मिळालें. तेव्हां सत्यच पण तें कसें बोलावें याकडेही लक्ष दिलें पाहिजे. हे उत्तम आशिर्वाद.

तुमचा प्रिय तात

**'बाबा'**

## ४

॥ श्री ॥

संभाजी विलास,
ग्वाल्हेर,
११ ऑक्टोबर १९३५

प्रिय **शंभू** यांस अनेकोत्तम प्रेमाशिर्वाद:—

आपलें ता. ५ चें पत्र पावलें. आमची उभयतांची प्रकृति परमेश्वरकृपेनें बरी आहे.

तुम्ही पत्रांत दोन प्रश्न विचारले आहेत. त्यांपैकीं पहिल्या म्हणजे क्षमेसंबंधींच्या प्रश्नाचें उत्तर सामान्य स्वरूपांत देणें थोडेंसें कठीणच आहे. हा प्रश्न तुम्हांला या वेळीं कां सुचला तें समजलें असतें तर या प्रश्नाचें उत्तर देणें सोपें गेलें असतें. अमुक एका माणसाला क्षमा करावी कीं करूं नये असा प्रश्न तुमच्यापुढें आला आहे कीं काय ? तरी पण सामान्यत: या संबंधीं आम्हांला जें वाटतें तें सांगण्यास प्रत्यवाय नाहीं.

विशिष्ट प्रसंगीं क्षमा योग्य आहे कीं नाहीं हें ठरवितांना दोन गोष्टींचा विचार केला पाहिजे. अपराधी माणसाचें आपल्याशीं नातें

कोणत्या प्रकारचें आहे आणि त्या क्षमेचा आपल्या स्वतःवर, त्या अपराधी माणसावर किंवा इतरांवर काय परिणाम होईल.

अपराधी माणसाचें आपल्याशीं नातें तीन प्रकारचें असूं शकेल. तो आपल्याहून कनिष्ठ असेल, आपल्या बरोबरीचा असेल किंवा आपल्याहून वरिष्ठ असेल.

सामान्यतः क्षमाशीलता हा एक महत्त्वाचा सद्गुण आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिक्षा केल्यानें किंवा सूड घेतल्यानें आपल्या मनाचें फार तर समाधान होईल. परंतु अपराधी माणसाच्या मनावर तिचा कितपत परिणाम होईल हा प्रश्न आहे. आपल्या शिक्षेला विरोध करण्यास असमर्थ असेल तर शिक्षा त्याला सोसावी लागेल. परंतु त्यामुळें कदाचित् तो आपल्या मनांत कायमची अढी धरून बसेल. उलट क्षमा केल्यानें आपल्या मनाला तर समाधान होतेंच आणि शिवाय त्या अपराधी माणसाच्याही मनावर चांगला परिणाम होतो. अशीं कित्येक उदाहरणें आढळतात कीं दोन माणसांची प्रथम ओळख एखाद्या भांडणांत झाली, परंतु दोघांच्याही उदारपणामुळें ते अत्यंत दृढ स्नेही बनले.

क्षमेपासून हा लाभ फार मोठा आहे. अपराध झाल्याखेरीज क्षमेचा प्रश्नच उद्भवत नाहीं. परंतु अपराध झाला याचाच अर्थ आपण व तो अपराध करणारा मनुष्य एकमेकांपासून दूर झालों. अशा स्थितींत योग्य वेळीं क्षमेचा उपयोग केला तर हीं दूर झालेलीं दोन मनें पूर्ववत् जवळ येतात इतकेंच नव्हे तर तीं पूर्वीपेक्षांही अधिक दृढतेनें स्नेहबद्ध होतात.

परंतु क्षमा करण्यास योग्य वेळ कोणती हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. एकाद्या माणसाच्या हातून चुकून अपराध होतो आणि मग त्याला त्याबद्दल वाईट वाटतें; किंवा करतांना एकादी गोष्ट जाणून बुजून केलेली असूनही मागून आपली चूक समजून आल्यामुळें एकाद्याला अंतःकरणपूर्वक पश्चात्ताप होतो. अशा वेळीं क्षमा करणें हें दोघांच्याहि दृष्टीनें फार हितावह असतें. ज्याच्या हातून चुकून अपराध झाला किंवा ज्याला मनःपूर्वक पश्चात्ताप झाला अशा माणसाला शिक्षा करण्याचा किंवा त्याचा सूड घेण्याचा हट्ट धरल्यानें आपण एक चांगला मित्र किंवा उपकारबद्ध अनुयायी मिळविण्याची संधी व्यर्थ घालविली एवढेंच होईल.

या पश्चात्तापाच्या बाबतींत मात्र सावधपणा राखणें आवश्यक आहे. मागल्या एका पत्रांत पापपुण्याच्या बाबतींत देवाशीं व्यापार करणारे कांहीं लोक असतात असें सांगितलें आहे. त्याच प्रमाणें पश्चात्तापाचा व्यापार करणारेही कांहीं लोक असतात हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. लबाडी तर जाणून बुजून करावयाची, परंतु मागून पश्चात्तापाचें नाटक इतकें करावयाचें कीं कोणाच्याही मनाला पाझर फुटावा. एखादा मनुष्य क्षमाशील आहे अशी त्याची कीर्ति झाली कीं त्याच्याभोंवतीं अशीं नाटकें फार सुरू होतात. यांच्यापासून नेहमीं सावध राहिलें पाहिजे. अशा स्थितींत आपल्या क्षमाशीलतेपेक्षां करड्या वृत्तीचा बोभाटा होणेंच अधिक श्रेयस्कर आहे.

ज्या वेळीं अपराध चुकून झाला असेल किंवा बुद्धिपूर्वक केला

असून पश्चात्ताप झाला नसेल अशा वेळीं क्षमेचा उपयोग फार जपून केला पाहिजे. अशा तऱ्हेचे अपराधी आपल्यापेक्षां कनिष्ठ असतील तर त्यांना क्षमा करणें क्वचितच योग्य होईल. अशा वेळीं क्षमा केली तर हे अपराध करणाऱ्या लोकांना उलट अधिक उत्तेजन येईल आणि आपण भ्याड, कच्च्या दिलाचे आहों असा त्यांचा समज होऊन, त्याचा ते गैरवाजवी फायदा घेण्याचा प्रयत्न केल्यावांचून राहणार नाहींत.

आपल्या बरोबरीच्या माणसांच्या बाबतींत मात्र अशा वेळींही क्षमा करणें पुष्कळ वेळां श्रेयस्कर ठरतें. क्षमा करण्यांत आपला जो उदारपणा व्यक्त होतो, त्यामुळें त्यांना आधीं पश्चात्ताप झाला नसला तरी मागून लाज उत्पन्न होते आणि आपल्या शत्रूंची संख्या वाढण्याची आपत्ति दूर होते. कारण ही गोष्ट निश्चित ध्यानांत ठेवावी कीं जेव्हां जेव्हां आपण बरोबरीच्या माणसावर सूड घेण्याचा किंवा त्याला शासन करण्याचा प्रयत्न करतों तेव्हां तेव्हां आपण एक शत्रू कायमचा निर्माण करीत असतों; आणि आपल्या शत्रूंची संख्या निष्कारण वाढूं देणें केव्हांही वेडेपणाचेंच आहे.

आपल्यापेक्षां श्रेष्ठ माणसानें आपला अपराध केला तर क्षमा करावी कीं नाहीं हें त्या त्या प्रसंगानुसार ठरवावें लागेल. तो मनुष्य केवळ बलानेंच नव्हे तर मानानेंही आपल्यापेक्षां श्रेष्ठ असेल आणि त्याच्यासंबंधीं एरवीं पूज्यभाव बाळगणें हें आपलें कर्तव्य असेल तर त्याला कोणत्याही प्रसंगीं क्षमा करणें आपलें कर्तव्य आहे. त्याच्या एखाद्या कृत्यानें आपलें मन दुखावलें गेलें असेल तर ती गोष्ट फार

तर अत्यंत नम्रपणें त्याच्या दृष्टीस आणावी. परंतु माता, पिता, स्वामी, गुरु अशांसारखीं आपल्याला पूज्य आणि प्रिय अशीं जीं माणसें असतात त्यांना रागानें दुरुत्तर करून त्यांचें मन दुखविणें किंवा त्यांच्यासंबंधीं मनांत सूडबुद्धि बाळगणें हें केव्हांही त्याज्यच होईल.

अपराधी मनुष्य हा केवळ बलानें आपल्यापेक्षां श्रेष्ठ असेल अशा वेळींसुद्धां त्याला क्षमा करणें हें पुष्कळ वेळां व्यवहारदृष्ट्या शहाणपणाचें असतें. त्याच्याशीं दोन हात करून त्याला नरम आणणें शक्य नसलें, तर आपण त्याच्याकडे दुर्लक्ष केल्यानेंच तो पुष्कळ वेळां लज्जित होतो आणि आपला कार्यभाग साधतो. अत्यंत सभ्य आणि मधुर शब्दांत अशा माणसाचे त्यानें केलेल्या अपराधाबद्दल आभार मानावे. कारण आपल्यापेक्षां बलिष्ठ मनुष्य आपल्याला डिंवचतो तो आपण त्याच्याशीं भांडावें आणि मग त्यानें आपल्याला पराभूत करावें अशाच हेतूनें डिंवचतो. अशा वेळीं त्याचा हेतू विफल करणें हेंच आपलें मुख्य काम आणि त्यासाठींच वर सांगितलेल्या युक्तीचा अवलंब केला कीं त्याला मेल्याहून मेलें होतें.

शेवटीं एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे, ती ही कीं, आतांपर्यंत जें सांगितलें तें केवळ आपला स्वतःचा कोणी अपराध केला असतां काय करावें त्यासाठीं आहे. परंतु जर आपलें कुल, आपला राजा, आपला देश किंवा आपला धर्म याचा कोणी अपमान केला तर त्याला मात्र अंतःकरणपूर्वक पश्चात्ताप करावयास लावणें किंवा आपल्या शक्तीची पराकाष्ठा करून शासन करणें हेंच आपलें कर्तव्य आहे.

आदेश

आपल्या प्रश्नाच्या उत्तरांत आम्हांला ज्या गोष्टी सुचल्या त्या लिहिल्या आहेत. त्यांत आपल्याला कांहीं शंका येत असतील तर त्या अवश्य विचाराव्या. हेंच पत्र बरेंच लांबलें आहे, म्हणून आपल्या जातिभेदासंबंधीच्या प्रश्नाचें उत्तर पुढील पत्रांत देऊं. हे उत्तम आशिर्वाद.

तुमचा प्रिय तात

**'बाबा'**

# ५

॥ श्री ॥

संभाजी विलास,
ग्वाल्हेर,
१७ ऑक्टोबर १९३५.

अनेकोत्तम प्रेमाशिर्वाद :—

तुमचें ता. १२ चें पत्र मिळालें. तुम्ही आपल्या मित्राला येथें अवश्य बोलवावें. परंतु त्यांत त्याच्या आईवडिलांना वाईट वाटणार नाहींना याची आधीं खात्री करून घेतली पाहिजे. वर्षातून एकदांच येणाऱ्या मोठ्या सुट्टींत तरी मुलांनीं आपल्याजवळ रहावें असें सर्व आईबापांना वाटत असतें. आमचीं मुलें सुट्टींत आमच्याजवळ रहाण्यास आलीं नाहींत तर आम्हांला चैन पडणार नाहीं. पण तुमच्या मित्राच्या घरच्या माणसांकडून परवानगी मिळत असेल तर त्याला अवश्य बोलावणें करावें. आम्हांला त्यांत आनंदच आहे.

आम्हीं तिकडे केव्हां येऊं तें निश्चित ठरलें नाहीं.

परमेश्वरकृपेनें आमची उभयतांची प्रकृति बरी आहे.

विसाव्या शतकांत जातिभेद कितपत उपयोगी आहे व तो कितपत पाळावा असें तुम्ही मागल्या पत्रांत विचारलें आहे.

या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वीं एक गोष्ट तुमच्या ध्यानांत आणून देणें अवश्य आहे. तुम्ही आतां भूगोल शिकलां आहांत. तुम्हांला जर विचारलें कीं पृथ्वीच्या पृष्ठभागाची सध्याची रचना कितपत सोयीची आहे ? ती बदलण्याचा अधिकार तुम्हांला दिला तर तुम्ही काय कराल ? मला वाटतें तुम्हीं पुष्कळच सुधारणा सुचवाल. वाऱ्याचे प्रवाह, पाण्याचे प्रवाह, उष्णता, इत्यादि निसर्गाचे सर्व नियम ध्यानांत घेऊन सुद्धां पृथ्वीचा पृष्ठभाग आहे त्यापेक्षां पुष्कळच सुखकर असा बनविणें निसर्गाला शक्य झालें असतें. भूगोलविषयांतला एक करमणुकीचा प्रश्न म्हणून या प्रश्नाचा विचार मोठा मनोरंजक होतो. तुम्ही तो पुष्कळ वेळां केलासुद्धां असेल. भूभाग तेवढा समशीतोष्णकटिबंधांत ( Temperate Zone ) असावा, आणि समुद्र उष्णकटिबंधांत ( Torried Zone ) असावा, प्रत्येक देशाला एक एक हिमाच्छादित पर्वत असावा, म्हणजे मौजेपुरता पाऊस पडून सुद्धां नद्या बारा महिने वहात राहिल्यामुळें दुष्काळ पडणार नाहीं आणि विजेचे कारखाने अल्प प्रयत्नांत चालवितां येतील, इत्यादि पुष्कळ सुधारणा तुम्हीं सुचवाल. आपल्याला हवासा वाटतो तसा भूपृष्ठभाग असता तर फार चांगलें झालें असतें, याबद्दल कोणाचाहि मतभेद होणार नाहीं. परन्तु असें आहे म्हणून जगांतले सर्व एंजिनिअर लोक उष्णकटिबंधांतील जमीन खणून काढून त्या

मातीनें समशीतोष्णकटिबंधांतील समुद्र भरून टाकून तेथें भूमि निर्माण करण्याच्या उद्योगाला लागण्याचा विचार करूं लागले, तर वेड्यांच्या इस्पितळांवरचा खर्च फार वाढवावा लागेल ! पृथ्वीचा पृष्ठभाग आहे अशा स्थितींत कोणत्या कारणांमुळें आला, तो आपल्याला रहावयास सुखकारक होण्यासाठीं त्यावर कोणतीं कामें करणें माणसाच्या शक्तीच्या आटोक्यांत आहेत, त्याचा व्यवहाराच्या दृष्टीनें विचार करून कामाला लागणें हेंच एंजिनिअरांचें काम आहे.

विसाव्या शतकांत जातिभेद उपयोगी नाहीं हें खरें आहे; पण म्हणून तो अजिबात मोडून काढूं असें म्हणणारे लोक पृथ्वीचा पृष्ठभाग इकडचा तिकडे करूं पहाणाऱ्या इंजिनिअरांइतकेच चतुर ठरतील !

जातिभेद मुख्यतः तीन गोष्टींत पाळला जातो. पूजन, भोजन आणि लग्नव्यवहार. जातिभेदामध्यें ज्या अनेक गोष्टी येतात, त्यांचा वेदकालापासूनचा इतिहास पहाणें अत्यंत मनोरंजक आणि बोधप्रद आहे. उदाहरणासाठीं पूजन ही पहिली गोष्ट घ्या. या बाबतींत आजची स्थिति अशी आहे. कित्येक देवळांतील मूर्तींना ब्राह्मणांखेरीज कोणत्याहि जातीचे लोक स्पर्श करूं शकत नाहींत. कित्येक देवळांच्या गाभाऱ्यांत ब्राह्मणांखेरीज दुसऱ्या जातींचे लोक जाऊं शकत नाहींत. सर्व देवळांच्या सभामंडपांत सर्व लोक जाऊन देवदर्शन करूं शकतात. पण बहुतेक सर्व देवळांत अजून हिंदू देवतांचेंच पूजन करणाऱ्या अस्पृश्यांना देवदर्शन करण्याची बंदी आहे. आणि कार्तिकस्वामीच्या देवळांत कोणत्याहि जातीच्या स्त्रियांना सर्वकाळ बंदी आहे. ही झाली

सध्यांची स्थिति; पण याच्या पूर्वीचा इतिहास पाहिला तर? राम व कृष्ण हे सध्यां हिंदूंच्या पूजेंत प्रामुख्यानें येणारे देव. यांचा अवतार क्षत्रिय कुलांत झाला होता. शंकर हा देव तर उघड उघड अनार्यांचा. पण आपल्या मुत्सद्दी आर्यपूर्वजांनीं अनार्यांच्या देवाला स्वतःचा महादेव बनवून अनार्यांना आनंदानें आपलें दास्य पत्करावयास लाविलें! मुसलमान आणि ख्रिस्ती या दोन्ही धर्मांत राजा असो वा रंक असो, ते दोघेहि मंदिरांत एकाच आसनावर बसून प्रार्थना करूं शकतात. सर्व हिंदू जर देवासमोर इतक्याच एकत्वाच्या भावनेनें उभे राहतील तर हिंदुधर्माची शक्ति अनंतपटीनें वाढेल यांत संशय नाहीं. याच वेळीं हेंहि ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं पूर्वकाळांतल्या हिंदूंनीं मंदिरांत असे भेद निर्माण केले याबद्दल त्यांना दूषणें देऊन आपलें अज्ञान प्रगट करणें वेडेपणाचें आहे. हे भेद हिंदुस्थानांत कोणत्या परिस्थितींत निर्माण झाले याचा विचार केला म्हणजे पूर्वजांच्या धोरणाबद्दल अनादर बाळगण्यास सवड रहाणार नाहीं. ती सर्व हकीकत या लहानशा पत्रांत लिहिणें अशक्य आहे. एकच गोष्ट सांगितली म्हणजे तिची कल्पना येईल. सर्व माणसें एकाच आकाशांतील बापाचीं मुलें असें ख्रिस्ती लोक मानतात. पण दक्षिण आफ्रिकेंत त्या बापाची प्रार्थना करण्यासाठीं गोरीं मुलें ज्या देवळांत जातात, त्या देवळांत जाण्यास काळ्या मुलांना बंदी आहे; कारण हिंदुस्थानांतल्या आर्यांना प्रथम ज्या अडचणी आल्या त्याच त्यांना आतां तेथें येत आहेत. परंतु याचा अर्थ असा नव्हे कीं जे भेद आजच्या काळांत हिंदुसमाजाला

हतबल करतात, त्यांना आपण चिकटून रहावें. परमेश्वराच्या दारीं सर्व हिंदूनीं बंधुभावानेंच नम्र झालें पाहिजे, आणि त्यासाठीं प्रत्येकानें शक्य तितका प्रयत्न केला पाहिजे.

दुसरी गोष्ट भोजनव्यवहाराची. यालाच रोटीबंदी असें म्हणतात. या रोटीबंदीनें हिंदुसमाजाचें मोठेंच अहित केलें आहे यांत शंका नाहीं. कोणाहि माणसाच्या स्पर्शानें अन्न आपल्याला खावयाला अयोग्य होतें ही कल्पनाच संकुचित अतएव पराक्रमीवृत्तीला बाध आणणारी आहे. अन्नाच्या बाबतींत दोनच गोष्टी पाहिल्या म्हणजे पुरे—स्वच्छता आणि पौष्टिकता. हे दोन गुण असलेलें अन्न सर्वांना सारखेंच हितकारक होईल. उत्तरेकडे तर ही रोटीबंदीची प्रथा हास्यास्पद कोटीला जाऊन पोहोंचली आहे. नऊ पुरभय्ये आणि दहा चुली ही म्हण या गोष्टीची साक्ष देते. दक्षिणेकडे आतां खाजगी व्यवहारांत तरी ही रोटीबंदी नाहींशी होत चालली आहे आणि सार्वजनिक व्यवहारांतूनहि लवकरच जाईल असें वाटतें. शाळाकॉले-जांच्या संमेलनांत तर सर्व जातींचीं मुलें ( क्वचित् अस्पृश्यांचीं सुद्धां ) आनंदानें एका पंक्तींत बसून भोजन करतात.

लग्नव्यवहारांत मात्र जातिभेद कोणत्या गतीनें मोडेल किंवा मोडणें योग्य ठरेल हा प्रश्न विचार करण्याजोगा आहे. विवाह ही गोष्ट अशी आहे कीं तिचा सबंध कुलावर आणि कुलाच्या द्वारा समाजावर परिणाम होत असतो. अलिकडील वाङ्मयांत विवाह ज्याच्या त्याच्या मर्जीचा प्रश्न आहे. वाटेल त्या व्यक्तीनें वाटेल त्या

व्यक्तीशीं विवाह करण्यास हरकत नाहीं असे विचार फार मोठ्या प्रमाणांत प्रसार पावूं लागले आहेत आणि तरुणपणीं भावनावशते-मुळें ते पटतातहि पुष्कळांना. परंतु गोष्टी किंवा कादंबऱ्या लिहिणा-रांना वाटतें तितकी विवाह ही गोष्ट सोपी आणि साधी नाहीं.

विवाहामध्यें समानसंस्कृति ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. पति-पत्नि हीं संस्कृतीनें जर एकमेकांना फार दूर असतील तर तो विवाह कधींहि सुखाचा होणें शक्य नाहीं. हिंदी लोकांचे युरोपियन स्त्रियांशीं कित्येक विवाह झालेले आहेत. त्यांची हकीकत पहातां ही गोष्ट स्पष्ट दिसून येते. युरोपियन स्त्रीशीं विवाह करणारा हिंदी तरुण हा इंग्रजी संस्कृतीशीं पुष्कळसा परिचित असतो. म्हणून विवाहापूर्वीं वर्षसहा महिने त्याचा युरोपियन स्त्रीशीं संबंध येतो, तेव्हां आपली संस्कृति सारखी आहे, आपल्या आवडीनिवडी सारख्या आहेत असें दोघांनाहि प्रामाणिकपणें वाटतें. परन्तु एक तर तीं ही गोष्ट विसरतात कीं, विवाहित स्त्री फक्त पतीकडे जात नाहीं तर पतीच्या घरीं जाते. त्यामुळें तिची संस्कृति फक्त पतीच्या संस्कृतीशीं जुळती असून उपयोगी नाहीं. पतीच्या घरच्या संस्कृतीशीं व तो ज्या समाजाचा घटक आहे त्या समाजाशीं जुळती असली पाहिजे. विवाहानंतर पहिले कांहीं दिवस अशीं माणसें एकमेकांच्या संगतींत संतुष्ट असतात. पण सामाजिक जीवनाशिवाय कोणालाहि समाधान वाटणें शक्य नसतें. पतीला आपलें सामाजिक जीवन असतें पण पतीच्या समा-जांत मिसळून जाण्याला अशा स्थितींत पत्नी असमर्थ असते, किंवा

तो समाज तिला मिसळूं देण्यास तयार नसतो. कांहीं झालें तरी परिणाम एकच. तिला वाळींत टाकल्यासारखें होतें. मग ती निष्ठावंत असली तर पतीला घरीं बांधून ठेवूं पहाते. मग तो असंतुष्ट होतो आणि भांडणांना सुरवात होते, किंवा ती इतकीशी निष्ठावंत नसली तर तिच्या समाजाचीं माणसें जवळपास असतील तर त्यांच्यांत ती मिसळूं लागते. मग पतीला लाजेनें किंवा भीतीनें किंवा तिच्यावर लक्ष ठेवण्यासाठीं स्वतःच्या समाजांतून उठून त्या समाजांत जावें लागतें. तेथें तरी हा अमकीचा नवरा या नात्यानेंच तो ओळखला जातो! एकूण अशा प्रकारचे विवाह सुखी होणें फार कठिण असतें. सामान्य स्थितींतल्या माणसांची ही स्थिति. मग आधींच ज्यांना समाजांत कांहीं मान्यतेचें स्थान मिळालें आहे असे लोक जर या भानगडींत पडले तर त्यांची स्थिति किती कींव करण्याजोगी होत असेल त्याची कल्पनाच करणें बरें.

हिंदूंतल्या निरनिराळ्या जातींतील व्यक्तींचे मिश्रविवाह व्हावे कीं नाहीं या प्रश्नाचें उत्तर देतांनाही हीच गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे. आज हिंदुसमाजांत सुमारें चार हजार बेटीबंद जाति आहेत. याचा अर्थ असा नव्हे कीं इतक्या चार हजार प्रकारच्या संस्कृती एकमेकीशीं न जुळण्याजोग्या आहेत. त्यांपैकीं पुष्कळ अगदीं खुळचट कारणांसाठीं निर्माण झालेल्या आहेत. चातुर्वर्ण्यव्यवस्थेंत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे चार वर्ण मानले जातात. यांची मूळ उभारणी आणि विभाग नेमके कोणत्या तत्त्वांवर झाले तें आज निश्चित सांगतां येत नाहीं.

पण वंश आणि व्यवसाय या दोन तत्त्वांवर साधारणपणें हे गट पडले असावे असें मानतात. प्रथम कित्येक शतकें हिंदुसमाजांत सर्रास विवाह होत असावेत असें दिसतें. परन्तु पहिल्या तीन वर्णांच्या गौरवर्ण आर्यांचा कृष्णवर्ण अनार्यांशीं निकट संबंध येऊं लागल्यानंतर प्रजा पाहिजे तशी चांगली होत नाहीं असा अनुभव आल्यामुळें बेटी-बंदीच्या तत्त्वाला प्रारंभ झाला असावा असें म्हणतात. अमेरिकेंत नीग्रो आणि युरोपियन लोकांचे मिश्रविवाह होऊं नयेत असें मत सध्यां बळावत आहे. हिंदुस्थानांत पूर्वीं काय झालें असेल त्याचा हा वर्तमान-कालीन नमुना आहे. परंतु बेटीबंदीच्या या तत्त्वाचा एकदां शिरकाव झाल्या-नंतर आर्यांनीं तें आपसांतहि लावण्यास सुरवात केली. व्यवसायभेदा-मुळें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांची संस्कृति कांहींशी भिन्नभिन्न झाली होतीच. तिलाच वरील तत्त्वांचा जोर मिळून जाती होऊं लागल्या. पण पुढें हें जातींचें बंड फारच वाढलें. कित्येक जाती अशा आहेत कीं त्यांच्यांत बेटीबंदी सुरू होण्याला कारण त्या नदीच्या दोन तीरांवर राहत असत इतकेंच ! अशा रीतीनें जातींची संख्या अमर्याद झाल्यानें विवाहाचें क्षेत्र फार संकुचित होतें. त्याच त्याच कुळांना पुन्हां पुन्हां संबंध जोडावे लागतात आणि त्यामुळें प्रजा निःसत्व आणि रोगग्रस्त होते. या दृष्टीनें हिंदुसमाजांत आज ज्या हजारों जाती झाल्या आहेत त्यांची संख्या कमी झाली पाहिजे. क्षत्रियांच्या पोटजाती मोडून टाकून सबंध समाजांत विवाह सुरू होऊन सर्व क्षत्रियसमाज एक झाला पाहिजे. अशाच रीतीनें ब्राह्मण, वैश्य आणि शूद्र यांच्या बाबतींतहि झालें पाहिजे.

विवाहाच्या बाबतींत अमुक झालें पाहिजे असें नुसतें सांगून भागत नाहीं. लोकांच्या मनाची हळूहळू त्यासाठीं तयारी व्हावी लागते. विवाहाच्या बाबतींत कुळाचा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. दुष्काळांतला किंवा कुलहीन मनुष्य कोणत्या तरी आकस्मिक कारणानें उच्च पदावर जाऊन बसला तरी तेथेंसुद्धां तो आपली अकुलीनता कशी प्रगट करतो याचीं उदाहरणें येथें आपल्या सभोंवारच पहावयास मिळतात. तीं तुम्हांला माहीत आहेतच. अशा लोकांशीं संबंध टाळला पाहिजे. आणि युरोपियन लोकांतसुद्धां अशा प्रकारचा विचार विवाहसमयीं आधींच आंतून अजून करतात.

थोडक्यांत सांगतां येण्याजोगें होतें तें सांगितलें. तुम्हांला या विषयाची नीट माहिती होण्यासाठीं आणखी पुष्कळ वाचन व विचार करावा लागेल. हे उत्तम आशिर्वाद.

तुमचा प्रिय तात

**‘ बाबा ’**

## ६

॥ श्री ॥

मुंबई

ता. २३ एप्रिल १९३६.

प्रिय **शंभू** यांस अनेकोत्तम प्रेमाशिर्वाद :—

आपलें ता. १७ चें पत्र मिळालें. कुशलवृत्त वाचून आनंद वाटला.

आपण स्वतः प्रिंट केलेले फोटो—नवीन प्रयत्न या दृष्टीनें ठीक आहेत. याकडे आपण, आपले फावले वेळांत अधिक लक्ष दिल्यास या बाबतींत आपली चांगली प्रगति होईल.

आपल्या वजनाविषयीं आपण लिहिलेला मजकूर समजला.

एक मनुष्य व्यक्तिशः किती काम करूं शकेल त्याला मर्यादा आहे. शारीरिक आणि मानसिक सामर्थ्याच्या मानानें व्यक्तिव्यक्तींत जो भेद असतो त्यामुळें त्यांत अंतर पडेल हें खरें; पण असें अंतर विशेष लक्षांत येण्याजोगें सहसा असत नाहीं. कर्तृत्ववान पुरुष तोच कीं, जो अनेक माणसांच्या सहकार्यानें अनेक मोठमोठीं कार्यें सुरळीतपणें तडीला नेतो. राजेलोकांसंबंधीं तर इंग्रजींत अशा अर्थाचें वचन प्रचलित आहे कीं, राजाचें शहाणपण त्याच्या नोकरांवरून अनुमानितां येतें आणि

तें खरेंच आहे. एकट्या राजाच्या किंवा कारखानदाराच्या किंवा कोण-त्याहि कारणामुळें ज्याच्या अंगावर मोठी जबाबदारी येऊन पडलेली असते अशा माणसाच्या अंगीं शहाणपणा असून भागत नाहीं. तसलें शहाणपण केवळ पुस्तकी शहाणपण होईल. त्याचें कर्तृत्वांत रूपांतर तेव्हांच होईल कीं जेव्हां तो अनेक कर्ती आणि चतुर माणसें आपल्या कामासाठीं राबवूं शकेल. मोठ्या माणसांच्या आसपास सेवेसाठीं अगदीं तत्परता दाखविणाऱ्या अनेकविध माणसांची सारखी गर्दी असते. त्यांमधून आपल्याला उपयुक्त अशीं माणसें निवडून काढून त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांची योग्य वेळीं योग्य कामावर नेमणूक करून मोठ-मोठीं कामें पार पाडणें हेंच खरें कर्तृत्व होय. साधनांची उणीव वर सांगितलेल्या लोकांना सहसा भासत नाहीं. त्यांतून निवड करून त्यांचा योग्य ठिकाणीं उपयोग करण्यांतच खरें कौशल्य आहे. 'योजकस्तत्र दुर्लभः' चांगला योजक हाच दुर्लभ असतो असें यासाठींच म्हटलें आहे.

सेवकांसंबंधीं श्रीमंतींत वाढलेल्या माणसाकडून होणारी एक नेहमीं-ची चूक अशी कीं आपले सेवक सर्वगुणसंपन्न असावेत असें त्यांना वाटतें. इतकेंच नव्हे तर एखादा सेवक तसा नसला तरी तो आपल्या आज्ञेनें सर्वगुणसंपन्न किंवा इष्टगुणसंपन्न झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. ज्ञानेश्वरांनीं कदाचित् रेड्याकडून वेद म्हणविले अस-तील. पण सर्वच लोक जर रेड्याकडून तशी अपेक्षा करूं लागले आणि यज्ञमंडपांत वैदिकांऐवजीं रेडे आणून बांधूं लागले तर तेथें रेड्यांना जें करण्याची संवय असते तेंच काम होईल. आपण कोणता सेवक

कोणत्या कामासाठीं निवडला हें विसरतां कामा नये. जें काम करण्याची त्याची योग्यता असेल तेंच काम त्याला दिलें पाहिजे; तरच आपल्या हातून मोठीं कामें होतील आणि दैवानें आपल्याला मिळालेल्या स्थानाचें चीज केल्यासारखें होईल. पुष्कळ वेळां सेवकाच्या एखाद्या दोषामुळें संतापाच्या भरांत त्याच्या इतर गुणांकडे दुर्लक्ष होतें आणि आपण त्याची कायमची हकालपट्टी करतों. अशा वेळीं अगदीं स्वार्थाच्या दृष्टीनें विचार केला तरी त्यांत आपलेंच नुकसान होतें. एक तर त्याच्या गुणांपैकीं पुष्कळसे त्यानें आपल्या सेवेंत असतांनाच कमावलेले असतात. याचाच अर्थ असा कीं या काळांत त्याला दिलेला पगार हा त्याला ते गुण शिकविण्यासाठीं आपल्या खिशांतून खर्च झालेला असतो. आणि लहरींत आपण त्याला हांकून दिलें कीं, आपल्या या मूर्खपणाचा फायदा घेण्यासाठीं टपून बसलेले लोक त्या माणसाला आपल्या नोकरींत घेऊन स्वतःचें काम साधतात आणि आपण मात्र पुनः पहिल्यापासून आरंभ करतों. या गोष्टी आपण फार विचारपूर्वक ध्यानांत घ्याव्या. आमच्या त्या फार उशिरां ध्यानांत आल्यामुळें आम्ही स्वतःचें किती नुकसान करून घेतलें आहे त्याची आम्हांला पुरती जाणीव आहे. त्यामुळेंच त्या इतक्या स्पष्टपणें आपल्यापुढें मांडल्या आहेत.

काम उत्तम प्रकारें करण्याची योग्यता, नम्रपणा, आपण स्वतः पुढें पुढें न करतां केलेल्या कामाचें श्रेय धन्याला देण्याची प्रवृत्ति, विश्वासूपणा, धन्याच्या गुप्त गोष्टी गुप्त ठेवण्याचा धर्म आणि द्रव्याच्या बाबतींत प्रामाणिकपणा इतके गुण ज्याच्या अंगीं आहेत तो आदर्श

सेवक असें समजावें. अर्थात् आदर्श स्वामी जसे दुर्मिळ आहेत तसेच आदर्श सेवकहि दुर्मिळ आहेत. आदर्श स्वामी-सेवकांची जोडी जेव्हां जमेल तेव्हां इतिहास बदलण्याचेंही सामर्थ्य त्यांच्या आंगीं निर्माण होईल. परंतु श्रीराम आणि हनुमान, किंवा श्रीशिवाजी आणि तानाजी यांच्यासारखीं उदाहरणें हाताच्या बोटावर मोजण्याइतकींही मिळतील कीं नाहीं त्याची शंका आहे. व्यवहारांत सेवकाची निवड करतांना हे सर्व गुण अवश्य मनांत धरावे. परंतु ते एकत्र मिळणें किती दुर्लभ आहे हें ध्यानांत घेऊन त्यांपैकीं अधिकांत अधिक गुण ज्यांच्या ठिकाणीं मिळतील असे सेवक निवडणें आणि त्यांचे दोष आपल्या कामाच्या आड येणार नाहींत अशा रीतीनें त्यांची योग्य त्या कामावर नेमणूक करणें अत्यंत आवश्यक आहे.

या दृष्टीनें माणसांचे अनेक प्रकार होतात. कित्येक माणसें अशीं असतात कीं काम करण्याचें त्यांचें सामर्थ्य चांगलें असतें, स्वामीशीं ते अत्यंत नम्रपणानें वागतात, सांगितलेलें काम विश्वासूपणें करतातही. परंतु तिऱ्हाइताशीं गांठ पडतांच सर्व काम सर्वस्वीं आपल्यामुळेंच कसें चालत आहे, मालक सर्वस्वीं आपल्यावर कसा अवलंबून आहे, प्रत्येक बाबतींत मालक चुकत असतां, आपण त्याला कसें वाटेवर आणलें, अशा प्रकारच्या खऱ्या खोट्या गोष्टी सांगून आपला मोठेपणा वेळीं अवेळीं सिद्ध करून दाखविण्याची संधी ते कधींहि वायां जाऊं देत नाहींत; उलट ती साधण्याचा ते शक्य तितका प्रयत्न करतात. संधीच सांपडल्यास आपल्या मालकाचा पायरीसारखा उपयोग करून,

त्याच्या पाठीवर पाय देऊन मालकाच्या वरिष्ठाची मर्जी संपादन करून त्याच्या सेवेंत शिरण्याचाही हे लोक प्रयत्न करतात. अशा स्वभावाचा मनुष्य आपल्या सेवकांत आढळून आल्यास त्याची त्याप्रमाणें योजना करावयास पाहिजे. ज्या कामांचा आपल्या वरिष्ठांशीं संबंध येतो अशा कामापासून त्याला दूर ठेवून केवळ आपल्याच अधिकारांतलीं कामें करण्यासाठीं त्याच्या कर्तृत्वशक्तीचा आणि विश्वासूपणाचा उपयोग केला पाहिजे.

माणसांचा दुसरा एक प्रकार असा असतो कीं विश्वासूपणा खेरीज-करून बाकीचे सर्व गुण त्यांच्या ठिकाणीं आढळतात. कामाचा उरक दांडगा, मालकानें न दिलेल्या पैशालाही ते स्पर्श करणार नाहींत, मालकाशीं वागतांना पुरता नम्रपणा दाखवितील; परंतु स्वतःची महत्वा-कांक्षा साध्य करण्यासाठीं मालकाच्या हिताहिताचा विचार न करतां, गुप्तपणें कोणतेंही कृत्य करण्यास मागेंपुढें पहाणार नाहींत. अशा प्रकारचा माणूस मालकाशीं कितीही नम्रपणें वागला तरी त्याची महत्वाकांक्षा इतकी प्रबळ असते कीं, त्याच्या हाताखालीं दिलेल्या दुसऱ्या लोकांवर तो पुरती जरब बसवितो आणि त्यांची खात्री करून देतो कीं मूळ मालक हा त्यांचा खरा मालक नसून स्वतः तोच त्यांचा मालक आहे, कोणाचेंहि बरें वाईट करण्याला मालकाची सही लागत असली तरी प्रत्यक्ष तें काम स्वतः या माणसाच्या मर्जीशिवाय होऊं शकत नाहीं. अशा प्रकारच्या माणसाला राज्यकारभारासारख्या क्षेत्रांत मोठी जागा मिळाली तर तो राजाला सुद्धां नामधारी बाहुलें बनविण्यास

वेळ लावणार नाहीं. म्हणून खरोखरच एका माणसाच्या सामर्थ्यावर मोठें काम व्हावयाचें असतें, अशा तऱ्हेचीं कामें एकामागून एक अशा प्रकारच्या माणसाकडे सोपविलीं जावीं, म्हणजे त्याच्या दोषांची झळ न लागतां त्याच्या शक्तीचा आपल्याला पूर्ण उपयोग करून घेतां येईल.

तिसरा प्रकार असा कीं कामें पार पाडण्याची योग्यता यथातथाच, पण इतर गुण मात्र भरपूर. अत्यंत नम्र स्वभाव, आणि भाषण इतकें मिठास कीं कोणालाही भुरळच पडावी; सेवेला सदैव तत्पर, विश्वास डोळे मिटून ठेवावा, व खजिन्याच्या किल्ल्या निश्चितपणें स्वाधीन कराव्या इतका प्रामाणिकपणा. अशीं माणसें पुष्कळ वेळां त्यांच्या इतर गुणांच्या जोरावर, कामाची योग्यता नसतांही उच्च पदाला चढतात. परंतु मालकानें त्यांच्यावर फार महत्त्वाचीं कामें कायमचीं सोंपविलीं तर तो मात्र ऐन वेळीं तोंडघशीं पडतो. कारण यांच्या पाठीच्या कण्याला जोरच नसल्यामुळें तसा प्रसंगच आला तर यांना कांपरें भरतें आणि मग मालकाच्या फजितीला अंत रहात नाहीं. वैयक्तिक स्वरूपाचीं कामें करावयास या माणसांचा चांगला उपयोग होतो. पण राजकारणाचीं महत्त्वाचीं कामें यांच्यावर आलीं कीं समजावें त्या कामांचें दुर्दैव ओढवलें.

याच जातींत थोडा फरक करून जो चौथा प्रकार निर्माण होतो तो मात्र फारच भयंकर आहे. या प्रकारांत नम्रपणा, गोड स्वभाव इत्यादि बाह्यतः आकर्षक वाटणाऱ्या गोष्टी भरपूर असतात. पण कामाची योग्यताही नसते आणि प्रामाणिकपणाही नसतो. अशीं

माणसें केव्हां दगा देऊन धन्याला गर्तेत लोटतील त्याचा भरंवसा सांगतां येत नाहीं. "विषकुंभः पयोमुखः" म्हणजे तोंडाशीं अमृत असलेला पण पोटांत विष असलेला घडा हें वर्णन यांना तंतोतंत लागू पडतें.

आणखी एक माणसांचा प्रकार असा असतो कीं त्यांच्या मनांत कधींही कोणतेंहि काम करण्याची इच्छा नसते. उलट त्यांना मालका-कडून स्वतःचेंच कांहींतरी काम साधावयाचें असतें. पण ते तुमच्या-भोंवतीं अशा तऱ्हेनें घिरट्या घालतील, असे तुमच्या पुढें पुढें करतील कीं तुम्हांला वाटावें कीं हेच तुमचे खरे हितचिंतक आहेत. अशा लोकांचा जेथें शिरकाव झाला, आणि त्यांच्या कारस्थानांनीं जेथें मुळें धरलीं, तेथील कार्याच्या इमारतीचा पायाच पोखरला गेला असें धरून चालण्यास प्रत्यवाय नाहीं. अशा लोकांना आपल्या वाऱ्यालाहि उभें राहूं देऊं नये; किंवा तें नच साधलें तर त्यांना इतक्या सोसाट्याच्या वाऱ्यांत उभें करावें कीं त्यांत त्यांना स्वतःचे कपडे सावरतां सावरतां पुरेवाट व्हावी.

अशा प्रकारें गुणावगुणावरून होणारे माणसांचे अनेक प्रकार सांगतां येतील. उदाहरणासाठीं कांहीं सांगितले आहेत. आणखी येथें लिहूं लागलों तर पत्र फार लांबेल. सांगावयाचें इतकेंच कीं हे सर्व प्रकार नीट ध्यानांत घ्यावे, आपल्याभोंवतीं असलेली मंडळी त्यांत कोठें बसतात तें लक्षपूर्वक पहावें आणि त्याप्रमाणें त्यांची योग्य ठिकाणीं योजना करावी. म्हणजे आपलें, आपल्या कामाचें आणि त्या

सेवकांचें सर्वांचेंच हित होईल. आपल्याला धनी आणि सेवक या दोन्ही नात्यांनीं यशस्वी व्हावयाचें आहे. अर्थात् सेवकाचे अधिकांत अधिक गुण आपल्या अंगीं उतरण्यासाठीं या वेळेपासून प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणें विरुद्ध दिशेनें येणाऱ्या वाऱ्याचाहि उपयोग आपल्या जहाजाची गती वाढविण्यासाठीं उत्कृष्ट नावाडी ज्याप्रमाणें करतो त्याप्रमाणें सेवकांच्या दोषांचाहि उपयोग आपल्या कार्यसिद्धीसाठीं करण्याचें उत्तम धन्याचें कौशल्य संपादन करण्यासाठीं आपण यत्न केला पाहिजे.

मी शनिवारीं येथून ता. २५ ला रात्रीं निघून उज्जैनीस जात आहें. तेथें ता. २६ ला राहीन, व रात्रीं निघून लष्करला ता. २७ ला मेलनें पोहोंचेन. पत्रोत्तर लष्करच्या पत्त्यावर पाठवावें.

परमेश्वरकृपेनें व वाडवडिलांचे आशिर्वादें करून इकडे सर्व क्षेम आहे, हे उत्तम आशिर्वाद.

तुमचा प्रिय तात,

**'बाबा'**

# ७

॥ श्री ॥

संभाजी विलास,
ग्वाल्हेर,
४ मे १९३६.

अनेकोत्तम प्रेमाशिर्वाद–

आपलें ता. २५ चें पत्र मी परवां ता. ३० ला लष्करला आलों असतांना मिळालें. परवां आपल्या शाळेचें मासिक व काल आपलें ता. २८ चें पत्रहि हातीं आलें. सर्व सविस्तर हकिकत वाचून आनंद वाटला.

आपले सेव्हन ओक्स येथें रहावयास येण्याविषयीं मी मिस् हॉलिडेसहि लिहिलें होतें. परन्तु माझें पत्र त्यांना पोहोंचण्यापूर्वींच या बाबतची व्यवस्था झाली. ठीक झालें. याबाबत आपणही एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं कोणत्याहि वेळीं आपणास हॉस्टेलमध्यें परत जावें लागलें तर जातां येईल अशी व्यवस्था करावी.

मसूरीस आतां गारठा मुळींच नाहीं हें वाचून समाधान वाटलें.

कारण त्यामुळें आपल्या आईसाहेबांना त्रास होणार नाहीं. मसूरीची हवा अनिश्चित असते म्हणून थंडीची काळजी वाटते. परन्तु आतां यापुढें बहुधा थंडी पडणार नाहीं असेंहि वाटतें.

चि. भाऊस डॉ. कार्पर यांजकडे नेण्याविषयीं मी मिस् हॉलिडेस लिहिलें आहे. त्यांची दातांबद्दल कांहीं तक्रार रहाणार नाहीं अशी काळजी घ्यावी. त्यांची ट्रीटमेंट चालू असतांना त्यांनीं आहाराबाबतचीं पथ्यें काळजीपूर्वक पाळलीं पाहिजेत.

आपलें ता. २५ चें पत्र मला येथें मिळालें त्यामुळें टेनिस रॅकेटस् मुंबईहून आणणें शक्य नव्हतें. तरीपण त्या येथें विकत घेऊन मी त्या बरोबर घेऊन येईन.

आपण आपले क्लासचे डिनरविषयीं लिहिलें होतें. एकंदर किती मुलें जेवणास आलीं होतीं ? काय काय कार्यक्रम झाला याविषयीं आपण लिहावें.

सेव्हन ओक्स येथें रहावयास आल्यामुळें आपल्या व आपल्या भावंडांच्या अभ्यासांत यत्किंचितहि ढवळाढवळ होऊं नये व शाळेंतील आपले सर्व कार्यक्रम सुरळीत चालले पाहिजेत अशी माझी इच्छा आहे. याबाबत मी डॉक्टरनांही सूचना दिल्या आहेत.

मसूरी येथें एकंदर हकीकतीचें सविस्तर पत्र पाठवीत असावें. मी पुढील आठवड्यांत मसूरीस यावें असें ठरवीत आहें. नक्की कार्यक्रम ठरला म्हणजे कळवीन.

मागल्या एका पत्रांत जी ज्योतिष्याची गोष्ट सांगितली, त्या गोष्टींत

दुसऱ्या ज्योतिष्याचें भाषणकौशल्य दिसून येतें. त्यानें जें सांगावयाचें होतें तेंच सांगितलें, पण इतक्या खुबीदार रीतीनें सांगितलें कीं राजाला वाईट वाटण्याऐवजीं उलट संतोष झाला. आपण काय बोललों याइतकेंच तें कोणत्या प्रकारें बोलतों, या गोष्टीला महत्त्व आहे. बोलण्यांत जसें माणसांना विशेष कौशल्य दाखवितां येतें तसेंच तें वर्तनाच्या प्रत्येक अंगासंबंधीं करितां येतें.

या व्यावहारिक वर्तनकौशल्यालाच इंग्रजींत Tact असें म्हणतात. इतर सर्व गुणांपेक्षां या गुणाला व्यवहारांत अधिक महत्त्व आहे. विद्वत्ता, सदाचरण, सत्याचरण, श्रीमंती इत्यादि गोष्टींनीं एखाद्या मनुष्याला विशिष्ट क्षेत्रांत पुढें येतां येईल, किंवा मान मिळूं शकेल. एखादा उत्तम गणिती हा जरी वर्तनकौशल्याच्या बाबतींत अगदीं अज्ञ असला तरी त्याची गणितज्ञ म्हणून कीर्ति होऊं शकेल किंवा ज्याला केवळ ईश्वरोपासनेंत काळ घालवावयाचा असेल अशा माणसाला वर्तनकौशल्य साधलें नाहीं म्हणून फारसें अडणार नाहीं. तो साधुत्व प्राप्त करूं शकेल. परंतु ज्या ज्या क्षेत्रांत दुसऱ्या लोकांशीं वारंवार संबंध येतो तेथें Tact या गुणाइतका मौल्यवान गुण इतर दुसरा नाहीं. राजकारण, व्यापार-धंदा, डॉक्टरी, वकीली, एवढेंच नव्हे तर चाकरीससुद्धां अशा प्रकारच्या कोणत्याहि क्षेत्रांत त्वरित यश प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर या गुणाची प्रयत्नपूर्वक जोपासना केली पाहिजे. इतर गुण कितीहि मोठ्या प्रमाणांत असले पण Tact नसेल तर त्यांचा प्रभाव पडणार नाहीं आणि इतर गुण थोडे थोडे कमी असले आणि

Tact असेल तर ते अधिक खुलून दिसतील.

या गुणाची व्याख्या अजून कोणी केल्याचें आमच्या वाचनांत नाहीं. त्याचें कारण व्याख्येच्या चौकटींत बसण्याजोगा हा गुण मर्यादित नाहीं. परंतु त्याचें वर्णन मात्र कांहीं अंशीं करतां येईल. वर्तनकौशल्य म्हणजे योग्य गोष्ट, योग्य वेळीं, योग्य रीतीनें करणें. या वर्णनानेंहि अर्थामध्यें फारशी भर पडत नाहीं. कारण योग्य गोष्ट कोणती, योग्य वेळ कोणती, योग्य रीत कोणती इत्यादि, हें सांगायचें रहातेंच आणि तें आधीं सांगतां येणें अशक्य आहे. तें अनुभवानें आणि अभ्यासानें प्रसंग उद्भवेल तेव्हां लगेच ठरवावें लागतें.

वर्तनकौशल्यांत पुढील गोष्टींचा प्रामुख्यानें समावेश होतो:—

१ मनुष्यस्वभावाचें म्हणजे माणसांचीं मर्में, त्यांच्या आकांक्षा, त्यांच्या आवडीनिवडी इत्यादिकांचें ज्ञान.

२ स्वतःला कल्पनेनें दुसऱ्या माणसाच्या परिस्थितींत ठेवून त्याला काय वाटत असेल त्याची बरोबर अटकळ करतां येणें.

३ आपल्या मनांत आलेला एकादा विचार बोलून दाखविल्यानें कोणाचेंहि मन निष्कारण दुखविलें जाणार असेल तर असा विचार दाबून ठेवण्याइतका संयम.

४ जितकीं माणसें तितकीं मतें असतात. आणि या लक्षावधि मतांमध्यें एक इतकीच आपल्या मताची किंमत आहे या गोष्टीची जाणीव.

५ विशिष्ट प्रसंगीं कोणती गोष्ट करणें अवश्य आहे तें चटकन

ओळखण्याची शक्ति आणि ती गोष्ट जरी आपल्या मनाजोगी नसली तरी करून टाकण्याइतका मनाचा मोठेपणा.

६ दुसऱ्याचा उत्कर्ष व सुख पाहून आपल्या मनाला खरोखर आनंद होणें.

७ परंपरेनें एकादी चाल चालत आली असेल पण आपल्याला ती आवडत नसली तरी विशिष्ट प्रसंगीं तिला आनंदानें मान देण्याची सिद्धता.

८ मृदुता आणि आनंदी वृत्ति.

यांतील प्रत्येक विभागाचें आतांच स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाहीं. कल्पना येण्यासाठीं एकदोन गोष्टींसंबंधानें सांगतों.

मनुष्यस्वभावाच्या ज्ञानाचा चतुर पुरुष कसा उपयोग करतात, त्याचीं पुष्कळ उदाहरणें सांगतां येण्याजोगीं आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळांत एकदां रस्त्यांतील गर्दी मोडण्याचें काम एका लष्करी अधिकाऱ्याकडे आलें. तो शिपायांची तुकडी घेऊन त्या रस्त्यांत गेला, आणि लोक ऐकत नाहींत असें पाहून गोळीबार करण्याचा विचार त्यानें ठरविला. इतक्यांत त्याच्या हाताखालच्या एका तरुण अधिकाऱ्यानें लोकांना उद्देशून दोन शब्द बोलण्याची परवानगी मागितली. ती मिळतांच लोकांकडे वळून तो म्हणाला, "केवळ बदमाष लोकांवर गोळीबार करण्याचा मला हुकूम आहे. तेव्हां जे सभ्य असतील त्यांनीं कृपा करून येथून निघून जावें." पहातां पहातां गर्दी मोडून रस्ता मोकळा झाला. कारण बदमाषसुद्धां स्वतःला बदमाष म्हणवून घेऊं इच्छित नाहीं.

वर जी तिसरी गोष्ट सांगितली आहे तिचें व्यवहारांत महत्त्व फार आहे. विशेषतः थट्टाविनोदाच्या वेळीं ती नीट ध्यानांत ठेविली पाहिजे. दहा लोक एकत्र जमले म्हणजे थट्टाविनोद सुरू होतोच. अशा वेळीं मर्मभेदक बोलणीं बोलून विनोद करण्याची कांहीं माणसांना खोड असते. एका माणसाचें एकादें व्यंग काढून त्यावर कोटी केली कीं चांगलाच विनोद निर्माण होतो, आपण मोठे चलाख दिसतों, हें सर्व खरें; पण ही मौज फक्त बाकीच्या नवांना असते. ज्या एकाचें व्यंग काढून आपण विनोद करीत असतों, तो जरी इतरांबरोबर हंसला तरी बारकाईनें पाहिल्यास त्याच्या हास्याखालीं त्याची उतरलेली मुद्रा स्पष्ट दिसेल. हा विनोद करण्याचा मोह फार अनावर असतो, हें माझ्या स्वानुभवावरून मला पटलें आहे. म्हणून अशा प्रकारचा विचार सुचल्यास तो दडपून ठेवण्यासाठीं आत्मसंयमनाची आवश्यकता असते. कारण ज्याची अशा प्रकारची थट्टा आपण करतों तो इतर लोक हंसले तरी त्यांना विसरतो. ज्यानें त्यांना हंसविलें त्याच्याबद्दल मात्र त्याच्या मनांत पुरी अढी बसते. ज्या माणसाला अशा प्रकारची थट्टा करण्याची खोड लागलेली असते, तो केव्हांना केव्हांतरी त्याच्याशीं संबंध येणाऱ्या प्रत्येक मनुष्याचें मन दुखवितो आणि मग त्याला खरा मित्र कोणीच रहात नाहीं.

थट्टेसंबंधीं एक सामान्य तत्त्व नीट ध्यानांत ठेवावें. कोणाचाहि दोष दाखविण्यासाठीं थट्टेचा उपयोग करण्याइतकी घातुक गोष्ट दुसरी कोणतीहि नाहीं. एकाद्याची कोणत्या तरी दोषाबद्दल थट्टा पुष्कळ वेळां

करण्यांत येते. उदाहरणार्थ—एकाद्या हिंदी मुलाचें बोलतांना इंग्रजी वाक्य चुकलें अशा वेळीं त्या चुकीबद्दल थट्टा सुरू होते. आतां त्या मुलाचें इंग्रजी फारच उत्तम असेल, तर त्याला या थट्टेबद्दल कांहींच वाटणार नाहीं व तोहि आनंदानें तींत भाग घेईल. पण त्याचें इंग्रजी कच्चें असेल तर मात्र ही थट्टा त्याला झोंबल्याशिवाय रहाणार नाहीं. एकाद्याच्या अंगीं एकादा दोष चिकटवून त्याची थट्टा करावयाची असेल, तर आपली आधीं ही खात्री असली पाहिजे कीं त्या दोषाचा वाससुद्धां त्या माणसाच्या अंगीं नाहीं. अशा वेळीं या थट्टेनें त्याला मौज वाटेल. पण तो दोष थोड्याहि प्रमाणांत त्याच्या अंगीं असला, तर ही थट्टा त्याच्या मनाला बोचेल आणि तो तुमच्याबद्दल मनांत दंश धरील. अर्धवट सत्य हें थट्टेंत फार भयंकर आहे. तुम्हांला एकाद्याचा दोष दाखविणें भाग असेल—तें टाळणें अशक्य असेल—तर तो स्पष्ट शब्दांत गंभीरपणें आणि तिसरा कोणी नसेल अशा वेळीं सांगा. त्यासाठीं थट्टेचा उपयोग कधींहि करूं नका.

थट्टाविनोद असा असावा कीं त्यामुळें सर्व माणसें सारख्याच आनंदानें हंसतील. असा विनोद करण्याची कला ज्याला साधली तो मनुष्य सर्वांना हवासा वाटतो.

परमेश्वरकृपेनें व वाडवडिलांचे आशिर्वादेंकरून इकडे सर्व क्षेम आहे, हे उत्तम आशिर्वाद.

तुमचा प्रिय तात

**‘बाबा’**

# ८

॥ श्री ॥

संभाजी विलास,
ग्वाल्हेर,
५ मे १९३६.

अनेकोत्तम प्रेमाशिर्वाद—

मनुष्याचा एक जन्म म्हणजे फार मोठ्या प्रवासांतील वाटेंतला एक मुक्काम आहे, ही गोष्ट पृथ्वीवरच्या सर्व धर्मांना मान्य आहे. मुसलमान आणि ख्रिस्ती लोक मानतात कीं आत्मा एकदांच शरीराबरोबरच जन्माला येतो. मनुष्य मेल्यानंतर तो शरीराबरोबरच थडग्यांत दडून राहतो. शेवटच्या न्यायदानाचे दिवशीं सर्व लोक परमेश्वरापुढें उभे रहातील आणि आपापल्या पापपुण्याप्रमाणें नरकांत किंवा स्वर्गांत कायमचे पाठविले जातील. हिंदुधर्म आणि त्यापासूनच झालेले बौद्ध, जैन इत्यादि धर्मपंथ हे सर्व पुनर्जन्म मानणारे आहेत. आपल्या सबंध आयुष्यांत जसे अनेक दिवस असतात, त्याचप्रमाणें प्रत्येक जन्म हा आत्म्याच्या अनंत आयुष्यांतला एक दिवस होय. प्राण्याला जन्म प्राप्त होतो, तो त्याच्या पूर्वकर्माप्रमाणें होतो आणि या जन्मांत त्याला

मिळालेल्या संधीचा त्यानें चांगला उपयोग केला आणि आपलें धर्म-विहित कर्तव्य उत्तम प्रकारें बजाविलें म्हणजे प्रत्येक जन्मांत त्याची उन्नति होत जाते.

या हिंदुधर्मभावनेप्रमाणें प्रत्येक मनुष्याला जन्मतः कांहीं कर्तव्यें लागलेलीं असतात. त्याला ज्या परिस्थितींत जन्म प्राप्त झाला, ती परिस्थिति निर्माण करण्याला कारणीभूत असलेल्यांचें ऋण त्याला फेडावें लागतें. हें ऋण न फेडतां दुसरीं कितीही सत्कृत्यें त्यानें केलीं तरी त्याची मुक्तता होत नाहीं, हा आपल्या धर्माचा आदेश आहे. आपल्या धर्मानें पितृऋण, देवऋण, आणि ऋषिऋण असे या ऋणाचे तीन प्रकार केले आहेत. ज्या वंशांत आपण जन्माला आलों, त्या वंशाचें नांव पुढें चालविण्यासाठीं सामर्थ्यवान संतति निर्माण करणें आणि मातापितरांसंबंधीं आपलें कर्तव्य उत्तम प्रकारें पार पाडणें हीं पहिल्या ऋणासंबंधींचीं आपलीं कर्तव्यें होत. यज्ञयागादि-कांनीं देवतांना संतुष्ट करण्यानें देवऋण फिटतें आणि ज्ञानार्जन, ज्ञानवर्धन हीं ऋषिऋणांतून मुक्त होण्यासाठीं करावीं लागतात. आपले धर्मग्रंथ ज्या वेळीं निर्माण झाले, त्या वेळच्या विद्वान् माणसांच्या सामाजिक कल्पनांप्रमाणें मनुष्यांच्या कर्तव्यांची त्यांनीं अशा तऱ्हेनें विभागणी केली. आजच्या कालमानाला अनुसरून त्याच कर्तव्यांची जरा निराळ्या तऱ्हेनें विभागणी करितां येईल. आपलीं मातापितरें, आपला राजा, आपला महाराष्ट्र, आपला धर्म, आपला देश या प्रत्येकासंबंधीं आपलें कांहीं कर्तव्य आहे. अर्थात् यांपैकीं प्रत्येकाचें

ऋण आपल्याला फेडावयाचें आहे. मातेसंबंधींच्या आपल्या कर्तव्यां-संबंधीं आम्हीं मागें एका पत्रांत सांगितलेंच आहे. पुत्र हा कर्तव्य-परायण आणि पराक्रमी असला म्हणजे पित्याला पूर्ण संतोष असतो. त्याची याहून अधिक अपेक्षा कांहीं नसते. परंतु बाकीच्या संबंधींचीं कर्तव्यें पार पाडण्यासाठीं मात्र लहानपणापासून तयारी असावी लागते. या तयारीचा कोणता भाग आज आपल्याला विचारांत घेतला पाहिजे त्यासंबंधीं या पत्रांत सांगणार आहों.

आपण इतरांशीं बोलतांना पूर्वजांच्या अभिमानामुळें जरी कांहींही म्हटलें तरी इंग्रजांनीं हिंदुस्थान जिंकलें तें ज्ञानाच्या बळावर जिंकलें, ही गोष्ट अमान्य करतां येणार नाहीं. आपण ज्या वेळीं ‘ सप्तद्वीपा वसुंधरा ’ म्हणून घोकीत बसलों होतों, त्या वेळीं युरोपियन लोक जहाजांत बसून खरोखरीच्या वसुंधरेच्या भोंवतीं फेऱ्या घालून सर्व द्वीपांना भेटी देत होते. इंग्रजांनीं बहुतेक देश जिंकला तरीसुद्धां आपल्याकडील त्या वेळच्या कित्येक मोठमोठ्या मुत्सद्यांना हे टोपी-वाले येतात तरी कोठून हें माहीत नव्हतें आणि त्यांपैकीं बहुतेकांनीं तें जाणून घेण्याचा प्रयत्नही केला नाहीं. भौगोलिक माहिती बरोबर तयार करून, नवीन पद्धतीनें भूपृष्ठाचे बरोबर नकाशे तयार करून, त्यांच्या मूठभर लोकांनीं इथल्याच लोकांच्या सहाय्यानें ह्या त्यांना सर्वस्वी अपरिचित असलेल्या देशांत लांब लांबच्या स्वाऱ्या वेगानें आणि यशस्वी रीतीनें पार पाडिल्या.

सामाजिक जीवनाच्या कोणत्याही शाखेंत नजरेंत भरण्याजोगी

कामगिरी करावयाला पूर्वीं केव्हांही नव्हती इतकी ज्ञानाची म्हणजे आधुनिक शास्त्रीय ज्ञानाची आवश्यकता आज आहे. विजेच्या व वाफेच्या वाहनांनीं, तारायंत्र, बिनतारी वगैरे संदेशवाहकांनीं निरनिराळ्या देशांतील अंतरें अगदीं कमी केलीं आहेत. जगाच्या कोनाकोपऱ्यांत चाललेल्या घडामोडींची माहिती आज कोणालाही त्वरित बसल्या ठिकाणीं मिळूं शकते. राजकीय किंवा आर्थिक क्षेत्रांत उच्च प्रतीची कामगिरी करणाऱ्या लोकांना जगाच्या सर्व कोपऱ्यांतून येणाऱ्या या बातम्यांवर घट्ट पकड ठेवावी लागते. परंतु अहर्निश मिळणारी ही वर्तमानकाळची माहिती पचवून त्यापासून योग्य ते निष्कर्ष काढून आपल्या राष्ट्राच्या व राजाच्या हिताच्या दृष्टीनें योग्य तें धोरण ठरवावयाचें म्हणजे त्याला आधींची बुद्धीची तयारी चांगलीच असावी लागते. एकाद्या गृहस्थाकडे एकदम शंभर पाहुणे आले, पण ते कोण, कोठले माहीत नाहीं, घरांतील नोकर-मंडळी ठिकाणावर नाहीं, घरांतील खोल्या अस्ताव्यस्त आहेत, अशी स्थिति असेल, तर त्या गृहस्थाची काय गत होईल ? तो भांबावून जाईल. पाहुणे कांहीं तरी सबबी सांगून काढता पाय घेतील आणि शेवटीं यजमानाला हताश होऊन बसावें लागेल. अभ्यास केल्या-शिवाय राजकाजांत पडणाऱ्या माणसाची हल्लींच्या काळीं अशीच अवस्था होते. त्याला यशस्वी व्हावयाचें असेल तर या रोज नवीन येणाऱ्या माहितीरूपी पाहुण्यांना मेंदूच्या कोणत्या पेशींत जागा द्यावयाची, त्यांचें पूर्वचरित्र काय आहे, त्यांचे सगेसोयरे, भाऊबंद

कोण आहेत, ही सर्व माहिती त्याच्याजवळ जय्यत तयार असावयास पाहिजे. तस्च हे पाहुणे संतोषानें त्याच्या घरीं रहातील आणि त्याचीं कामें करण्यांत त्याला मदत करतील.

या दृष्टीनें आपण कोणत्या विषयांचा अभ्यास करून आपली मनोभूमि पुढें आपल्यावर येऊन पडणारी जबाबदारी पार पाडण्यासाठीं तयार करून ठेवणार तें ठरविण्याची वेळ आतां आली आहे. आमच्या लहानपणीं आमच्याकडून योग्य वेळीं हा निश्चय होऊन आचरण झालें नाहीं आणि त्यामुळें पडणारी उणीव भरून काढण्यासाठीं आम्हांला आतां अत्यंत परिश्रम करावे लागतात. तीच चुकी पुन्हां आपल्यासंबंधीं होऊं नये म्हणून वेळींच आपल्याला सुचवीत आहों.

परिस्थितीच्या दृष्टीनें आपण आमच्यापेक्षां पुष्कळच भाग्यवान आहां यांत शंका नाहीं. काम करण्याची कितीही हौस असली तरी त्याचें चीज करणारा धनी असल्याशिवाय काम चांगलें होत नाहीं. पूजनीय थोरले महाराज होते त्यावेळीं आम्ही लहान होतों, नादी होतों आणि पूर्वतयारीही नीट झालेली नव्हती. त्यांच्या पश्चात् स्वार्थी लोकांचा विरोध सहन करण्यांतच आमची सर्व शक्ति खर्च झाली; आणि आतां पुन्हां काम पहाणारे स्वामी अधिकारांत येत आहेत, तों आमचीं गात्रें शिथिल होऊन जाणार. अशा रीतीनें राजकारणदृष्ट्या आमचें जीवन व्यर्थ गेलें असें म्हणावयास पाहिजे. परंतु आपली गोष्ट तशी नाहीं. आपल्या भाग्यानें आपले स्वामी तुमच्याच वयाचे, तुमच्यावर प्रेम करणारे आणि तुमच्यासंबंधीं आपलेपणा बाळगणारे

आहेत. त्यांची सेवा इमानानें करून त्यांची कीर्ति पसरविण्यासाठीं आपण जास्तींत जास्त लायक कसे व्हाल, याचा आपण आतांच विचार करून ठेविला पाहिजे.

आजकाल राजकारणांतल्या लहान लहान गोष्टींचासुद्धां जागतिक घडामोडींशीं संबंध असतो. जगांत आर्थिक मंदीची लाट आली कीं आपल्याकडील धान्याचे भावही घसरतात, उद्योग, व्यापारधंदे कमी होतात, आणि सरकारी बजेटावर त्याचा परिणाम होतो. त्याच मंदीनें कित्येक देशांत क्रांत्या होऊन नव्यानव्या राज्यपद्धति निर्माण होतात. या नव्या राज्यपद्धति निरनिराळीं आर्थिक बंधनें घालतात आणि त्याचा पुन्हां आपल्या शेतकऱ्यांवर परिणाम होतो. कोठें जर्मनींतल्या प्रमाणें दोन वंशांच्या लोकांचीं भांडणें चालतात, तर कोठें पॅलेस्टाइनप्रमाणें किंवा हिंदुस्थानांत कित्येक ठिकाणीं झालेल्याप्रमाणें धर्माच्या मुद्यावर मारामाऱ्या होत असतात. यासाठीं आजच्या काळीं राजकाज करूं इच्छिणाराला सामाजिक शास्त्रांत तरबेज असावें लागतें. विशेषतः अर्थशास्त्र (Economics) आणि राज्यशास्त्र (Politics) यांचें तर एकाचें दुसऱ्याशिवाय पानही हालत नाहीं. राजकारणांतलें काम बिनचूक करावयाचें तर कायद्यांच्या मूलतत्त्वांचीही चांगली माहिती पाहिजे. अशा रीतीनें सामाजिक शास्त्रें (Sociology) व त्याच्या अंतर्भूत असलेले विषय—विशेषतः अर्थशास्त्र व राज्यशास्त्र, आणि कायदा हे विषय ज्याला चांगले अवगत झाले, त्याला पुढेंमागें होणाऱ्या घटनांत सावधपणें आणि चातुर्यानें भाग घेतां येईल.

राजकारणांतील अशा स्वरूपाची कामगिरी करण्याची योग्यता मुख्य मुख्य जहागीरदारांनीं आपल्या अंगीं आणिली, तरच ते आपल्या राजाची कामगिरी उत्तम प्रकारें करूं शकतील. हिंदुस्थानच्या भावी राजकारणांत या अभ्यासाची विशेष गरज लागेल. आजची परिस्थिति अशी आहे कीं, लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्ली किंवा कौन्सिल ऑफ स्टेट यांमध्यें लोकप्रतिनिधी म्हणून जे निवडून जातात, त्यांपैकीं क्वचितच एकादा राजकारणाच्या या विषयांत प्रवीण असतो. त्यामुळें पोकळ भाषणांचे फवारे पुष्कळ उडतात, पण मुख्य मुद्याला पकड घालून आपली बाजू बुद्धिवादानें प्रतिपक्षाच्या गळीं उतरविण्याची कुवत क्वचितच प्रगट होते. याला अपवाद फक्त प्रागतिक (Liberal) पक्षांत आढळतात. संयुक्त राज्यघटना (Federation) अमलांत आल्यानंतर संस्थानांचे प्रतिनिधी तेथें जातील; आणि ज्यांच्या शरीरांत आपल्या राजाचें आणि राज्याचें मीठ पूर्णपणें भरलेलें आहे असे निष्ठावंत प्रतिनिधी संस्थानांना मिळाल्याखेरीज त्यांची धडगत होणार नाहीं. बाहेरचे विद्वान् लोक कितीही लायक असले तरी दिलेल्या पगारापुरती संस्थानची वकिली मात्र ते करतील. आणि दुसरा कोणी अधिक फी देणारा भेटला कीं, दुगाण्या झाडून निघून जातील. अशा उपऱ्या लोकांच्या हातून इतक्या महत्त्वाच्या राजकारणाच्या कामांत रियासतीच्या चिरंतन हितसंबंधांचें रक्षण कधींच होणें शक्य नाहीं. तें काम, ज्यांचें सर्वस्व दरबारावरील त्यांच्या निष्ठेवर आणि दरबारच्या प्रेमावर अवलंबून आहे, अशा पिढीजाद सेवकांकडूनच करून घेणें प्राप्त होईल.

परंतु तुमच्या अंगीं खरी योग्यता असल्याशिवाय मात्र केवळ शोभेचे हत्ती म्हणून इतक्या महत्त्वाच्या कामावर तुमची कोणीही योजना कर-णार नाहीं. यासाठीं लायकी ठरवून घेण्यासाठीं तुम्हांला बाहेरच्या विद्वान् लोकांशीं चढाओढ करावी लागेल. तुमची वंशसिद्ध परिस्थिति या कामासाठीं तुम्हांला उपयोगी पडेल यांत शंका नाहीं. पण त्यावर अवलंबून रहाणें हें पराक्रमाचें लक्षण नाहीं. स्वतःच्या अंगच्या कष्टानें कमावलेल्या गुणांनीं पुढें येण्यांतच खरें भूषण आणि समाधान आहे.

या विषयांचा अभ्यास जसा तुम्हांला तुमच्या राज्याच्या सेवेंत उपयोगी पडेल, त्याचप्रमाणें तो तुमच्या जहागिरीच्या व्यवस्थेंतही उप-योगी पडेल. आतां रयतेकडून जास्तींत जास्त पैसा उकळणें म्हणजे उत्तम व्यवस्था हे दिवस राहिले नाहींत. रयतेला सुखी आणि संपन्न ठेवून आपलें उत्पन्न वाढवील तोच खरा यशस्वी. यासाठीं लहानमोठे निरनिराळे उद्योगधंदे, सुधारलेली शेती, इत्यादिकांचा प्रसार रयतेंत झाला पाहिजे. पण मालकालाच जर यांची माहिती नसेल, तर तो रयतेला काय देणार? अज्ञानी मालकाच्या डोक्यांत असल्या कल्पना आल्या तर भटक्या ‘तज्ज्ञांचें’ त्याच्या तिजोरीला जळवा लावण्याचें काम मात्र सोपें होईल. म्हणून या सर्व विषयांचा अभ्यास आपल्याकडून उत्तम प्रकारें व्हावा आणि आपल्या राजाची सेवा करण्यासाठीं आपण अधिकांत अधिक योग्यता मिळ-वावी, यासाठीं आम्ही आपल्याला जगांतील अत्यंत श्रेष्ठ म्हणून गणल्या गेलेल्या ऑक्सफोर्ड विद्यापीठांत पाठवावयाचें ठरविलें आहे,

हें आपल्याला सांगितलेंच आहे. त्या विद्यापीठांत प्रवेश मिळविण्यासाठीं आतांच अर्ज करून ठेवणें आवश्यक आहे; म्हणून त्या अर्जाचा फॉर्म सोबत पाठवीत आहों. आपण ऑक्सफोर्डला कोणते विषय घ्यावे त्यासंबंधीं आमच्या कल्पनेप्रमाणें आमचें मत सांगितलें आहे. तें आपण बंधनकारक समजूं नये. आपण आतां स्वतःच्या बऱ्यावाइटाचा विचार करण्यास समर्थ झालां आहां, असें आम्हांस वाटतें. तरी आपल्याकडे पाठविलेल्या Handbook for Indian Students वरून विषयांची वर्गवारी काळजीपूर्वक पाहून नीट विचारपूर्वक निश्चय करावा म्हणजे हा फॉर्म भरून पाठवितां येईल. आपण आधीं सर्व योजना निश्चित करून ठेवावी. फॉर्म भरण्याची वेळ येईपावेतों आम्हीं तिकडे येऊंच, हे उत्तम प्रेमाशिर्वाद.

तुमचा प्रिय तात

**‘बाबा’**

# ९

॥ श्री ॥

लक्ष्मी निवास,

उज्जैन

ता. १४ जून १९३६.

प्रिय **शंभू** यांस अनेकोत्तम प्रेमाशिर्वाद :—

आपलें ता. ७ चें पत्र मिळालें. टाईज आपणांस आवडले ही आनंदाची गोष्ट आहे. सुटीनंतर आपली शाळा आतां सुरू होत आहे. अभ्यासाकडे लक्ष असूं द्यावें.

शरीराचें आरोग्य हा सबंध जीवनाचा पाया आहे. शरीर निरोगी नसेल तर माणसाच्या हातून कोणतेंहि काम उत्साहानें होणें शक्य नाहीं. बुद्धि कितीहि तीक्ष्ण असली, साधनें कितीहि अनुकूल असलीं तरी आरोग्य नसेल तर त्यांचा काडीइतकाही उपयोग नाहीं. आणि आरोग्य ही वस्तू अशी आहे, कीं ती पैशानें विकत घेतां येत नाहीं, किंवा नोकरांकडून बनवून घेतां येत नाहीं. उलट हिंदुस्थानांतील धनिक कुटुंबांकडे पाहिलें तर असें म्हणावें लागतें कीं, पैसा हा आरोग्य घालविणारा पदार्थ आहे. वास्तविक असें असूं नये. आणि जेथें लक्ष्मी आणि सरस्वति यांचें साहचर्य अधिक प्रमाणांत आढळतें अशा पाश्चात्य लोकांत तसें नाहींही. शरीर बळकट आणि निरोगी असेल तरच श्रीमंतीचीं सुखें उपभोगितां येतात किंवा श्रीमंतीबरोबर

येणाऱ्या जबाबदाऱ्या पार पाडतां येतात.

याची काळजी विशेषतः पूर्ववयांत, म्हणजे ज्या कालाला तुम्ही आतां प्रारंभ केला आहे त्या कालांत घ्यावी लागते. दक्षिणेंतील एका लोकप्रिय आणि कर्तबगार पुढाऱ्यानें असें सांगितलें आहे कीं वयाच्या सोळाव्या वर्षापासून पंचविसाव्या वर्षापर्यंत कमावलेलें शरीर त्याला पुढें छत्तीस वर्षे हव्या त्या हालअपेष्टांना टक्कर देण्यास उपयोगीं पडलें. अर्थात् पंचविशीच्या पुढें निसर्गाचे सर्व नियम मोडण्यास परवानगी असते, असें कोणीच म्हणणार नाहीं. पण अतिशयोक्तीचा हा भाग सोडून दिला तरी ही गोष्ट मात्र निर्विवाद कीं, पूर्ववयांत मौजेनें आणि खेळतां खेळतां जी शरीरसंपत्ति कमावितां येईल ती उतार वयांत महाप्रयासानेंही प्राप्त करून घेतां येणार नाहीं.

एकंदर आयुष्यमानाच्या दृष्टीनें विचार करतां शरीर कमावण्यापेक्षां उत्तम आरोग्य संभाळणें हें अधिक महत्त्वाचें आहे, आणि त्यासाठीं विशेष कांहीं करावें लागतें असें नाहीं. त्याला मोठी तपश्चर्याही करावी लागत नाहीं. आरोग्याची गुरुकिल्ली एका शब्दांत सांगतां येईल. तो शब्द म्हणजे नियमितपणा. आम्हांला संस्कृत फारसें येत नाहीं हें आपल्याला माहीत आहेच. पण आरोग्याचा मंत्र म्हणून गीतेंतील एका श्लोकाला मात्र आम्ही फार महत्त्व देतों. तो श्लोक असा :—

**'युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।**
**युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥'**

खाणें, सर्व तऱ्हेचे सुखोपभोग, काम करणें आणि झोंपणें हीं सर्व

नियमित असलीं पाहिजेत. ज्यानें हें नियमितपणाचें सूत्र सांभाळिलें त्याला पृथ्वीवरील कोणताही सुखोपभोग वर्ज नाहीं, आणि तरी सुद्धां त्याला रोगांची भीति नाहीं.

तरुण वयांत हा उपदेश निरुपयोगी ठरल्याचीं उदाहरणें दुर्दैवानें अधिक आहेत. त्यांतही एक वरवर पहातां आश्चर्यकारक वाटणारी गोष्ट आढळून येते. ज्यांची प्रकृति सुरवातीलाच थोडीशी अशक्त असते, किंवा ज्यांना सुरवातीलाच एखादा विकार असतो तींच माणसें पुढें अधिक तग धरतात. उलट ज्यांची प्रकृति पहिल्यापासून धडधाकट आणि निरोगी तेच लोक नेमके लौकर खंगतात. परंतु व्यक्तिशः अशा माणसांचा विचार केला तर हें कोडें उलगडतें. अगदींच अशक्त आणि रोगट असतील त्यांची गोष्ट वेगळी; पण ज्यांच्या प्रकृतींत थोडासा दोष असतो अशीं माणसें त्याचा प्रतिकार करण्यासाठीं योग्य मार्गदर्शक मिळाल्यास लहानपणापासूनच आरोग्याचे नियम पाळूं लागतात. आणि त्यामुळें ससा आणि कासवाच्या शर्यतीप्रमाणें अखेरीस जिंकतात. उलट धडधाकट माणसें तारुण्याच्या उमेदींत प्रकृतीवर अत्याचार करतात. आपल्या बळाचा किंवा काटकपणाचा प्रभाव दाखविण्यासाठीं अनियमितपणा करतात. आम्हीं चार दिवस जागरण केलें तरी कांहीं होत नाहीं अशा घमेंडींत ते तसें करूं लागतात. रात्रीं एक एक, दोन दोन वाजेपर्यंत जागून काम करावयाचें आणि पुन्हां सकाळीं लवकर उठावयाचें अशा चढाओढी लावतात. स्वाभाविक निरोगीपणामुळें आरंभीं कांहीं वाईट परिणाम दिसतही नाहींत. पण आंतून हळूहळू

पोखरण्याचें काम सुरू होतें. यांची गत व्याजाऐवजीं किंवा नफ्याऐवजीं भांडवलांतच चैन करणाऱ्या व्यापाऱ्यांसारखी होते. आणि शरीराच्या वाढीचीं वर्षें एकदां निघून गेलीं कीं, मग आंत पोखरून घर करून बसलेल्या रोगांना बाहेर काढणें अशक्य होऊन जातें. यासाठीं मनुष्य स्वभावतः निरोगी आणि धडधाकट असला तरी त्यानेंसुद्धां प्रथमपासून आरोग्याचे नियम पाळण्याची आणि नियमितपणाची संवय अंगीं बाणून घेतली पाहिजे.

बॅटरीनें चालणाऱ्या फोटोसेटविषयीं मुंबईस पाहीन. पण तुमची मागणी स्पष्ट नाहीं, ती पत्रोत्तरीं स्पष्ट कळवावी. जाकीटांचीं मापें मी लष्करहून पाठवून देईन.

मी आज येथून पुण्यास जात आहें. तेथून परत ताबडतोब लष्करला जाईन किंवा एक दोन दिवस मुंबईस थांबेन, निश्चित नाहीं. लष्करला माझें ताबडतोब जाणें न जाणें तेथून येणाऱ्या हकीगतीवर अवलंबून आहे. लष्करला दोन तीन दिवस थांबून नंतर मसूरीस येईन.

माझा कार्यक्रम निश्चित नसल्यामुळें लीची आतां पाठवूं नयेत.

पत्रोत्तर मुंबईस नेहमींच्या पत्त्यावर म्हणजे Poste Restante येथें पाठवावें.

परमेश्वरकृपेनें व वाडवडिलांचे आशिर्वादेंकरून इकडे सर्व क्षेम आहे, हे उत्तम आशिर्वाद.

तुझा प्रिय तात

**'बाबा'**

## १०

॥ श्री ॥

संभाजी विलास,
ग्वाल्हेर,
ता. २७ जून १९३६.

प्रिय **शंभू** यांस अनेकोत्तम प्रेमाशिर्वाद :—

आपलें ता. १४ चें पत्र मुंबईस ता. १८ ला मिळालें, व त्यानंतर ता. १८ चें पत्र मी येथें आल्यानंतर ता. २३ ला मिळालें. कुशलवृत्त वाचून समाधान वाटलें.

ता. १८ जुलै रोजीं दादामहाराज पुण्याहून बंगलोरला गेले असल्याचें आपण वर्तमानपत्रांत वाचलें असेलच.

मुंबईस मी आपणाकरितां कॅमेरा बघण्याचा यत्न केला; परंतु कामाच्या गर्दीत कांहीं करूं शकलों नाहीं. पुन्हां जेव्हां मुंबईस जाईन तेव्हां स्मरण ठेवीन.

मी लौकरच मसुरीस येणार आहें, तेव्हां सदरी बरोबर घेऊन येईन.

मी समक्ष सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानच्या इतिहासाचें वाचन आपण चालू ठेवावें. मलाही वाटतें कीं आपण सीनियर केंब्रिजकरतां ब्रिटिश साम्राज्याच्या इतिहासापेक्षां हिंदुस्थानचाच इतिहास पसंत करावा.

पत्रलेखनासंबंधीं आम्हीं आपल्याला वेळोवेळीं सूचना दिल्याच आहेत. पैकीं भाषेसंबंधींची सूचना कृतींत आणण्याच्या कामीं आपण पुरेशी प्रगति केली नाहीं हें खरें असलें तरी प्रयत्न तसा चालू ठेवल्यास तेंही साध्य होईल. वेळेवर उत्तर देण्याच्या बाबतींत मात्र आपण आतां अधिक नियमित होत आहां, हें पाहून बरें वाटलें. मात्र हें केवळ आम्हांला उत्तरें लिहिण्यापुरतेंच आहे कीं सर्वांना लिहितांना आपण हें धोरण पाळतां तें समजण्यास मार्ग नाहीं. आशा आहे कीं आपण तें सर्वांच्या बाबतींत पाळीत असाल.

आज हा विषय मनांत येण्याचें कारण म्हणजे कालच कांहीं स्नेही मंडळींशीं गोष्टी करीत असतां एका थोर गृहस्थाच्या पत्रव्यवहारा-संबंधीं निघालेला उल्लेख. पत्रांचीं उत्तरें त्वरित जाण्यांत माणसाची जाग-रूकता दिसून येते. वरील गृहस्थांचा असा दंडक होता कीं त्यांच्याकडे आलेल्या प्रत्येक पत्राचें उत्तर आठ दिवसांच्या आंत गेलेंच पाहिजे. आणि त्यांच्याकडे रोज येणाऱ्या पत्रांची संख्या तर शेंकड्यांनीं मोजण्या-जोगी. अर्थात् त्यांच्या हस्तकांना हें सर्व काम आवरणें तर भाग होतें; पण काळजीपूर्वक आवरणें कठीण होतें. त्यामुळें त्यांनीं एक ध्येय आपल्यापुढें ठेवलें. प्रत्येकाच्या पत्राला उत्तर गेलें पाहिजे. मग त्या माणसाशीं पत्रव्यवहार मालकाच्या सहीनें होण्याइतका तो मोठा आहे कीं नाहीं इत्यादि गोष्टींचा विचार करण्यास त्यांना कोठें सवड आहे ! आणि मालकाचा तसा आग्रह नसल्यामुळें प्रत्येक बाबतींत ते असा विचार तरी कशाला करतात ? परिणाम असा झाला कीं त्वरित उत्तरें

लिहिण्यासंबंधींची मालकाची कीर्ति अबाधित राहिली. पण दुसरीच एक अडचण निर्माण झाली. तो गृहस्थ इतक्या उच्च पदवीचा होता कीं त्याच्या हातचें पत्र आपल्याला येतें एवढें दाखवितांच कित्येकांचें काम व्हावें. आणि अशा रीतीनें त्याच्या नकळत कित्येक लबाड लोक त्या पत्रांचा उपयोगही करूं लागले. यावरून सांगायचें इतकेंच कीं नुसती त्वरा उपयोगी नाहीं. पत्रलेखनांत तारतम्यभावही सांभाळिला पाहिजे. विशेषतः परिस्थितीमुळें ज्यांच्या पत्रांचा अशा रीतीनें उपयोग होण्याची शक्यता असते त्यांनीं या बाबतींत अत्यंत सावध राहिलें पाहिजे.

याच प्रसंगीं निघालेल्या गोष्टीवरून आणखी एक गोष्ट सुचली तीही आपल्याला आतांच सांगून ठेवणें योग्य आहे. तिचा उपयोग आपल्याला पुढें होईल. यौवनाच्या भरांत किंवा पुढेंहि पुष्कळ मोठ्या माणसांचे असे कांहीं संबंध निर्माण होतात कीं त्यांचा एखाद्या व्यक्तीशीं अगदीं गुप्त आणि विश्वासाचा पत्रव्यवहार सुरू होतो. भावनेच्या भरांत अशा वेळीं लिहिणारा कचेरींतील कृत्रिम दरबारी-बंधनें झुगारून देऊन आपलें मन मोकळें करतो. आणि कित्येक वेळां परिस्थिति अशी झालेली असते कीं या मोकळेपणाची त्याला मनःस्वास्थ्याच्या दृष्टीनें आवश्यकताहि वाटत असते. पण अशा वेळीं सुद्धां आपल्या मनाचा तोल जाऊं देणार नाहीं तोच खरा धोरणी. कारण पुष्कळ वेळां असें होतें कीं एकदां इतक्या विश्वासाला पात्र झालेली ही व्यक्ति नेहमींच तशी रहाते असें नाहीं. कांहीं दिवसां-

नंतर ती दुसऱ्या कोणाच्या तरी विश्वासाला पात्र होते. आणि मग आपलीं सर्व मर्में आयतींच त्या तिसऱ्या माणसाच्या हातीं लागतात. कित्येकदां तीं हातीं लागावीं यासाठींच तो त्या व्यक्तीचा विश्वास संपादन करतो. किंवा असेंही होतें कीं ती व्यक्ति आमरण विश्वास पाळते. पण तिनें भक्तीनें जपून ठेविलेलीं पत्रें वारसांच्या हातीं लागतांच त्यांचें द्रव्यांत रूपांतर करण्याच्या उद्योगाला ते लागतात. आणि मग Blackmailing ला सुरुवात होते. अशा प्रकरणावरून सुरुवात होऊन पत्रलेखकाचें जन्माचें नुकसान झाल्याचीं किंवा क्वचित् प्रसंगीं अखेर खुनापर्यंत मजल गेल्याचींही उदाहरणें आहेत. यासाठीं अशा प्रकारचा वैयक्तिक व्यवहार शक्यतोंपर्यंत टाळणें, आणि तें अशक्य झालें तर सर्व संभवांचा विचार करून काळजीपूर्वक करणें, हें प्रत्येक धोरणी माणसाचें कर्तव्य आहे.

आपल्या मातु:श्रींची प्रकृति कशी आहे तें कळवावें. माझी प्रकृति उत्तम आहे. काळजी नसावी हे उत्तम आशिर्वाद.

तुमचा प्रिय तात

**‘बाबा’**

## ११

॥ श्री ॥

मुंबई,
१२ जुलै १९३६.

अनेकोत्तम प्रेमाशिर्वाद :–

थोड्या दिवसांपूर्वी एका वर्तमानपत्रांत वाचण्यांत आलें कीं संयुक्त प्रांतांतील एका गांवीं एक साधूंचा जथा गेला होता. साधूंना रसद आणि सर्पण गांवच्या लोकांनीं न दिल्यामुळें साधूंनीं लोकांच्या घराला आगी लावून दिल्या आणि मोठा दंगा केला.

हिंदुस्थानांत दानधर्मानें जें विकृत स्वरूप धारण केलें आहे, त्याचें हें एक उदाहरण आहे. यावरून दानधर्म आणि त्याच्या मुळाशीं असलेला दया हा गुण यांसंबंधींचे विचार तुम्हांला सांगावे असें मनांत आलें.

सर्वच माणसें सारखीं भाग्यवान नसतात. कोणाला परमेश्वराच्या कृपेनें भरपूर संपत्ति मिळते, तर कोणाला दोन वेळां पुरेसें अन्न मिळण्याचीही पंचाईत असते. अशा स्थितींत सर्व माणसांमधला

बंधुभाव ध्यानांत घेऊन दुसऱ्याचें दुःख शक्य तितकें हलकें करण्याचा प्रयत्न करणें, हें माणुसकीच्या दृष्टीनें सुस्थितींतल्या प्रत्येक माणसाचें कर्तव्य आहे.

संपत्तीचा स्वतः उपभोग घेऊन किती सुख मिळूं शकेल त्याला मर्यादा आहे. एका माणसाचें खाणेंपिणें, रहाणें, प्रवास किंबहुना चैन यांमध्यें खरोखर हिशेबानें फारसा पैसा खर्च करतां येणें शक्य नाहीं. इतकेंच नव्हे तर आपणच उपभोग घेऊं असा स्वार्थी हेतू मनांत धरून मनुष्य सुखी होऊं पाहील तर तें अशक्य आहे. कारण मर्यादेपेक्षां अधिक उपभोग झाला म्हणजे पदार्थांपासून सुख मिळणेंच बंद होतें हा शरीरधर्म आहे. श्रम न करतां रोज पक्वान्नें खाणाराला त्यांची गोडीच कळेनाशी होते, पण तीच खरखीत भूक लागल्या-नंतर साधें अन्नसुद्धां चांगलें रुचकर लागतें. असेंच सर्व विषयांचें आहे. परंतु सुख मिळण्याचा एक प्रकार असा आहे कीं त्याला मर्यादाच नाहीं. त्याचा वीट येणें शक्य नाहीं आणि त्याचा उपभोग घेण्याला मनुष्य असमर्थ होणें शक्य नाहीं. तो प्रकार म्हणजे दुसऱ्याचें दुःख नाहींसें करून त्यामुळें होणाऱ्या समाधानाचें सुख अनुभविणें.

दया ही भावना प्रत्येक माणसाच्या अंतःकरणांत थोड्याबहुत प्रमाणांत असतेच. तिचा उपयोग करून परोपकाराचें सात्विक सुख मिळविण्याची रुची ज्यांना समजली, तींच माणसें भाग्यवान् होत. त्यांचें जीवन कधींही कष्टी होणार नाहीं. कारण दुसऱ्यांचीं दुःखें दूर करण्याच्या आनंदांत त्यांना स्वतःच्या दुःखाची जाणीवही रहाणार नाहीं.

आपल्याकडेच नव्हे तर सर्व जगांत दानधर्माचा प्रघात सुरू झाला त्याच्या मुळाशीं हीच उदात्त भावना आहे. परंतु वर सांगितल्याप्रमाणें त्याला कधीं कधीं विकृत स्वरूप प्राप्त होतें. त्यापासून सावध राहिलें पाहिजे.

भिक्षा मागणें हा तर हिंदुस्थानांत एक मोठा धंदाच होऊन बसला आहे. असें म्हणतात कीं, एक कोटी धडधाकट माणसें साधू या नांवाखालीं या धंद्यावर उपजीविका करतात. याचा अर्थ असा कीं आपला देश इतक्या लोकांना आळसांत पोसतो. आणि त्यांनीं श्रम केले असते तर जें उत्पादन झालें असतें, तें गमावून बसतो. इतकेंच नव्हे तर इतके धडधाकट आळशी लोक गांवोगांव मोकाट सुटल्यानें हरएक प्रकारच्या दुराचाराचें ते मूळ होऊन बसतात. दयेच्या भावनेनें केलेला दानधर्म अशा रीतीनें समाजविघातक बनतो.

दानधर्म करतांना आपण तो कोणाला करीत आहोंत, याकडे काळजीपूर्वक पाहिलें पाहिजे. विशेषत: श्रीमंत लोकांनीं या बाबतींत अधिक खबरदार राहिलें पाहिजे. असे कित्येक लोक इतस्तत: फिरत असतात कीं जे श्रीमंत लोकांना आपलीं सावजें समजतात, आणि कोणत्याना कोणत्या तरी युक्तीनें त्यांच्याजवळचा पैसा आपल्या खिशांत कसा येईल, या खटपटींत असतात. गोड बोलणें, भरपूर स्तुति करणें आणि अत्यंत नम्रभाव धारण करणें, या गोष्टी यांच्या अंगवळणीं पडलेल्या असतात. निरनिराळ्या संस्थांच्या नांवांवर, औद्योगिक सुधारणेच्या नांवावर, अशा हरएक रीतीनें आपल्या सावजाचा कल

पाहून हे लोक जाळें पसरतात. त्यांची स्तुति, त्यांची नम्रता, सर्व कांहीं नाटकी असते; आणि सावज जाळ्यांत सांपडलें म्हणजे हे लोक मनांतल्या मनांत त्याच्या मूर्खपणाबद्दल हंसत असतात. अशा लोकांपासून सावध राहिलें पाहिजे.

परंतु यासाठीं मदत मागावयाला येणाऱ्या सर्वच लोकांकडे पाठ फिरवून उपयोग नाहीं. कारण अशा दांभिक लोकांप्रमाणें कधीं कधीं ज्यांना मदत देणें योग्य आहे, किंबहुना आपलें कर्तव्य आहे असे लोकही येत असतात. त्यांची लक्षपूर्वक पारख करून योग्य ठिकाणीं शक्तीप्रमाणें दानधर्म केला पाहिजे.

श्रीमंतांच्या वैभवाला बांडगुळाप्रमाणें चिकटून रहाणारा दुसरा एक वर्ग म्हणजे गरीब नातलगांचा. नातेवाइकांसाठीं खर्च करतांना विवेक-बुद्धीचा चांगलाच उपयोग केला पाहिजे. नाहींतर मागून पश्चात्ताप करण्याची पाळी येते. मदत मागतांना नातेवाईक इतरांप्रमाणेंच पूर्ण नम्रता दाखवितात. परंतु मदत मिळाल्यानंतर त्याबद्दल कृतज्ञता दाख-विणारे आणि वेळप्रसंगीं कामास येणारे नातलग क्वचित् अपवादात्मक आढळतात. आपलें काम झालें म्हणजे हे लोक मदत करणारासंबंधीं म्हणूं लागतात कीं आम्हांला मदत करण्यांत यानें कोणतें शतकृत्य केलें ? त्याचें तें कर्तव्यच होतें. आपल्या श्रीमंत नातलगाच्या द्रव्याचें शोषण करणें हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे अशी भावना बहुधा हे लोक मनांत बाळगीत असतात.

आमच्या म्हणण्याचा अर्थ असा नाहीं कीं नातलगांना मदत करूं

नये. आपली संपत्ति जशी आपल्यासाठीं आहे, तशीच ती आपल्याच रक्ताचे जे लोक हीन स्थितींत असतील त्यांच्यासाठींही आहे. परंतु त्यांना ती देतांना दूध पाजलेल्या सर्पाप्रमाणें ते आपल्यावर उलटणार नाहींत याची व्यवस्था करून ठेविली पाहिजे. याला उत्तम उपाय म्हणजे त्यांना घरांत पोसण्याऐवजीं रोख पैशानें मदत करावी; कारण घरांत आपल्याबरोबर झालेल्या खर्चाचा हिशेब त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. दुसरी गोष्ट म्हणजे जी मदत द्यावयाची ती कर्जरूपानें द्यावी व त्याचे कागदपत्र कायदेशीर करून घेऊन नेहमीं चांगले तयार ठेवावे. ज्या बाबतींत असें करतां येणार नाहीं, तेथें खर्च केलेल्या पैशावर पाणी सोडलें असें समजावें. कृतज्ञतेचीही अपेक्षा करूं नये. कृतज्ञता दाखविली गेली तर तो त्याचा मोठेपणा असें समजावें. कारण परावलंबी प्राण्याची ही जात अशी आहे कीं त्याच्यासाठीं कितीही केलें तरी त्यांचें समाधान होणार नाहीं. तुमच्या बरोबरीनें त्यांना वागविलें तरी तुम्ही त्यांच्यासाठीं काय केलें असें म्हणून उलट तुमची बदनामी करण्यास ते कचरणार नाहींत. या गोष्टी ध्यानांत ठेविल्या म्हणजे मनस्तापाची पाळी येणार नाहीं.

परोपकाराच्या आनंदाला मर्यादा नाहीं असें वर सांगितलें. पण त्याला एक अपवाद आहे. कोणत्याही गोष्टीप्रमाणें परोपकाराचा अतिरेक होऊन उपयोगी नाहीं. कारण त्यानें आपली परोपकार करण्याची शक्तीच नाहींशी होईल. आणि आपल्याजवळची द्रव्याची ऊब जर कां केव्हां दुर्दैवानें संपली तर अगदीं आपले आपले

म्हणणारे असे मित्रसुद्धां आपल्याला ओळखीनासे होतील. सर्वस्वाचें दान करून दक्षिणेसाठीं बायकोला आणि मुलाला गुलामगिरींत टाकणाऱ्या हरिश्चंद्राचें उदाहरण म्हणजे परोपकाराच्या अतिरेकाचा एक दाखला आहे. त्याला अखेरीस स्वतः परमेश्वरानें दर्शन देऊन संकटमुक्त केलें. परंतु या कलियुगांत परमेश्वर कोणालाही संकटमुक्त करण्यासाठीं दर्शन देत नाहीं. तो प्रत्येकाला स्वतःच्या पायावर उभें रहावयास भाग पाडतो.

सार्वजनिक संस्थांना किंवा कार्याला मदत करतांना आणखी दोन गोष्टी ध्यानांत ठेविल्या पाहिजेत. कोणाच्याही वक्तृत्वाला भाळून भावनेच्या भरांत मदतीचें अभिवचन केव्हांही देऊं नये. दंडकच असा ठेवावा कीं मागणी झाल्यानंतर कांहीं ठराविक दिवस विचार केल्यानंतर आपला आंकडा कळवावयाचा. तेवढ्या वेळांत मागणाराच्या उलट पक्षाची बाजू काय आहे, संस्थेची योग्यता किती आहे, आपली देण्याची शक्ति किती आहे, या सर्व गोष्टींचा विचार करावा, आणि मदत अमुक द्यावयाची असें एकदां ठरलें म्हणजे ती एकदम देऊन टाकावी. नुसतें वचन देऊं नये. कारण आधीं वचन दिलें आणि पुढें परिस्थितीमुळें तें पुरें करणें शक्य झालें नाहीं तर मग होणारें बदनाम टाळणें फार कठीण जातें.

दुसरी गोष्ट अशी कीं आपण केलेल्या दानाचा आपल्या कुळाला पुरेपूर फायदा मिळवून घेणें हें आपलें कर्तव्य आहे. सार्वजनिक कार्याला मदत करणें हें श्रीमंतांचें कर्तव्य आहे असें लोक समजतात;

आणि तें योग्यही आहे. पण यासाठींच आपलें कर्तव्य आपण पार पाडीत आहों, ही गोष्ट लोकांच्या कानावर ठळकपणें जाईल याचीही व्यवस्था झाली पाहिजे. आपण केलेल्या दानाला पुरेशी प्रसिद्धी मिळून त्याबरोबरच आपल्या कुळांतील किंवा आपल्या राजाच्या कुळांतील वंदनीय व्यक्तींच्या नांवांचें स्मारकही व्हावें याकडे लक्ष दिलें पाहिजे. आपल्या सारख्या म्हणजे ज्यांची श्रीमंती राजकीय स्वरूपाची आहे अशा घराण्यांतील लोकांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे.

डॉ. सहाय यांनीं तुमच्या प्रकृतीबद्दल काय निदान केलें आहे तें डॉ. पालेकर यांनीं मला सविस्तर लेखी कळवावें म्हणजे काळजी दूर होईल. येथील कार्यक्रम नक्की होतांच तुम्हांस कळवितों, हे उत्तम प्रेमाशिर्वाद.

तुमचा प्रिय तात

**'बाबा'**

# १२

॥ श्री ॥

मुंबई,

१३ जुलै १९३६.

अनेकोत्तम प्रेमाशिर्वाद :—

शरीराची आणि मनाची सहनशीलता आणि चिकाटी हे दोन गुण प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांत अत्यंत महत्त्वाचे आहेत. मग तो गरीब असो किंवा श्रीमंत असो. हे दोन गुण नसतील तर गरीब मनुष्य अगदींच लुलापांगळा होऊन त्याला पोट भरावयाचीही पंचाईत पडेल. परंतु श्रीमंत माणसालाही यांच्या अभावीं आपल्या श्रीमंतीचा कांहीं उपयोग करून घेतां येणार नाहीं. मोठी संपत्ति चांगल्या रीतीनें सांभाळणें हेंसुद्धां मोठें कष्टाचें काम आहे. तें ज्याला उरकणार नाहीं, त्याला ती श्रीमंती सुखदायक होण्याऐवजीं अहर्निश चिंताग्रस्त आणि दुःखी ठेवील. कमकुवत मनुष्य संपत्तीवर स्वार होण्याऐवजीं संपत्ति त्यावर स्वार होते आणि लबाड लोकांच्या कारस्थानांनीं आणि नालायक नोकरांच्या गैरव्यवस्थेनें त्याला जिणें असह्य होऊन जातें. संपत्ती-

वर स्वार राहून सर्व कामाचें आणि आपल्याशीं संबंध येणाऱ्या सर्व लोकांचे लगाम बळकट हातीं धरून त्यांना स्वेच्छेनें वळविण्याची धमक ज्याच्या अंगीं असेल, त्यालाच आपल्या परिस्थितीचा उत्तम उपयोग करून घेतां येतो.

विशेषत: श्रीमंतींत जन्मलेल्यांना शारीरिक सहनशीलता आणि चिकाटी हीं दुर्मिळ असतात. बहुतेक सर्व कामें नोकरांकडून करविलीं जातात. स्वत:च्या गरजा स्वत: श्रम करून भागविण्याची, ऊन, वारा, थंडी, पाऊस यांना तोंड देण्याची, थकून गेल्यानंतर सुद्धां प्रसंग-विशेषीं काम करीत रहाण्याची संवय अशा लोकांना नसल्यामुळें, ते दिसायला हवे तितके गलेलठ्ठ असले तरी लोण्याच्या गोळ्याप्रमाणें लुले होऊन जातात. विशेषत: अलीकडच्या श्रीमंतांना या रोगाची भीती अधिक आहे. पूर्वीं मनुष्य श्रीमंत असला तरी त्याला प्रवास रानावनांतून, खांचखळग्यांतून, फार तर घोड्यावर बसून पण श्रमपूर्वक करावा लागे. तोच हल्लीं फर्स्ट क्लासच्या डब्यांतून, पहिल्या दर्जाच्या मोटारींत अशा रीतीनें प्रवास करूं शकतो. असाच फरक आणखी कित्येक गोष्टींत झाला आहे. याचा परिणाम असा कीं हल्लींच्या काळीं श्रीमंत माणसालाही काटक आणि चिवट रहावयाचें तर त्यासाठीं मुद्दाम काळजी घ्यावी लागते. अंगमेहनतीचे खेळ खेळणें, घोड्यावर बसणें, शिकार करणें इत्यादि प्रकार न चुकतां मधून मधून करावे लागतात. तुमच्यामध्यें यासंबंधीं उणीव राहूं नये म्हणून आम्ही बुद्धि-पूर्वक कशी व्यवस्था करीत आलों आहों हें तुम्हांला माहीत आहेच.

त्याचप्रमाणें जेथें नुसता ऐदीपणा आणि भपकाच चालणार नाहीं, वाटेल त्या प्रकारचें काम करावें लागेल, अशी शाळा तुमच्यासाठीं मुद्दाम कां निवडून काढली, हेंही यावरून तुमच्या ध्यानांत येईल. आम्ही अलाहाबाद येथील ॲग्रिकल्चरल इन्स्टिटयूटमध्यें शिकत असतां, डॉ. हिगिंबॉटम हे आमचे मास्तर होते. ते विद्यार्थ्यांशीं अतिशय कडक वागत असत. स्वतः आम्हांला खत देण्याचें घाणेरडें काम मुळींच आवडत नसे. पण याच कारणासाठीं मास्तरसाहेबांनीं आमची नेमक्या त्याच कामावर नेमणूक केली. करणार काय ? करणें भाग पडलें. पण त्याचा परिणाम असा झाला कीं आतां जहागिरींत किंवा दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं पहाणी करण्यास गेलों असतां, कितीही हीन दर्जाचें काम असलें तरी त्यापासून दुरूनच पळून तें सर्वस्वीं नोकरांवर सोंपवून देण्याचा प्रसंग आमच्यावर येत नाहीं. लहानपणीं मनाचा एक विशिष्ट कल बनला कीं तो तसाच पुढें रहातो. त्यावेळीं थोडें वाईट वाटतें, पण पुढें त्याचींच गोड फळें चाखावयास मिळतात, आणि म्हणूनच त्यावेळीं जरी आम्ही मनांत चिडलों असलों तरी आतां आमचे आणि डॉ. हिगिंबॉटम यांचे संबंध अत्यंत प्रेमाचे आहेत.

सहनशीलता आणि चिकाटी हे गुण शरीरापेक्षांही मनाच्या ठिकाणीं असणें कांकणभर अधिक महत्त्वाचें आहे. विशेषतः जे लोक मोठ्या पदावर पोहोंचलेले असतात, ज्यांना अनेक महत्त्वाच्या कामांचीं धोरणें ठरवून तीं अमलांत आणावीं लागतात, हजारों लोकांकडून काम

घ्यावें लागतें, सर्व प्रकारच्या लोकांशीं संबंध ठेवून त्यांना राजी ठेवावें लागतें, अशा लोकांना हे गुण अत्यंत मौल्यवान आहेत. जहागिरदार आणि हिंदी संस्थानिक यांना आपली कारकीर्द यशस्वी करावयाची असेल तर त्यांनीं या गुणांची प्रयत्नपूर्वक जोपासना केली पाहिजे. तुम्हांला या गुणांचा प्रत्यक्ष उपयोग करण्याचा प्रसंग येण्यास अवकाश आहे हें आम्हांला मान्य आहे. पण त्याची तयारी आतांपासूनच ठेविली नाहीं तर ते ऐन वेळीं मिळवितां येणार नाहींत आणि आम्हीहि अनुभवानें ज्या गोष्टी खास तुम्हांला सांगाव्या असें मनांत येतें त्या सांगण्यासाठीं थांबणें योग्य होणार नाहीं. कारण पुष्कळ वेळां असें होतें कीं मुलगा डोईजड होईल या भीतीनें पिता आपली विद्या त्याच्यापासून अगदीं अखेरीपर्यंत लपवून ठेवतो. आणि मग प्रसंगीं ती त्याच्याबरोबरच निघून जाते, किंवा दुसऱ्या कोणा माणसाच्या द्वारा ती विकृत स्वरूपांत मुलाला प्राप्त होते. म्हणून आम्ही सांगत असलेले विचार पुढें उपयोगांत येण्याजोगे असले तरी त्यासाठीं आज त्यांकडे दुर्लक्ष करूं नये.

लहानमोठ्या कोणत्याही राजकीय कामांशीं ज्यांचा संबंध येतो अशीं माणसें मुत्सद्दी असावीं लागतात. आणि मानसिक चिकाटी आणि सहनशीलता हे दोन गुण मुत्सद्याला अत्यंत आवश्यक आहेत. मानसिक चिकाटीचा उपयोग कोणत्याही गोष्टीसंबंधाचें धोरण ठरविण्यासाठीं होतो. शरीराप्रमाणें मनालाही चिकाटीनें काम करण्याची संवय असावी लागते; म्हणजे गोष्ट कितीही गुंतागुंतीची असली तरी

तिच्या खनपटीस बसून तिचा धागा नि धागा खोदून काढून, तिची पुरेपूर माहिती मिळवितां येते. आणि मग तिच्यासंबंधीं निश्चित धोरण ठरवितां येतें. धोरण ठरवितांना वेळ लागला तरी हरकत नाहीं; लोकांनीं मंद म्हटलें तरी प्रत्यवाय नाहीं; पण ठरवितांना तें विचारपूर्वक ठरवावें. मागून असें म्हणण्याची पाळी येऊं नये कीं त्यावेळीं आम्हीं घाईत होतों, आणि अमुक अमुक गोष्टी आम्ही पाहूं शकलों नाहीं. पण एकदां धोरण ठरलें म्हणजे मग मात्र त्याला घोरपडीप्रमाणें चिकटून राहिलें पाहिजे. वारंवार धोरणें बदलणारावर लोकांचा विश्वास बसत नाहीं. आणि वारंवार बदलल्यामुळेंच कोणत्याही एका धोरणाचें पुरें फळ मिळत नाहीं. राजकीय उच्चस्थानावरच्या माणसाचें धोरण अंमलांत आणणारें यंत्र फार मोठें असतें. वरपासून खालपर्यंतच्या अधिकाऱ्यांना व नोकरांना तें समजून घेऊन मग त्याचा अंमल करावयाचा असतो. अशा रीतीनें वरच्या थरापासून तें शेवटल्या थरापर्यंत पोहोंचण्याच्या आधींच दुसरें धोरण वर सुरू झालें तर ही सर्व मेहनत वाया जाते. आणि नोकर लोकही ही अस्थिरता पाहून कोणत्याही एका धोरणांत पुरें लक्ष घालण्याचे श्रम घेत नाहींत. वारा येईल तशी पाठ फिरवून होला हो म्हणतात. कारण ते मनांत म्हणतात कीं यांत श्रम करून काय फायदा? दोन महिन्यांत दुसरीच लहर येईल. असा प्रकार झाल्यास कोणतेंच काम समाधानकारक रीतीनें आपल्या हातून पार पडणार नाहीं. थोडीं कामें हातीं घेणें वाईट नाहीं; पण जीं हातीं घेतलीं त्यांची पुरी तड लावण्याचा निश्चय पाहिजे. सरदार, जहागिरदार

आणि संस्थानिक यांचा लहरीपणा आधींच प्रसिद्ध आहे. त्याचा फायदा घेऊन आपल्या 'Expert' सल्लामसलतीनें त्यांची शिकार करणाऱ्या लोकांचीं टोळकीं सारखीं फिरत असतात. मागल्या एका पत्रांत लिहिल्याप्रमाणें यांच्यापासून सावध राहिलें पाहिजे. धोरण स्थिर आहे अशी ज्याची कीर्ती झालेली असेल त्याच्या वाटेस हे लोक सहसा जात नाहींत; आणि गेले तर त्यांची फजिती होते.

मानसिक चिकाटीप्रमाणेंच मानसिक सहनशीलता हा गुण मुत्सद्याच्या अंगीं आवश्यक आहे. राजकीय स्वरूपाच्या कामांत सज्जनाप्रमाणेंच दुर्जनांचाही उपयोग करून घ्यावा लागतो. आणि उघड्या डोळ्यांनीं दुर्जनांशीं वागतांना तो आपले गुण केव्हां ना केव्हां तरी प्रगट केल्याशिवाय रहाणार नाहीं, हें ध्यानांत ठेवावें लागतें. अशा वेळीं आपला तोल जाऊन भावनेच्या भरांत आपल्या हातून असें कोणतेंहि कृत्य कायिक वा वाचिक होऊं नये कीं जें निस्तरतांना पुढें अडचण पडेल. यासाठीं लागणारा मानसिक शांतपणा प्रयत्नानें साध्य करून घ्यावा लागतो. लहानपणापासून शिस्तींत वागण्याची, आणि स्वतःला अप्रिय वाटणाऱ्या गोष्टीसुद्धां शिस्तीसाठीं शांतपणानें आणि आनंदानें करण्याची संवय असली म्हणजे हें काम अवघड होत नाहीं. तुम्हांला अप्रिय वाटणाऱ्या गोष्टी कधीं कधीं आमच्यामुळें तुम्हांला कराव्या लागल्या आहेत त्यांतील हेतूही आतां तुमच्या ध्यानांत येईल.

तुमची प्रकृति सुधारतांच तुम्ही आपल्या प्रिय मातेस ग्वाल्हेरीस धाडावें. त्यांनीं आतां मसूरीस रहाणें त्यांचे प्रकृतीस मानवणार नाहीं.

शिवाय तुमच्या रोज पावसांतून शाळेस जाण्यानें आजाराचा संभव आहे, तेव्हां बोर्डिंगमध्येंच रहाणें बरें.

मी एक दोन दिवसांतच ग्वाल्हेरीस जात आहें, हे उत्तम प्रेमाशिर्वाद.

तुमचा प्रिय तात
**'बाबा'**

# १३

॥ श्री ॥

मुंबई
१४–७–१९३६.

अनेकोत्तम प्रेमाशिर्वाद :—

संस्कृत भाषेंत गर्व आणि घाण या दोन्ही अर्थीं " दर्प " हा एकच शब्द आहे. यावरून गर्व हा दुर्गुण किती तिरस्करणीय मानला जातो त्याची कल्पना येईल. प्रत्येक माणसाच्या अंगीं कांहीं सद्गुण हे असतातच. आणि त्यासाठीं लोकांनीं आपल्याला बरें म्हणावें अशीही प्रत्येकाला इच्छा असते. खोट्या स्तुतीला फक्त मूर्ख लोक बळी पडतात हें खरें असलें, तरी आपल्या अंगीं जे गुण असतात त्याबद्दल लोकांनीं आपल्याला चांगलें म्हणावें ही इच्छा, सुप्त किंवा जागृत, ज्याच्या मनांत नाहीं, आणि स्वतःच्या गुणांबद्दल कोणी दोन चांगले शब्द काढले तर ज्याच्या मनाला आनंद होत नाहीं, असा मनुष्य सांपडणें कठिण आहे. येथपर्यंत सर्व ठीक आहे. पण पुष्कळ लोक असे असतात कीं लोकांनीं त्यांचे गुण ओळखले

नाहींत तर, तेच स्वतः ते लोकांना सांगत सुटतात. तो मनुष्य या बाबतींत खरोखरच प्रामाणिक असेल; परंतु मनुष्यस्वभाव असा चमत्कारिक आहे कीं कोणीही स्वतःच्या गुणाचें वर्णन करूं लागला कीं त्याबद्दल ऐकणाराच्या मनांत तिरस्कार उत्पन्न होतो. त्याच्या खरोखरीच्या गुणांची कांहीं किंमत रहात नाहीं. आणि त्याच्यावर गर्विष्ठ असा शिक्का बसतो. कांहीं लोक तर याच्याही पलीकडे जातात. त्यांच्या अंगीं जे गुण नाहींत ते आहेत असा त्यांचा गैरसमज झालेला असतो, आणि त्यांचें अस्तित्व कोणाच्याही अनुभवानें प्रत्ययास येणारें नसल्यानें, ते स्वतःच ती गोष्ट सर्वांना पटवून देण्याचा प्रयत्न करतात. अशीं माणसें सर्वांच्या थट्टेस आणि अनादरास पात्र होतात. आणि क्वचित् प्रसंगीं त्यांच्या जन्मजात मोठ्या पदवीमुळें त्यांच्या तोंडावर तसें सांगण्याला लोक भीत असले तरी त्यांची पाठ फिरतांच हंसून आणि डोळ्यांनीं कुचेष्टेच्या खुणा करून ते आपला अभिप्राय एकमेकांस जाहिर करतात.

फुलाचा वास समजावून देण्याचा प्रसंग आला तर दोहोंपैकीं एक गोष्ट निश्चित असली पाहिजे. फुलाला वासच नसला पाहिजे किंवा वास घेणाऱ्याच्या नाकांत कांहीं तरी दोष असला पाहिजे. आपल्या अंगचे गुण लोकांच्या ध्यानांत येत नाहींत असें आढळून आलें तर निश्चित समजावें कीं ते आपल्या अंगीं आहेत असें वाटणें हा आपलाच भ्रम आहे. कारण या बाबतींत सर्वांचीं नाकें एकदम बिघडलेलीं असणें शक्य नाहीं. अशा वेळीं आपण ते दुसऱ्यांना पटवून देण्याच्या प्रयत्ना-

इतका मूर्खपणा कोणताच नाहीं. कारण त्यानें आपला हेतू साध्य होत नाहीं तो नाहींच, पण उलट आणखी एक दुर्गुण आपल्याला चिकटतो.

आपण असें म्हणाल कीं आपल्या मागल्या पराक्रमांना हें कसें लागूं पडणार ? आपण कोठें नवीन ठिकाणीं पहिल्यानेंच गेलों तर आपले मागले पराक्रम आपण स्वतःच सांगितल्याशिवाय लोकांना कसे कळणार ? बरोबर आहे. पण अशा परिस्थितींत सुद्धां ते स्वतः सांगण्यांत कांहीं फायदा नाहीं. कारण तसें केल्यानें गर्विष्ठपणाच्या छापापासून सुटका होत नाहीं. शिवाय कोणीही स्वतःचें गुणवर्णन करूं लागला तर तें ऐकणाराला आवडत नाहीं. आणि तिसरी सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी कीं त्यावर त्याचा सहसा विश्वास बसत नाहीं. अशा स्थितींत आपल्या फजितीस पारावार नाहीं. पुष्कळ लोकांना हा मोह आवरत नाहीं. आपण मिळविलेलीं पदकें किंवा बिल्ले, किंवा आपल्याला मिळालेल्या पदव्या यांचें आणि तीं मिळालेल्या प्रसंगांचें ते आपल्याकडून मोठें रसभरित वर्णन करितात. पण अशा वेळीं ऐकणारानें कितीही सावधगिरी बाळगिली तरी तो निदान एक तरी जांभई देतोच आणि मग सांगणारा एरवीं शहाणा असला तर त्याचें तोंड फोटो घेण्याजोगें होतें.

पुष्कळ प्रसंग असे येतात कीं आपल्याला विशिष्ट लोकांवर आपल्या पूर्वचरित्राची छाप पाडणें हें दुसरें कोणतें तरी महत्त्वाचें कार्य साधण्यासाठीं आवश्यक असतें. अशा वेळीं सुद्धां आपल्या पराक्रमाच्या

कथा पसरविण्याचें काम आपण स्वतः कधींही करूं नये.

गर्विष्ठपणाचा एक प्रकार मात्र प्रयत्नपूर्वक टाळला पाहिजे. दुसऱ्याचे दोष दाखवून त्याच्या तुलनेनें आपला मोठेपणा प्रस्थापित करणें, किंवा दुसऱ्याच्या कमीपणाची त्याला जाणीव देणें, हा तो प्रकार होय. ज्या ज्या वेळीं तुम्ही दुसऱ्या कोणाचे दोष दाखवाल त्या त्या वेळीं त्याच्या मनांत तुम्ही स्वतःविषयीं अप्रियता उत्पन्न कराल; आणि जेव्हां जेव्हां तुम्ही एखाद्याला त्याच्या कमीपणाची जाणीव करून द्याल, किंवा तिरस्कारानें वागवाल तेव्हां तेव्हां तुम्हीं आपल्यासाठीं एक हाडवैरी निर्माण कराल हें ध्यानांत ठेवावें. कारण, रागाच्या भरांत दोन कठोर शब्द बोलले गेले, किंबहुना मारामारीही झाली तरी ती गोष्ट माणूस लवकर विसरूं शकतो. पण शांतपणानें किंवा गमतीनें आपल्या मोठेपणाच्या ऐटींत आपण एखाद्याचा पाणउतारा केला तर त्यानें केलेली जखम कधींही बुजत नाहीं. तो मनुष्य सूडाची वाट पहात बसतो. आणि एका क्षणाच्या मौजेसाठीं फार मोठ्या नुकसानाचा पाया आपण घालून ठेवतों.

गर्विष्ठपणा हा जितका वाईट तितकीच स्वाभिमानशून्यताही वाईट. स्वाभिमान आणि गर्व यांच्यामधला फरक थोडक्यांत सांगावयाचा तर असा सांगतां येईल. गर्व हा स्वतःचा वैयक्तिक मोठेपणा प्रस्थापित करण्यासाठीं असतो. स्वाभिमान हा स्वतःच्या व्यक्तीहून श्रेष्ठ अशा गोष्टींचा मोठेपणा रक्षण करण्यासाठीं असतो. आपलें शील, आपलें कुल, आपलें राष्ट्र अशा सारख्यांच्या मोठेपणावर शितोडे उडण्याचा

प्रसंग आला तर त्याचा तात्काळ प्रतिकार करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. गर्विष्ठपणामुळें मनुष्य तिरस्करणीय होतो, तर स्वाभिमानी माणसा-बद्दल सर्वांना आदर वाटतो. औरंगजेबाच्या दरबारांत एकटा उभा असतांना शिवाजीनें मान लववविण्याचें नाकारलें तें त्याच्या स्वतःच्या मानासाठीं नव्हे. ज्या राष्ट्राला मृतावस्थेंतून काढून त्यानें पुन्हां तेजस्वी बनविलें, त्या महाराष्ट्राच्या मानापमानाचा तेथें प्रश्न होता. मान वांकविण्याचें नाकारून त्या थोर पुरुषानें स्वतःचा जीव धोक्यांत घातला. पण त्याबरोबरच "दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा" अशा अभिमानानें ताठरलेल्या औरंगजेबाला आणि आपल्या देशाचें सर्वथैव नुकसान करणाऱ्या अशा यावनी साम्राज्याला त्यानें असा धक्का दिला कीं त्यानंतर पुन्हां वर डोकें काढणें त्यांना शक्य झालें नाहीं.

वैयक्तिक प्रश्न असेल त्यावेळीं कोणालाही हवा तितका विनय करण्याचा किंवा नम्रता दाखविण्याचा अधिकार आहे. पण जेथें कुलाचा, राजाचा, किंवा राष्ट्राचा संबंध असेल अशा वेळीं मागें घेणें किंवा विनय दाखविणें हें भ्याडपणाचें किंवा बुळेपणाचें लक्षण आहे. जुन्या घराण्यांतील पुरुष चालत आलेल्या पदव्या पुढें चालविण्याचा किंवा मिळालेले मानमरातब कायम राखण्याचा अट्टाहास करतात, त्यांतील इंगित हेंच आहे. आपल्या स्वतःच्या नांवाच्या मागें पुढें चार शब्द लावण्यांत त्यांना स्वतःला स्वर्ग दोन बोटें उरल्यासारखा वाटतो असें मुळींच नाहीं. पण वंशपरंपरा आलेल्या पदव्या हें पितृधन आहे, आणि कुलासाठीं त्याचें प्रयत्नपूर्वक संरक्षण करणें हें प्रत्येकाचें

कर्तव्य आहे. त्याचप्रमाणें ज्या संस्थेबद्दल सर्व लोकांच्या मनांत आदर कायम रहावा हें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें आवश्यक असेल, त्या संस्थेचा मोठेपणा प्रस्थापित करण्यासाठीं पुष्कळ वेळां तिनें दिलेल्या पदव्यांचा मान कायम ठेवण्याचा आग्रह धरणें आवश्यक होतें. अशा वेळीं मूर्ख लोकांनीं कितीही ओरड केली, पदव्यांचा लालची, गर्विष्ठ, अशीं विशेषणें दिलीं तरी त्याकडे लक्ष न देतां आपला हेतु चिकाटीनें साध्य केला पाहिजे. हे लोक अशा गोष्टींना निरुपयोगी म्हणतात; कारण त्यांच्या पाठीचा कणा इतका लुला आणि निर्जीव असतो कीं मान ताठ करून वर पहाण्याची ताकदच त्यांच्यांत नसते.

डॉ. भगवती सहायकडून अद्याप पत्र नाहीं किंवा तुमचें पत्र बरेच दिवसांत नाहीं, त्यामुळें काळजी वाटते.

मी परवांच येथें आलों आणि आतां पुढील प्रवासास आज निघेन. उद्यां ग्वाल्हेरीस पोहोंचेन. प्रकृतीस बरें असल्यास मसूरीस येईन.

प्रकृतीचे सुधारणेस औषधापेक्षां मनाच्या खंबीरपणाचा बराच फायदा होतो. मी मसूरीहून निघालों तों डेराडूनला मला ताप आला. तसाच पुढें प्रवास केला. ग्वाल्हेरीस तापानें सोडलें नाहीं. पण कामाचें महत्त्व लक्षांत घेतां तसाच निघालों व मुंबईहून निघतांना मला १००° ताप होता तो रस्त्यांत १०१° झाला; पण कार्याचा उत्साह हाच शेवटीं उपाय झाला आणि आतां ताप सायंकाळीं ९९° पर्यंत जातो. इतका कमीवर आला आहे, तोही ग्वाल्हेरीस पोहोंचलों म्हणजे अजीबात

कमी होईल असा विश्वास आहे. तुम्हीहि हा प्रयत्न करावा. मला विश्वास वाटतो कीं तुम्हांसही यश येईल.

पत्रोत्तरीं ( ग्वाल्हेरचे पत्त्यावर ) सविस्तर वर्तमान कळवावें. प्रकृति बरी नसल्यास डॉ. पालेकरांकरवीं कळवावें, हे उत्तम प्रेमाशिर्वाद.

तुमचा प्रिय तात,

**'बाबा'**

## १४

॥ श्री ॥

संभाजी विलास,
ग्वाल्हेर
२४ जुलै १९३६.

अनेकोत्तम प्रेमाशिर्वाद :–

जगामध्यें अत्यंत दुर्मिळ अशा ज्या कांहीं गोष्टी आहेत, त्यांतील खरी मैत्री ही एक आहे. परंतु आपल्या परिस्थितींतल्या माणसांना तरुणपणीं हें विधान पटणें जवळ जवळ अशक्य असतें. त्यावेळीं त्यांचा अनुभव अगदीं वेगळा असतो. ज्यांच्याशीं त्यांचा संबंध येतो अशांपैकीं पुष्कळच लोक त्यांच्याशीं अतिशय प्रेमानें आणि आदरानें वागतांना आढळतात. कोठें नुसते दोन दिवस रहाण्याचा प्रसंग आला तरी तेथील लोक आठवणीनें पत्रें पाठवितात, भेटी पाठवितात, वर्षगांठीची आठवण ठेवतात, आपल्या प्रकृतीबद्दल आस्था बाळगितात, संधी येतांच भेट घेतल्याशिवाय रहात नाहींत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे खरा मित्र नित्य ज्या ज्या गोष्टी करील त्या त्या सर्व करितात. इतकेंच नव्हे तर त्याचें तुमच्यावर किती प्रेम आहे तें अनेक वेळां प्रतिपादनही करितात, आणि तिऱ्हाईत माणसेंसुद्धां त्यांच्या प्रेमाची वाखाणणी करतात. सगळीकडून मित्रांचा इतका भरपूर पुरवठा असतांना

मैत्री ही दुर्मिळ आहे असें कां म्हणावें हें त्यांना समजत नाहीं.

तुमच्याशीं आमची फार मैत्री आहे असें वारंवार सांगण्याचा जे लोक प्रयत्न करतील त्यांच्यापासून सावध रहा. तुमच्या मैत्रीचा फायदा घेण्यास उत्सुक असलेल्या लोकांची संख्या केव्हांही कमी पडणार नाहीं. विशेषतः येत्या कांहीं वर्षांत तरी ती वाढत जाईल. याविषयीं एक खूण चांगली उपयोगी पडण्याजोगी आहे. खरा मित्र आपली मैत्री तोंडानें कधींच बोलून दाखवीत नाहीं. आणि तसा प्रसंग आलाच तर बोलतांना त्याला फार संकोच वाटतो. मैत्रीचें मोठ्या उत्साहानें तो कधींच प्रतिपादन करणार नाहीं.

मैत्री हा पदार्थ जितका दुर्मिळ आहे तितकाच मौल्यवानही आहे. परंतु मौल्यवान पदार्थ अनायासें कधींच मिळत नाहींत. त्यासाठीं आपली पात्रता असावी लागते, आपल्याला त्याग करावा लागतो. आपण दुसऱ्यांसंबंधीं जितकी आस्था बाळगूं तितकीच दुसरे आपल्यासंबंधीं बाळगतील. यासाठीं मित्राची निवड करतांना प्रथम स्वतःकडे पाहिलें पाहिजे. जगांत सद्गुणांचा पुतळा असा कोणीच असत नाहीं. एखाद्या माणसाच्या अंगीं एखादा अवगुण आढळला म्हणजे तो लगेच आपल्या मैत्रीला अपात्र होतो असें मुळींच समजूं नये. आपल्या अंगीं तरी सर्वच सद्गुण कोठें असतात ? कारण आपली किंमत आपण आपल्या विचारसरणीवरून आणि इतरांची त्यांच्या कृतीवरून करतों; आणि म्हणूनच अशी चूक होणें स्वाभाविक आहे. आपले दोष आपल्याला माहीत असले पाहिजेत. आणि तसें असलें तरी आपण

स्वतःवर प्रेम करतोंच. हीच दृष्टि दुसऱ्याकडे पहातांनाही लाविली पाहिजे. विश्वास आणि साहचर्याची आवड या दोन गोष्टी असल्या म्हणजे मैत्रीचें बहुतेक काम भागतें. एकमेकांना सुखकाळाप्रमाणेंच संकटकालींहि सहाय्य करणें इत्यादि गोष्टी त्याच्या पाठोपाठ आपोआप येतात. परंतु ज्यांच्या मैत्रीची आपण अपेक्षा करतों त्यांच्यासंबंधींचा आपला मित्रभाव कृतीनें प्रगट झाला पाहिजे.

मित्राची निवड करतांना विवक्षित मनुष्याला आपल्या खऱ्या मैत्रीची अपेक्षा आहे कीं नाहीं तें नीट ध्यानांत घेतलें पाहिजे. आपल्यापासून किंवा आपल्यामुळें स्वतःचा आर्थिक लाभ करून घेऊं इच्छिणारे, किंवा आपली मैत्री हा एक लोकांना अभिमानानें दाखवावयाचा अलंकार म्हणून मानणारे असे जे लोक आपल्याजवळ येऊं पाहातील, त्यांच्याशीं आपली खरी मैत्री जुळणें केव्हांही शक्य नाहीं, ही खूणगांठ बांधावी. मात्र ती मनांतच ठेवावी. अशा लोकांनासुद्धां तिरस्कारानें वागवूं नये. त्यांच्या मित्रभावासाठीं बोलतांना त्यांचे आभार मानावे. परंतु त्यांना विश्वासांत घेण्याची मात्र घाई करूं नये; कारण त्यामुळें पुढें पश्चात्ताप करण्याची पाळी येईल.

तरुणपणीं येणारें आणखी एक प्रकारच्या मित्रांचें पीक आहे. हें दिसावयाला फार गोड पण परिणामीं भयंकर अशा स्वरूपाचें असतें. तें म्हणजे चैनबाजी किंवा दुर्व्यसनें यांच्या निमित्तानें जवळ आलेल्या लोकांचें. केवळ या कारणांमुळें जवळ आलेल्या माणसांना मित्र समजणें म्हणजे रोगांना मित्र समजण्यासारखेंच आहे. पण दुर्दैवाची गोष्ट अशी

कीं, या जाळ्यांत फसणाऱ्या तरूण सधनांची संख्या थोडी नाहीं. पैशाच्या दृष्टीनें सुस्थितींत असलेलीं माणसें दोन वेळां जेवण आणि स्नानपूजा करून बाकी सर्व वेळ कर्तव्यरत रहातील अशी अपेक्षा कोणी फारशी करीत नाहीं. तशा वृत्तीनें रहाणारेहि कांहीं लोक आहेत; अगदींच नाहींत असें नाहीं. आणि त्यांच्या शुद्ध वर्तनाचें फळही त्यांना मिळतें. लोक त्यांना देवासारखे पूज्य मानूं लागतात. परंतु सामान्यतः श्रीमंती-बरोबर थोडीबहुत चैन येतेच. अत्यंत दुःखाची आणि धोक्याची गोष्ट ही कीं अशा चैनींत भाग घेणारे आणि चैनीचे नवे नवे आकर्षक प्रकार सुचविणारे लोक जिवलग मित्र मानले जातात. तारुण्याच्या काळांतलें शारीरिक सुख मोठ्या प्रमाणांत मिळवून देण्याला हेच लोक पुढें पुढें येत असल्यामुळें त्यांचा पगडा मनावर बसूं लागतो. वडील माणसें किंवा आपले जुने हितचिंतक आणि विश्वस्त सल्लागार हे अशा वेळीं बहुधा पुढें शरीराची नासाडी करणाऱ्या या सुखोपभोगांना किंवा व्यसनांना विरोध करतात. यामुळें ते त्रासदायक वाटूं लागतात. व्यसनांतले मित्र त्यांच्या-संबंधीं खोट्यानाट्या गोष्टी सांगूं लागतात, त्यांवर विश्वास बसतो. पुढें पुढें हेच लोक सल्लागारांची जागा पटकावतात. भिस्ती पोलिस खात्याचे मुख्य होतात. घाणेरड्या कामासाठीं दलाली करणारे न्यायाधीश होतात आणि मस्करे अथवा हुजरेही दिवाण होतात. तारुण्याच्या कैफांत या गोष्टींचा दूरवरचा परिणाम ध्यानांत येत नाहीं. तावून सुलाखून, पारखून विश्वासाचीं म्हणून ठरलेलीं जीं जुनीं जुनीं माणसें असतात त्यांचा अपमान आणि पाणउतारा होतो. मग तीं बिचारीं

दैव कोपलें आणि आपले दिवस संपले म्हणून दुःखानें अश्रू गाळीत कोपऱ्यांत बसतात आणि आमच्या मालकाला यांतून वाचीव म्हणून ईश्वराची प्रार्थना करूं लागतात. चैनीच्या गोष्टींचा व्यवहाराशीं गोंधळ केल्यानें अखेर दोन्ही बिघडतात. केवळ नीचपणाचीं कामें करण्यांत ज्यांनीं कौशल्य मिळविलें आहे, त्यांच्या हातून कारभाराचें किंवा कोणतेंहि जबाबदारीचें काम होणें किंवा त्यांच्या अंगीं त्यासाठीं सल्ला देण्याचीही योग्यता असणें अशक्य आहे. आपल्या कार्यासाठीं किंबहुना वासनातृप्तीसाठीं अशा लोकांना हाताशीं धरणें किंवा त्यांच्यांत मिसळणें आवश्यक झालेंच, तरी त्यांना अंतःकरणांतल्या मित्राचें पद कधींही मिळतां कामा नये. त्यांचें क्षेत्र सोडून दुसऱ्या विषयाची गोष्टही त्यांना काढूं देऊं नये. आणि त्यांनीं सांगितलेल्या कांहीं गोष्टी खऱ्या असल्याचा अनुभव आला तरीहि नियम असा ठेवावा कीं त्यांच्या कोणत्याही सांगण्यावर विश्वास ठेवावयाचा नाहीं. अशा लोकांच्या नादीं लागून सच्चा लोकांना जर आपण दुखविलें तर त्यामुळें पुढें होणाऱ्या पश्चात्तापाच्या यातना सर्व सुखावर बोळा फिरवितील. ज्या ज्या जखमा त्यांच्या हृदयावर केल्या जातील त्या त्या अधिक दुःखदायक स्वरूपांत पुढें केवळ स्मरणानेंही आपल्या हृदयावर उमटून जीवन भकास करतील. हें संकट टाळण्याइतकें ज्यांचें मन स्थिर आणि कणखर असेल, तोच सुख आणि यश हीं दोन्ही मिळवूं शकेल, हे उत्तम आशिर्वाद.

तुमचा प्रिय तात,

**‘ बाबा ’**

## १५

॥ श्री ॥

संभाजी विलास,
ग्वाल्हेर
२७ जुलै १९३६.

अनेकोत्तम प्रेमाशिर्वादः—

मनुष्यप्राणी आणि इतर जीव यांच्यामध्यें मनुष्याला श्रेष्ठता प्राप्त करून देणारे जे कांहीं भेद आहेत त्यांतील अत्यंत महत्त्वाचा भेद हा कीं मनुष्याला परंपरेचा लाभ मिळूं शकतो. मानवी संस्कृतीचा विशाल प्रासाद केवळ परंपरेच्या सहाय्यानें उभारला गेला आहे. खाद्यपेयांच्या संचयापासून तों भौतिक शास्त्रांनीं निर्माण केलेल्या राक्षसी शक्तीच्या यंत्रांपर्यंत, आजीबाईनें नातवंडांना सांगितलेल्या कुत्र्यामांजरांच्या गोष्टी-पासून तों तेजस्वी ज्ञानखंडांनीं भरलेल्या मौल्यवान ग्रंथांपर्यंत, मानवी संस्कृतीच्या आजच्या भव्य स्वरूपाचा प्रत्येक लहान भाग, हजारों वर्षांच्या परिश्रमानें जपून घडविला गेला आहे. पशुपक्ष्यांप्रमाणें प्रत्येक मनुष्याला हरएक गोष्ट स्वतःच्याच विचारानें करणें भाग पडलें असतें, तर मनुष्यजात वानरांहून वरच्या इयत्तेला कधींच पोहोंचली नसती.

पूर्वजांच्या अनुभवसिद्ध ज्ञानामुळें वर्तनाचे जे नियम एका पिढीपासून दुसऱ्या पिढीला अशा क्रमानें जात असतात त्यांचेंच नांव परंपरा.

सर्वकाळीं सर्व देशांची परिस्थिति सारखी नसते म्हणून परंपरा भिन्न भिन्न प्रकारच्या निर्माण होतात. यूरोपांतील प्राचीन लोकांना ज्या संकटांशीं झगडावें लागलें त्यांचें स्वरूप प्राचीन हिंदवासीयांपुढें आलेल्या अडचणींहून वेगळ्या प्रकारचें होतें. युरोपांतील वेषभूषा, खाद्यपेयांचे प्रकार वगैरे तेथील वायुमानाला अनुरूप अशीं झालीं, तोच प्रकार हिंदुस्थानांत आणि त्याचप्रमाणें प्रत्येक देशांत झाला.

ज्या ज्या कुलांना इतिहासांत कांहीं महत्त्वाचें स्थान प्राप्त झालेलें असतें त्यांची स्वतःची अशी कांहीं परंपरा असते. तिलाच कुलपरंपरा म्हणतात. परंपरेला महत्त्व देण्याचें कारण जें वर सांगितलें आहे त्यावरून कुलपरंपरासुद्धां राखण्यासाठीं प्रत्येकानें किती झटलें पाहिजे याची तुम्हांला कल्पना येईल. आपलें मोठेपण हें पुष्कळ अंशीं या परंपरेवर अवलंबून असतें. ज्यांच्या कुळांचाच पत्ता नाहीं अशा लोकांनीं वाटेल तसें आचरण केलें तरी त्याची कोणी विशेषशी पर्वा करणार नाहीं. परंतु आपल्यासारख्याकडून आपल्या परंपरेला साजेशा कांहीं विशिष्ट वर्तनाची अपेक्षा केली जाते. आणि त्या परंपरेला आपण अयोग्य ठरलों तर त्यामुळें आपली आणि आपल्याबरोबर आपल्या कुलाची अपकीर्ति होते. थोर कुलांतील जन्म हा जसा माणसाला कांहीं सुखसोयी प्राप्त करून देतो तसाच तो त्याच्यावर कांहीं बंधनेंही घालतो. बंधनें त्याच्याच कुलांतलीं, ज्यांचें रक्त त्याच्या अंगांत खेळत असतें

अशाच माणसांनीं निर्माण केलेलीं असल्यामुळें, तीं त्याच्या आनुवंशिक स्वभावाला जुळणारीं असतात, आणि बहुधा तीं पाळणें ही गोष्ट त्याला आनंदाची आणि अभिमानाची वाटते. या बाबतींत राजा हरिश्चंद्राचा मुलगा रोहिदास याचें पुराणांतलें उदाहरण मोठें मार्मिक आहे. रानांतील वणव्याच्या झळा लागून तहानेनें तो आठ नऊ वर्षांचा मुलगा व्याकुळ झाला असतां आणि अशा स्थितींत त्याच्या समोर त्यावेळीं त्याला प्राणापेक्षांही प्रिय वाटणारें असें मधुर थंड पाणी आलें असतां तें पाणपोईचें असल्यामुळें क्षात्रकुलांतल्या माणसाला स्वीकारतां येत नाहीं असें म्हणून त्यानें नाकारिलें. त्यावेळीं त्याला केवढें आत्मसंयमन करावें लागलें असेल ?

परंपरागत बंधनें आणि कर्तव्यें हीं माणसाचें तेज वाढवितात आणि तीं पाळणाराकडे लोक विश्वासानें आणि आदरबुद्धीनें पहातात. कांहीं थोडे अपवाद सोडले तर थोर कुळाचें तेज केव्हांही लपत नाहीं. थोरले माधवराव पेशवे यांच्या हातीं पेशवेपणाचीं सूत्रें आलीं त्यावेळीं त्यांचें वय पंधरा वर्षांहून अधिक नव्हतें. व्याप फार मोठा होता, आणि मोठेमोठे सेनापतिसरदारसुद्धां हताश झाले होते. अशाच एका प्रसंगीं एका सरदारानें माधवरावांसमोर उद्गार काढले, " स्वामी होते तेव्हां काम दाखविलें, आतां काम पहायला कोण आहे ? " माधवराव किंचित् कठोरपणानें म्हणाले, " काम पहायला कोण आहे ? मग मी कोण आहें ? " त्याबरोबर तो सरदार पुढें येऊन म्हणाला, " आतां काम झालें ! आतां आमचा पराक्रम पहा ! "

आणि तेव्हांपासून सर्वांच्या अंगांत इतका उत्साह संचरला कीं त्यानें मराठेशाहीच्या इतिहासांत माधवरावांचें नांव अजरामर केलें.

थोर कुलांतल्या माणसांकडे लोक मोठ्या आशेनें पहात असतात. अशा वेळीं वयाचा किंवा शिक्षणाचा विचार केला जात नाहीं. परंपरेच्या सामर्थ्यावर लोकांचा इतका भरंवसा असतो कीं अशा माणसांकडे संकटसमयीं ते विश्वासानें धांव घेतात. म्हणून अशा थोर परंपरेंत जन्माला येण्याचें भाग्य ज्यांना लाभलें आहे त्यांचें कर्तव्य आहे कीं त्यांनीं आपल्या आचरणानें हा विश्वास पुरा करावा.

कुलपरंपरेप्रमाणेंच विचारपरंपरा हीहि एक प्रयत्नपूर्वक संरक्षिण्या-जोगी वस्तू आहे. कुलपरंपरा ही जशी पित्याकडून पुत्राकडे जाते त्याचप्रमाणें विचारपरंपरा गुरूकडून शिष्याकडे जाते. आजच्या काळींसुद्धां पाश्चात्यांना आश्चर्यानें थक्क करून सोडणारें जें विचार-भांडार फार प्राचीन काळीं या आर्यावर्तांत निर्माण झालें, तें अशाच परंपरेनें जतन केलें आहे. तें ज्यांच्या हातीं येतें त्यांचें कर्तव्य आहे कीं तें जपून ठेवून त्यांत आणखी भर घालून तें पुढल्यांच्या स्वाधीन करावें. वर सांगितलेंच आहे कीं प्रत्येक राष्ट्राचे आचारविचार त्या त्या राष्ट्राच्या परिस्थितीप्रमाणें निर्माण होत असतात. म्हणून तेच त्या राष्ट्राला परक्या विचारांपेक्षां अधिक अनुरूप आणि हितावह असतात.

मात्र एक गोष्ट येथें सांगून ठेवणें अवश्य आहे. परंपरेला मान दिला पाहिजे याचा अर्थ असा नव्हे कीं वाडवडील जें करीत आले तेंच आपण डोळे मिटून करीत राहिलें पाहिजे. “ तातस्य कूपोऽयमिति-

ब्रुवाणाः क्षारं जलं कापुरुषा पिबन्ति" वडिलांनीं विहीर खणली आहे म्हणून तिचेंच पाणी खारें असलें तरी आम्ही पिणार असा आग्रह धरणारांच्या मूर्खपणाला मर्यादा नाहीं. परंपरा सांभाळावयाची याचा असा अर्थ नाहीं कीं आपली विचारशक्ति गहाण ठेवावयाची. बदललेल्या परिस्थितीमुळें ज्या गोष्टी टाकाऊ ठरल्या त्या टाकल्याच पाहिजेत, आणि परंपरेच्या बाहेरच्या ज्या गोष्टी घेण्याजोग्या आहेत त्या घेतल्याच पाहिजेत. परंतु तसें करतांना पूर्ण विचार मात्र केला पाहिजे. जुन्या परंपरा सोडतांना त्या कां आणि कशा निर्माण झाल्या याचा पूर्ण विचार करून मग त्या चालू परिस्थितीला लागू नाहींत असें निश्चित ठरल्यावरच त्या सोडणें युक्त होईल. त्या सोडतांनाही योग्य मार्गानें आणि प्रकारानेंच सोडल्या पाहिजेत.

मी येत्या गुरुवारीं निघून शुक्रवारीं तेथें येऊन पोहोंचेन, हे उत्तम आशिर्वाद.

तुमचा प्रिय तात,

**'बाबा'**

## १६

॥ श्री ॥

संभाजी विलास,
ग्वाल्हेर
२९ जुलै १९३६.

अनेकोत्तम प्रेमाशिर्वाद :—

प्रत्यक्ष विरोध न करतां आडून मारा करून माणसाला निर्बल आणि नालायक बनविणारे असे शत्रूंचे कांहीं प्रकार आहेत. त्यांत तोंडपुजे, निंदक आणि चुगलखोर हे सर्वांत भयंकर होत. या तीन जातींपैकीं प्रत्येकींपासून आपलें संरक्षण करण्याचे मार्ग वेगवेगळे आहेत. यांच्यापासून जो सुरक्षित राहिला त्यानें आपल्या हातून कांहीं कर्तबगारी होईल अशी आशा करावयास प्रत्यवाय नाहीं. पण यांना जो बळी पडला तो एरवीं कितीही जाणता आणि कार्यकुशल असला तरी त्याच्या हातून भरींव कामगिरी होणें अशक्य आहे. तुम्हांला या तिन्ही जातींच्या शत्रूंशीं झगडावें लागेल.

सर्व प्रकारच्या धान्यांचें बीज सर्वच ठिकाणीं उगवेल असें नाहीं. पण अशी भूमी सहसा आढळत नाहीं कीं जेथें धान्याच्या रोपाला

ग्रासून टाकणारें दुसरेंच कसलें तरी रानटी गवत उगवत नाहीं. त्याचप्रमाणें तोंडपुजे लोकांचें पीक जेथें उगवत नाहीं अशी जागा कोणतीहि नाहीं. संपत्तीचा, पराक्रमाचा किंवा ज्ञानाचा मोठेपणा कोठेंही दिसला कीं तेथें अशा लोकांची गर्दी होते. कारण त्यांची भरभराट ही मनुष्यस्वभावांतील एका अनिवार्य मर्मावर चाललेली असते. स्तुती ही प्रत्येकाला गोड वाटते. आणि म्हणूनच ह्या रुचकर पदार्थाचा भरपूर पुरवठा करून आपलें काम उरकून घेणाऱ्या या लोकांची चंगळ चालते. अशा लोकांपासून आपलें केव्हांही हित होणें शक्य नाहीं. फार मोठी हानी होण्याचा मात्र संभव असतो. तोंडपुजे लोकांनीं सांगितलेल्या गोष्टींवर एकदां विश्वास बसूं लागला म्हणजे मनुष्य स्वतःचीच ओळख विसरतो. त्यांच्या सांगण्यावरून आपल्या अंगीं नसतेच कांहीं विशेष गुण आहेत अशी भ्रामक कल्पना करून घेतो. ज्याला स्वतःसंबंधींच खरी माहिती नाहीं तो दुसऱ्यांवर काय वजन पाडणार ? किंवा दुसऱ्याकडून कोणतीं कामें करून घेणार ? तोंडपुजे लोकांचीं तोंडें बंद करण्याला एकच आणि अगदीं सोपा उपाय आहे. स्तुती केली तरी आपण भाळून जात नाहीं; करावयाचें तेंच करतों आणि खोटी स्तुती करणाराचा तिरस्कार करतों, ही गोष्ट या लोकांच्या निश्चितपणें ध्यानांत आणून दिली म्हणजे पुन्हां ते त्या भानगडींत पडत नाहींत.

स्तुतिपाठक आणि लाळघोटे असे लोक सभोंवतीं असले कीं त्या माणसाला स्वतःला एक प्रकारचें सुख वाटेल यांत शंका नाहीं. पण

अशीं माणसें भोंवतीं जमविल्यानें आपल्या मोठेपणाची उंची कमी होते आणि आपण गबाळे ठरतों त्याची वाट काय? हीं दोन चित्रें पहा. एका माणसाच्या बरोबर असणारे लोक, सदा हात जोडलेले, याचकासारखी मुद्रा केलेले, हंसतांना सुद्धां केविलवाणें तोंड करणारे, त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडण्याचा अवकाश, लगेच "जीहां जीहां" करून माना डोलावणारे, आणि जर कांहीं बोलावयाचें असेल तर अंग मधून मधून एकसारखे पिळवटीत, दर स्वल्पविरामाला "हुजूर" करणारे, असे आहेत. दुसऱ्या माणसाच्या भोंवतीं पाणीदार आणि निर्भय पण नम्र मुद्रेचे, विचारलेल्या प्रश्नांना प्रसंगानुरोधानें गंभीरपणें किंवा स्मितपूर्वक पण शांत आणि स्पष्ट वाक्यांत उत्तर देणारे असे लोक आहेत. यांतील कोणतें चित्र तुम्ही पसंत कराल? पहिल्या चित्रांतील माणसाला त्याचे अनुयायी तो कोणी फार मोठा आहे असें खुशाल भासवोत. मात्र जगाच्या नजरेंत तो केवळ एक भाग्यवान नंदीच आहे. पुष्कळ वेळां आपली योग्यता आपल्या आसपासच्या लोकांच्या देखाव्यावरून ठरविली जाते.

निंदक हा प्राणी कोणालाही आवडत नाहीं. पण तो वाटतो तितका भयंकर नाहीं. त्याच्यापासून एक लाभ आपल्याला केव्हांही करून घेतां येतो आणि तो आपण अवश्य करून घ्यावा. निंदक हा आपल्या एकंदर धोरणाच्या हिशेबतपासनिसाचें काम विनावेतन करीत असतो. ज्यांना निंदा करावयाची आवश्यकता भासते असे लोक प्रथम अर्थातच आपले खरे दोष बाहेर काढण्यासाठीं टपलेले असतात,

आणि खरे नाहींच मिळाले तर मग खोटे दोष लावतात. आपल्या ध्यानांत नसलेले खरे दोष जर अशा मार्गानें आपल्या कानावर आले तर त्यासाठीं आपण मनांतल्या मनांत निंदकाचे आभार मानावे आणि त्या दोषांसाठीं काय करावयाचा तो उपाय करावा. खोटे दोष लावले जात असतील तर गोष्ट वेगळी. अशा प्रकारच्या निंदेवर रामबाण औषध दुर्लक्ष हें आहे. निंदा आपल्या कानावर आली असूनसुद्धां आपण रागावलों नाहीं, नुसतें हंसून " अंः " करून घालविलें, असें निंदकाला समजलें तर त्यामुळें त्याचा जितका विरस होईल तितका दुसऱ्या कशानेंही होणार नाहीं. मात्र निंदकांनीं आपली मोहीम अतिशय जोरांत आणि निंद्य स्वरूपांत चालू केली तर मात्र तिकडे लक्ष देणें पुष्कळ वेळां भाग पडतें. अशा वेळींसुद्धां प्रत्यक्ष त्यांच्याशीं गांठ पडेल असा प्रसंग केव्हांही घडवून आणूं नये. कारण बुद्धिपुरःसर निंदा करणाराचें तोंड कोणीही धरूं शकत नाहीं, आणि त्याचें सरळ मार्गानें समाधानही होऊं शकत नाहीं. आपल्या हातीं असेल त्या भल्याबुराईट उपायानें त्याला अशी समज द्यावी कीं तो पुन्हां कधीं विसरणार नाहीं आणि आपल्या वाटेस जाण्याच्या भानगडींत पुन्हां पडणार नाहीं.

चुगलखोर हा प्राणी मात्र सर्वांत भयंकर आहे. साप ज्याला चावेल त्याचाच प्राण घेईल. पण चुगलखोराचें सामर्थ्य असें असतें कीं " एकस्य दशति श्रोत्रम् अन्यः प्राणैर्वियुज्यते । " एकाच्या कानाला चावतो आणि दुसऱ्याच माणसाचा प्राण घेतो. कधीं

मत्सरामुळें, कधीं आपला लोभ संपादन करण्याच्या हेतूनें, आपला हितचिंतक आहें असें दाखविण्यासाठीं, अशा निरनिराळ्या हेतूनें चुगलखोर आपले डाव टाकीत असतो. आपल्या निंदकाची माहिती आपल्याला याच प्राण्याच्या द्वारां होत असते. या प्राण्याशीं फार धोरणानें वागावें लागतें. तोंडपुजांप्रमाणें याचा तिरस्कार करून यांना अगदींच पिटाळून लावणें योग्य होणार नाहीं. कारण तोंडपुजे हे अगदीं निरुपयोगी असतात. पण चुगलखोराचा पुष्कळ वेळां उपयोग होतो. आपल्या स्वतःच्या ध्यानांत न येण्याजोग्या खांचाखोचा पुष्कळ वेळां आपल्याला ह्याच्यामार्फत कळतात. म्हणून तें द्वार अगदींच बंद करून चालणार नाहीं. मात्र विषारी सर्पाचा उपयोग करतांना जी युक्ति करतात तीच येथेंही केली पाहिजे. त्याचा विषारी दांत काढून टाकला पाहिजे. त्याचें सगळें म्हणणें ऐकून घ्यावें. तो तें कोणत्या हेतूनें सांगत आहे हें समजण्याला पुष्कळ वेळां साधन नसल्यामुळें त्यावर एकदम विश्वास कधींही ठेवूं नये आणि त्यावर अवलंबून पुढलें पाऊल तर टाकूं नयेच नये. ज्या गोष्टींचा खरेपणा जाणण्याची आपल्याला आवश्यकता वाटत असेल, त्यांची माहिती आपल्या विश्वासाच्या आणखी एक दोन मार्गांनीं मिळवावी, आणि या सर्व प्रकारांनीं गोष्ट खरी ठरली तर जें करावयाचें तें करावें.

स्वतःमध्यें कर्तबगारी कांहीं नाहीं म्हणजे स्वतःची किंमत कवडी-मोल, मात्र महत्त्वाकांक्षा भयंकर विस्तृत, अशा प्रकारचे प्राणीच या तीन पैकीं एक, दोन अथवा तिन्ही मार्गांनीं मोठेपणा प्राप्त करून घेण्याचा

प्रयत्न करीत असतात. तेव्हां कोणतेंही कार्य मग तें राजकारण असो, धर्मकार्य असो अथवा घरगुती काम असो अशा माणसांकडून करवून घेण्याचा प्रयत्न करूं नये. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे या कक्षेंत येणारीं माणसें शरीरानें हवीं तितकीं जवळचीं असलीं तरी हृदयांत त्यांना स्थान नसावें. केवळ काट्यानें काटा काढावयाचा याच न्यायानें मात्र अत्यंत कुशलतेनें यांचा उपयोग करीत असावें. यांत त्यांच्याच महत्त्वाकांक्षेचा चांगलाच उपयोग होतो असा आमचा अनुभव आहे, हे उत्तम आशिर्वाद.

तुमचा प्रिय तात,

**'बाबा'**

## १७

॥ श्री ॥

लक्ष्मीनिवास

उज्जैन,

ता. ४-९-१९३६.

अनेकोत्तम प्रेमाशिर्वाद :—

आपले अगदीं जवळचे नातेवाईक आणि स्नेही वगळले तर बाकीच्या बहुतेक लोकांशीं आपला संबंध औपचारिक किंवा अगदीं थोड्या वेळापुरता येत असतो. आपली खरी योग्यायोग्यता काय आहे तें ओळखण्याला हा वेळ कधींच पुरेसा नसतो. वर वर दिसणाऱ्या गोष्टींवरूनच आपली पारख केली जाते, किंवा आपण दुसऱ्याची करतों. यासाठीं लोकांचें मत आपल्यासंबंधीं चांगलें व्हावयास हवें असेल तर सभ्यपणा आणि चांगली चालरीत हीं आपल्या अंगीं मुरलेलीं असलीं पाहिजेत.

सभ्य मनुष्य हा दिसावयालाही सभ्य असला पाहिजे आणि त्याचें वर्तनही सभ्यपणाचें असलें पाहिजे. पोषाखाचा आणि चालीरीतीचा नीटनेटकेपणा हा या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. प्रथमदर्शनीं नाहीं म्हटलें

तरी कोणीही माणसाची किंमत त्याच्या पोषाखावरून करतो. आपल्या देशांत पोषाखाकडे अगदींच दुर्लक्ष करण्याची "फॅशन" अलीकडे निघाली आहे. इतकेंच नव्हे तर गबाळेपणाचा पोषाख हें पुष्कळ गबाळे लोक मोठेपणाचें लक्षण समजतात. समाधानाची गोष्ट इतकीच कीं दुसरे लोक तसें समजत नाहींत. सभ्यपणानें पोषाख करणें हीसुद्धां एक प्रकारची कला आहे. त्यांत सुवर्णमध्य गांठतां आला पाहिजे. गबाळेपणा हा जसा वाईट तसाच अतिशय छानछोकीचा किंवा भपकेबाज पोषाखही वाईट. पुरुषांनीं अंगावर अलंकार घालण्याची चाल आतां बहुतेक नाहींशी झाली आहे. तरीसुद्धां अजूनही अलंकार घालून फिरणारे कांहीं हरीचे लाल आढळतात.

दोन तीन साध्या गोष्टींकडे लक्ष दिलें कीं पोषाखाच्या बाबतींत सभ्य होण्याचें काम सोपें होतें. पोषाख प्रसंगाला साजेसा असला पाहिजे. विवाहाच्या वेळीं नवरदेव इंग्रजी सूट घालून गेला तर तें अगदीं हास्यास्पद होईल. पण कित्येक प्रसंग असे असतात कीं त्यावेळीं इंग्रजी सूटच घालावयास पाहिजे. पोषाख नेहमीं साधा असावा. पण तो चांगल्या तऱ्हेनें शिवलेला, अत्यंत स्वच्छ, आणि व्यवस्थित इस्त्री केलेला असला पाहिजे. त्याचप्रमाणें तो अंगावर घालतांनाही व्यवस्थितपणें घातला पाहिजे. एक गोष्ट मात्र नेहमीं ध्यानांत ठेवावी. एकदां पोषाख करतांना पुरेशी काळजी घ्यावी. पण नंतर तो काढण्याची वेळ येईपर्यंत कांहीं झालें तरी त्याचा विचारही मनांत येऊं नये. कितीही चांगला वेष केलेला मनुष्य जर बसतां उठतां कोठें एखादी

घडी मोडली नाहीं ना, टायच वाकडा झाला नाहीं ना अशा गोष्टी-कडे लक्ष देऊं लागेल तर कोणत्याही विषयांत त्याचें चित्त लागणार नाहीं आणि तो गबाळ्यापेक्षां गबाळा दिसेल.

कपड्यांइतकेंच महत्त्व शारीरिक वागणुकीला आहे. कित्येक लोकांना अशी संवय असते कीं ते एक क्षणसुद्धां शांत राहूं शकत नाहींत. उभे असले तर बुटाच्या टोकानें जमीनच उकरतील, बसलेले असले तर विजेचें यंत्र लावल्याप्रमाणें मांड्याच हालवीत रहातील, वारंवार नाक ठिकाणावर आहे ना म्हणून चांचपून पहातील, बोटें कानांत घालतील, डोकें खाजवीत रहातील, पण बोलण्याचें किंवा ऐकण्याचें काम शांतपणानें करणार नाहींत. ह्या गोष्टींचा आपण ज्याच्याशीं बोलत असतों त्याच्यावर वाईट परिणाम होतो. त्याचें लक्ष विभागतें आणि आपलें म्हणणें त्याला नीटपणें ऐकूं जात नाहीं.

हा झाला वरवर दिसणारा सभ्यपणा. त्याचबरोबर बोलण्यांतला आणि वागण्यांतला सभ्यपणाही तुम्ही आपल्या अंगीं बाणवून घेतला पाहिजे. बोलण्या-चालण्यांतील असभ्यपणा हा बहुतांशीं ताठरपणा आणि दुर्लक्ष यांमुळें पदरीं येत असतो. विशेषतः तरुणपणीं या ताठरपणाची फार काळजी घेतली पाहिजे. तरुणपणीं पुष्कळांचा असा समज झालेला असतो कीं हुकमी आवाजांत आणि ठसकाऱ्यानें बोललें म्हणजे लोक त्यांना पाणीदार समजतील. ही समजूत चुकीची आहे. पाणीदार तर नाहींच समजत, पण अशा माणसाला लोक गर्विष्ठ समज-तात. प्रत्यक्ष हुकुम देतांनासुद्धां तो शांतपणें पण निश्चित स्वरांत

आणि सभ्यपणानें दिल्यानें अधिक परिणामकारक होतो. आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या माणसांशीं, नोकर-चाकरांशीं सुद्धां सभ्यपणें वागण्याचा नियम ठेवावा. म्हणजे आपल्या बरोबरीच्या किंवा आपल्याहून श्रेष्ठ माणसांशीं असभ्यपणाचें वर्तन आपल्या हातून केव्हांही होणार नाहीं. दुसरें असें कीं नोकर माणसांना लहानपणापासून सभ्यपणाची शिकवण अशी क्वचितच मिळालेली असते. तीं आपलेंच अनुकरण करण्याचा प्रयत्न करीत असतात. आणि त्यांच्या वर्तनावरून पुष्कळ वेळां लोक आपल्या घरांतील चालीरीतींचा अंदाज बांधीत असतात.

दुसऱ्याशीं बोलत असतांना इकडेतिकडे पहाणें किंवा मध्येंच दुसरा विषय काढून त्याच्याकडे आपलें दुर्लक्ष आहे हें उघड दिसूं देणें हेंही असभ्यपणाचें आहे. पुष्कळ वेळां ही गोष्ट दुसऱ्यांच्या मनाला इतकी लागते कीं ते आपले कायमचे शत्रू होतात. आपल्याशीं दुसऱ्या कोणी असें वर्तन केलें तर आपल्याला काय वाटेल त्याचा थोडा वेळ विचार करावा. आपल्याशीं बोलायला येणारा प्रत्येक मनुष्य स्वतःला कांहींएक महत्त्व देत असतो. त्याच्या ह्या भावनेला दुखविणें धोक्याचें आहे. बरें, त्यांत आपलें कांहीं विशेष खर्च होत असतें असें मुळींच नाहीं. पुष्कळ बोलणारे लोक असे चिवट असतात कीं त्यांच्याकडे लक्ष ठेवतांना आपल्या सहनशीलतेवर चांगलाच ताण पडतो. तरीसुद्धां फलाकडे लक्ष ठेवून एवढें दुःख सहन करणें आवश्यक आहे.

आपल्यापासून सर्वांना संतोष व्हावा असें प्रत्येकाला वाटत असतें. संतोष झाला तरच लोकांना आपण हवेसे वाटूं. पण ती गोष्ट फुका-

फुक्की मात्र मिळत नाहीं. त्यासाठीं वर सांगितलेल्या गोष्टी अंगीं बाणवून घ्यावा लागतात. आपल्या साहचर्यात कोणींना कोणी अशीं माणसें आढळतील कीं ज्यांच्या संगतींत आपल्याला, त्याचप्रमाणें दुसऱ्यालाही आनंद वाटतो. अशा माणसांच्या वर्तनाचें बारकाईनें निरीक्षण करावें आणि त्यांचे गुण उचलण्याचा प्रयत्न करावा, हे उत्तम आशिर्वाद.

तुमचा प्रिय तात,

**'बाबा'**

## १८

॥ श्री ॥

लक्ष्मीनिवास,
उज्जैन,
ता. ५-९-१९३६.

अनेकोत्तम प्रेमाशिर्वाद :—

आधुनिक काळांत द्रव्य ही एक फार मोठी शक्ति आहे. जगाच्या इतिहासांत आजच्याइतकें द्रव्याला कधींही महत्त्व आलें नव्हतें. यंत्रयुग सुरू होईपर्यंत अशी स्थिति होती कीं माणसाच्या आवडीच्या ज्या अनेक गोष्टी आहेत त्यांपैकीं एक, इतकेंच महत्त्व द्रव्याला होतें. द्रव्याच्या अभावीं दुसऱ्या गुणांच्या जोरावरही माणसांना आपलें इच्छित साध्य करून घेणें शक्य होत असे. आपल्याकडील लक्ष्मी आणि सरस्वति यांचा विरोध हा तर प्रसिद्धच आहे. विद्वान् लोक द्रव्याची अपेक्षा बाळगीत नसत, आणि त्यांना त्याची आवश्यकताही नसे. मानमान्यता आणि ज्ञानाचें समाधान हीं त्यांना पुरेशीं असत. प्रवासाची हौस असणाऱ्या माणसाला द्रव्यापेक्षां धाडसाचीच अधिक आवश्यकता असे; इतकेंच नव्हे तर द्रव्य सांभाळणें हें त्या काळीं मोठें अवघड

काम असल्यामुळें प्रवासांत ती एक अडचण होऊन बसे.

पण आतां ती स्थिति पालटली आहे; आतां कोणतेंही मोठें काम करावयाचें तर द्रव्याशिवाय पान हालत नाहीं. अगदीं निव्वळ ज्ञानाची उपासना करावयाची असें एखाद्यानें मनांत आणलें तरी द्रव्याशिवाय तो लंगडा आहे. कोणत्याही विषयाचें सांगोपांग ज्ञान मिळवावयाचें म्हणजे नुसतीं पुस्तकें मिळविण्यासाठीं सुद्धां पुष्कळ द्रव्य पाहिजे. नवीन संशोधन करावयाचें तर विचारावयासच नको. प्रयोगशाळा, प्रवास इत्यादिकांसाठीं पुष्कळच द्रव्य पाहिजे. पूर्वीं एखाद्याला आपल्या विशिष्ट मताचा प्रचार करावयाचा तर तोंडानें उपदेश करीत तें काम करतां येत असे. पण आतां त्या उपायानें तुलनात्मक दृष्टीनें पाहिलें असतां त्याचा आवाज फारच थोड्या लोकांच्या कानावर जाईल. त्यासाठीं वर्तमानपत्रें हवींत, मासिकें हवींत, ब्रॉडकास्टिंग स्टेशन्स हवींत, म्हणजे द्रव्य हवें. पूर्वीं राजकीय पुढारीपण हें केवळ बाहुबलावर मिळवितां येत असे. पण आज तें सुद्धां द्रव्याशिवाय अशक्य आहे. प्रतिनिधीसभांत निवडून येणाऱ्या लोकांच्या निवडणुकीच्या खर्चाचे आंकडे पाहिले म्हणजे या गोष्टीचा प्रत्यय येईल. मुसोलिनी किंवा हिट्लर यांसारखे लोक स्वतःच द्रव्यसंपन्न नव्हते हें खरें, पण त्यांनांसुद्धां यश तेव्हांच आलें कीं जेव्हां त्यांच्या कार्यक्रमामुळें ज्यांना लाभ होणार होता अशा विशिष्ट धनिक वर्गानें त्यांना अमर्याद द्रव्याचा पुरवठा केला. अर्थात द्रव्य ही शक्ति आजच्या काळीं सर्वांत मोठी असली तरी स्वभावतः ती इतर शक्तींहून भिन्न नाहीं. कोण-

त्याही शक्तीची कार्यक्षमता ती वापरणाराच्या कुशलतेवर अवलंबून असते. अडाणी माणसाच्या हातीं द्रव्य गेलें तर प्रसंगीं तें त्याच्या नाशालाही कारणीभूत होऊं शकेल. पण म्हणून द्रव्याची शक्ति कमी ठरते असें मुळींच नाहीं.

विद्यार्जन करून ज्ञानबळ वाढविणें, व्यायाम करून शरीरबळ कमाविणें हीं कामें पवित्र समजलीं जातात. त्याचप्रमाणें वर सांगितलेल्या कारणांसाठीं द्रव्योपार्जन करणें हेंही एक पवित्र कर्तव्य आहे.

दुर्दैवानें मराठे लोकांनीं ही एक गोष्ट अजून नीट ध्यानांत घेतली नाहीं आणि तिच्याकडे त्यांनीं यापुढें असेंच दुर्लक्ष केलें तर एक वेळ हिंदुस्थानभर साम्राज्य पसरविणारे मराठे दास होऊन बसतील यांत शंका नाहीं. आजच हिंदुस्थानच्या राजकारणांत मराठे मागें पडूं लागले आहेत. आणि त्याला कारण मुख्यतः त्यांचें दारिद्र्य हेंच आहे. अनेक पिढ्यांची वाढती श्रीमंती ही मराठे मंडळींत क्वचितच पहावयाला सांपडते. राज्य कमाविण्याच्या आणि गमाविण्याच्या कामांत व्यापारधंद्याकडे लक्ष द्यावयास मराठ्यांना सुचलेंच नाहीं. त्यामुळें अलीकडच्या काळांत सरदार इनामदार वर्ग हाच काय तो त्यांच्यामधला श्रीमंत वर्ग म्हणून राहिला. पण त्यांच्यासुद्धां गेल्या दोन पिढ्या अशा झाल्या कीं त्यांच्या नादानपणाला जगाच्या इतिहासांत क्वचितच तोड सांपडेल. आपल्या पराक्रमी वाडवडिलांचें नांव मात्र ते सांगत राहिले, पण बदलत्या काळाबरोबर त्यांच्यावर जी जबाबदारी येऊन पडत होती तिचा त्यांनीं केव्हांच विचार केला नाहीं. इतकेंच नव्हे तर पूर्वजांनीं जें

कांहीं ठेविलें होतें तें ऐषआरामांत उडवून घराणीं कर्जबाजारी करून टाकलीं आणि जेथें कायद्याची अडचण नव्हती अशा पुष्कळ ठिकाणीं मराठे इनामदारांचीं उत्पन्नें दुसऱ्यांच्याच घशांत जाऊन पडलीं. महाराष्ट्र सामर्थ्यवान व्हावयाचा असेल तर श्रीमंत मराठ्यांनीं आपल्या स्थितींत संतुष्ट न रहातां हरएक प्रकारचे उद्योगधंदे, व्यापार वगैरे चालवून आपली द्रव्यशक्ति वाढवून घेतली पाहिजे.

या बाबतींत कै. थोरल्या महाराजांनीं सर्व मराठे जहागिरदार आणि संस्थानिक यांना अनुकरण करण्याजोगा धडा घालून दिला आहे. त्यांच्या प्रयाणसमयीं ग्वाल्हेर संस्थानची जी आर्थिक परिस्थिति होती तशी क्वचितच दुसऱ्या कोणत्याही संस्थानची असेल. अजूनसुद्धां महाराष्ट्राला पुन्हां जोम आणून देण्याची शक्यता कोणा एका वर्गाच्या हातीं असेल तर ती सरदार इनामदारवर्गाच्या हातींच आहे; पण तशी इच्छा मात्र पाहिजे.

उद्योगधंदे चालवून अधिकाधिक द्रव्योपार्जन करणें हें हावरेपणाचें लक्षण तर नाहींच पण तें प्रत्येक धनिकाचें कर्तव्य आहे. उद्योगधंद्याच्या अभावीं आज हिंदुस्थानांत बेकारी आणि दारिद्र्य हीं बेसुमार वाढलीं आहेत. आणि त्याचबरोबर खर्च केलेला पैसा प्रत्यक्ष आणि शिल्लक राहिलेला पैसा परदेशीं बँकांच्या द्वारें, अशा रीतीनें भारतीय धनिकांचा पैसा त्यांच्या देशबांधवांना आकाशाकडे पहात ठेवून परकीयांच्या घशांत चालला आहे. लोक दरिद्री होऊन इतर उद्योगधंद्यांच्या अभावीं शेतकी-वरच येऊन पडल्यामुळें आणि जागतिक दृष्ट्या इतर उद्योगधंद्यांचें

महत्त्व वाढत चालल्यामुळें दिवसें दिवस शेतकी आणि जहागिरी व मोठमोठ्या जमीनदाऱ्या आणि पर्यायानें राज्यें यांचें महत्त्व कमी होत जाणार. आणि हा वर्ग वेळींच सावध झाला नाहीं तर त्याला खो देऊन दुसरे लोक त्यांची जागा पटकावणार. एक नवीन कारखाना यशस्वी रीतीनें चालविणें हें एक मोठें पुण्यकर्म आहे असें आम्ही म्हणतों. कारण त्यामुळें आपल्या किती तरी देशबांधवांना आपण काम मिळवून देतों. परंतु कारखाने चालविणें हें भांडवलाचें काम आहे. तें मराठ्यांच्याकडून व्हावयाचें तर ज्यांचीं उत्पन्नें अजून कायम आहेत, आणि ज्यांना थोडेंफार भांडवल शिल्लक टाकतां येणें शक्य आहे, अशांकडून होऊं शकेल. परंतु त्यासाठीं माहिती लहानपणापासून मिळवून ठेविलेली असली पाहिजे. आमच्या हातून योग्य वेळीं तें झालें नाहीं, यासाठींच तुम्हांला पुढें अर्थशास्त्राचा अभ्यास करण्याची सूचना आम्हीं केली आहे.

द्रव्य ज्यांच्याजवळ आहे त्यांनीं त्याचा काळजीपूर्वक उपयोग करणें हेंही त्यांचें कर्तव्य आहे. पुष्कळ श्रीमंत असे आढळतात कीं आपण द्रव्याचा हिशोब बाळगीत नाहीं, बेफामपणें खर्च करतों असें दाखविल्याखेरीज आपली श्रीमंती प्रस्थापित झाली नाहीं असें त्यांना वाटतें. यासारखा लक्ष्मीचा अपमान कोणताच नाहीं. श्रीमंतांनीं श्रीमंतीचा उपभोग आवश्य घेतला पाहिजे; कारण त्याशिवाय पैसा खेळता रहाणार नाहीं, आणि कारागिरांना काम मिळणार नाहीं. पण वस्तूचा नाश किंवा उधळपट्टी हा वस्तूचा उपयोग नव्हे, ही गोष्ट

ध्यानांत ठेविली पाहिजे. ज्या ज्या वस्तूला कांहीं किंमत आहे अशी प्रत्येक वस्तू निर्माण करण्यांत कित्येक कारागिरांचे श्रम खर्ची पडलेले असतात. एका अर्थी असेंही म्हणतां येईल कीं वस्तू ही ती बनविण्या-साठीं लागलेल्या श्रमांचें मूर्तस्वरूप आहे. म्हणून निष्काळजीपणानें तिचा नाश करणें म्हणजे तितके मानवी श्रम व्यर्थ घालविण्यासारखें आहे. खर्च आपल्या सामर्थ्याप्रमाणें हवा तितका करावा. पण खर्च केलेल्या प्रत्येक पैचा मोबदला मिळतो आहे याची मात्र बरोबर काळजी घ्यावी, हे उत्तम आशिर्वाद.

तुमचा प्रिय तात,

**‘ बाबा ’**